सर्वदा ॥ २८ ॥ उद्धवासी ज्ञान गुप्त । उपदेशील कृष्णनाथ । एका जनार्दना विनवित । दत्तचित्त त्वां दीजे ॥ ४२९ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कंधे एकाकारटीकायां देवस्तुत्युद्धवविज्ञापनं नाम षष्ठोऽध्यायः ॥ ६ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कंधे षष्ठोऽध्यायः ॥ ६ ॥

अध्याय सातवा.

श्रीगणेशाय नमः ॥ ॐ नमो चतुरक्षरा । चतुरचित्तप्रबोधचंद्रा । जनार्दना सुरेंद्रइंद्रा । ज्ञाननरेंद्रा निजबोधा ॥ १ ॥ तुझी करितांचि गोठी । प्रगटसी पाठीपोटीं । सन्मुख ठसावसी दृष्टीं । हृदयगांठी छेदूनि ॥२॥ छेदूनि विषयवासना । स्वयें प्रगटसी जनार्दना । भवअभवभावना । नेदिसी मना आतळों ॥३॥ आतळतां तुझे चरण । आकळलें राहे मन । सहज देशी समाधान । आनंदघना अच्युता ॥४॥ ऐशिया जी गुरुनाथा । समसाम्यें चरणीं माथा । पुढील परिसावी जी कथा । जेथ वक्ता श्रीकृष्णु ॥ ५ ॥ उद्धवें विनविलिया-वरी । कृपाकळवळला श्रीहरी । निजज्ञान अतिविस्तारीं । बोधकुसरीं सांगतु ॥ ६ ॥ होतें कृष्णाचे मानसीं । मज गेलिया निजधामासी । माझें निजज्ञान कोणापासीं । अतियत्नेंसीं ठेवावें ॥ ७॥ तंव देखिली उद्धवाची अवस्था । सुख जाहलें श्रीकृष्णनाथा । वैराग्ययुक्त उपदेशितां । होये सर्वथा निजज्ञान

हेंच संतांपाशीं पुनःपुनः सर्वदा मागणें आहे. २८ आतां श्रीकृष्णनाथ उद्धवाला गुप्तज्ञानाचा उपदेश करील तरी तूं मला सावधान चित्तत्त्व दे, असें एका विनवीत आहे. ४२९.

इति श्रीमद्भागवत पुराणांतील एकादशस्कंधाचा परमहंससंहितेमधला श्रीधर-एकनाथविरचित टीकानुसार विष्णुशर्मकृत सान्वयार्थ-भावार्थासह देवस्तुति व उद्धवविज्ञापना या नांवाचा सहावा अध्याय समाप्त झाला.

हे चतुराक्षरा जनार्दना ! चतुरांच्या चित्ताला ज्ञानरूपी आल्हाद देणाऱ्या चंद्रा, हे देवेंद्राच्याहि देवा ! हे ज्ञाननरेंद्रा, म्ह० हे ज्ञानीपुरुषांतील श्रेष्ठा, हे आत्मबोधा, १ तुझें नांव घेतांच तूं बाहेर आणि आंत प्रकट होतोस. डोळ्यांपुढें उभा रहातोस. हृदयांतील चिज्जड ग्रंथीचा छेद करितोस. २ विषयवासना तोडून तूं स्वतः प्रकट होतोस. हे जनार्दना ! संसार व मोक्ष यांच्या वासनेचा तूं मनाला स्पर्श होऊं देत नाहींस. ३ तुझ्या चरणस्पर्शानें माझें मन स्थिर होऊन रहातें. त्यामुळें हे आनंदघना ! अच्युता ! तूं परम समाधान देतोस. ४ अशा हे गुरुनाथा ! तुझ्या चरणावर मी समभावानें मस्तक ठेवितों व ज्यांत श्रीकृष्ण स्वतः वक्ता आहे ती कथा ऐकावी असें विनवितों. ५ उद्धवानें विनविल्यावर श्रीहरि दयेनें गहिंवरला व त्यानें अति कुशलतेनें आत्मज्ञान विशद करून सांगण्यास आरंभ केला. ६ कृष्णाच्या मनांतहि होतेंच कीं, आपण निजधामास जातांना कोणापाशीं तरी आत्मज्ञान मोठ्या यत्नानें ठेवून जावें. ७ तेव्हां उद्धवाची ती स्थिति पाहून श्रीकृष्णाला मोठें समाधान वाटलें. वैराग्यानें युक्त असलेल्या याला उपदेश केला असतां आत्मज्ञान अवश्य होईल असें

॥ ८ ॥ एवं वांचवावया उद्धवासी । कृष्ण ब्रह्मज्ञान उपदेशी । शाप न बाधी ब्रह्मवेत्त्यांसी । हें हृषीकेशी जाणतु ॥ ९ ॥ ब्रह्मउपदेशाची हातवटी । उपदेशूं जाणे जगजेठी । वैराग्य उपजवी उठाउठीं । जेणें पडे मिठी निजतत्त्वीं ॥ १० ॥ नव्हतां वैराग्य दारुण । उपदेशु केला तो वृथा जाण । हे श्रीकृष्णचि जाणे खूण । वैराग्यविंदान बोलतु ॥ ११ ॥ पहिलें उद्धवाच्या बोलासी । अनुमोदन दे हृषीकेशी । तेणें अन्वयें सावकाशीं । ज्ञानवैराग्य त्यासी बोलतु ॥ १२ ॥

श्रीभगवानुवाच–यदात्थ मां महाभाग तच्चिकीर्षितमेव मे ।
ब्रह्मा भवो लोकपालाः स्वर्वासं मेऽभिकाङ्क्षिणः ॥ १ ॥

जो वेदांचा वेद्यवक्ता । जो ज्ञानियांचा ज्ञानदाता । तो श्रीकृष्णु ह्मणे भाग्यवंता । ऐकें निजभक्ता उद्धवा ॥ १३ ॥ जें तूं बोलिलासी भावयुक्त । तें वचन तुझें सत्य सत्य । तेंचि माझें मनोगत । जाण निश्चित निर्धारें ॥ १४ ॥ माझी अवस्था जाश्वनीळा । ब्रह्मादिदेवां सकळां । येथ आले होते मिळोनि मेळां । लोकपाळांसमवेत ॥ १५ ॥ येऊनि माझी घेतली भेटी । अपेक्षा जे होती पोटीं । पुशिली माझ्या प्रयाणाची गोठी । जेणें तुज मोटी अवस्था ॥ १६ ॥ म्यां वेगीं यावें वैकुंठा । हे समस्तांसी उत्कंठा । आदिकरून नीळकंठा । सुरवरिष्ठां जालीसे ॥ १७ ॥

मया निष्पादितं ह्यत्र देवकार्यमशेषतः । यदर्थमवतीर्णोऽहमंशेन ब्रह्मणार्थितः ॥ २ ॥

त्याला वाटलें. ८ याप्रमाणें उद्धवाला वांचविण्यासाठीं कृष्णानें त्याला ब्रह्मज्ञानाचा उपदेश केला. ब्रह्मवेत्त्याला शाप बाधत नाहीं हें तो जाणत होता. ९ ब्रह्मोपदेश कुशलतेनें कसा करावा हें त्याला ठाऊक होतें. म्हणून आत्मतत्त्वाचा उपदेश ज्यायोगें होईल तसें वैराग्य त्यानें अकस्मात् त्याच्या मनांत उत्पन्न केलें. १० तीव्र वैराग्य नसल्यास केलेला उपदेश व्यर्थ होतो, हें वैराग्याचें महत्त्व तो जाणत होता. म्हणून श्रीकृष्ण वैराग्ययुक्त बोलूं लागला. ११ अगोदर त्यानें उद्धवाच्या म्हणण्याला अनुमोदन दिलें आणि मग त्याच प्रसंगानें हळूहळू तो त्याच्याशीं ज्ञान व वैराग्य यांच्या गोष्टी बोलूं लागला. १२.

(या सातव्या अध्यायामध्यें हरि स्वतः उद्धवाच्या आत्मज्ञानाची सिद्धि होण्यासाठीं अवधूताच्या इतिहासांत सांगितलेल्या अनेक गुरूंतील आठ गुरूंचें वर्णन करील.)

श्रीभगवान् उवाच–भगवान् म्हणाले, हे महाभाग–हे महाभागा, मां यत् आत्थ–तूं मला ' या कुलाचा संहार करून स्वधामाला जाण्याची इच्छा करितोस, ' इत्यादि जें म्हणत आहेस, तत् मे चिकीर्षितं एव–तें मला करावयाचेंच आहे. ब्रह्मा भवः लोकपालाः मे स्वर्वासं अभिकाङ्क्षिणः–ब्रह्मदेव, शंकर व लोकपाल माझ्या वैकुंठवासाची आकांक्षा करीत आहेत. १.

जो वेदांचें रहस्य सांगणारा, जो ज्ञान्यांनाहि ज्ञान देणारा, तो श्रीकृष्ण आपल्या भाग्यवान् भक्ताला म्हणाला कीं, हे उद्धवा ! ऐक. १३ तूं जें भक्तीनें बोललास तें तुझें वचन अगदीं खरें आहे. माझा मनोदय खरोखर तसाच आहे. १४ माझी स्थिति काय झाली आहे हें तूं जाणतोसच. नीलकंठ, प्रजापति वगैरे सर्व देव साऱ्या लोकपाळांसह १५ येथें येऊन त्यांनीं माझी भेट घेतली आणि त्यांनीं माझ्या प्रयाणाची गोष्ट काढिली, त्यामुळें तुझी अशी व्याकुळ स्थिति झाली आहे. १६ परंतु शंकर-ब्रह्मदेवादि सर्व श्रेष्ठ देवांना मीं वैकुंठाला लवकर यावें अशी उत्कंठा लागली आहे. १७.

मया हि अत्र देवकार्यं अशेषतः निष्पादितं–मीं येथें देवांचें कार्य निःशेष संपादन केलें आहे. ब्रह्मणा अर्थितः अहं यदर्थं अंशेन अवतीर्णः–ब्रह्मदेवाकडून प्रार्थना केला गेलेला मी त्यासाठींच अंशानें अवतीर्ण झालों. २.

ज्यालागीं ब्रह्मेनि प्रार्थिलें । तें देवकार्य म्यां संपादिलें । अवतार नटनाट्य धरिलें । ज्येष्ठत्व दिधलें बळिभद्रा ॥ १८ ॥ ज्येष्ठकनिष्ठभावना । दोघांमाजीं नाहीं जाणा । कृष्णा आणि संकर्षणा । एकात्मता निजांशें ॥ १९ ॥

कुलं वै शापनिर्दग्धं नंक्ष्यत्यन्योन्यविग्रहात् । समुद्रः सप्तमेऽह्न्येतां पुरीं च प्लावयिष्यति ॥ ३ ॥

उरलें असे आमुचें कुळ । शापनिर्दग्ध केवळ ।अन्योन्यविग्रहें सकळ । कलहमूळें नासेल ॥ २० ॥ भूमि मागोनि समुद्रापासीं । म्यां रचिलें द्वारकेसी । मज गेलिया निजधामासी । तो सातवे दिवसीं बुडवील ॥ २१ ॥

यर्ह्येवायं मया त्यक्तो लोकोऽयं नष्टमङ्गलः । भविष्यत्यचिरात्साधो कलिनापि निराकृतः ॥ ४ ॥

ऐकें उद्धवा हितगोष्टी । म्यां सांडिलिया हे सृष्टी । थोडियाचि काळापाठीं । नष्टदृष्टी जन होती ॥ २२ ॥ अधर्म वाढेल प्रबळ । लोक होतील नष्ट अमंगळ । ते अमंगळतेचें मूळ । ऐक समूळ सांगेन ॥ २३ ॥ मज नांदतां ये सृष्टीं । कलि उघडूं न शके दृष्टी । मज गेलियापाठीं । तो उठाउठी उठेल ॥ २४ ॥ कलि वाढेल अतिविषम । ब्राह्मण सांडितील स्वधर्म । स्वभावें नावडे दानधर्म । क्रियाकर्म दंभार्थ ॥ २५ ॥

न वस्तव्यं त्वयैवेह मया त्यक्ते महीतले । जनोऽधर्मरुचिर्भद्र भविष्यति कलौ युगे ॥ ५ ॥

ज्या कार्यासाठीं ब्रह्मदेवानें माझी प्रार्थना केली होती तें कार्य मीं संपादन केलें आहें. मीं मनुष्यरूपानें मायिक अवतार घेतला व बलरामाला वडिलपणा दिला, १८ पण आम्हां दोघांमध्यें लहानमोठा हा भावच नाहीं कृष्ण आणि बलिभद्र यांचें सांशानें एकात्मत्वच आहे. १९.

—पण तूं सर्वत्याग करून आत्मनिष्ठ हो, असें या पुढील श्लोकांनीं भगवान् सांगतात—

शापनिर्दग्धं कुलं अन्योन्यविग्रहात् वै नंक्ष्यति–शापानें दग्ध झालेलें हें कुल आपसांत कलह करूनच नाश पावेल. समुद्रः च सप्तमे अह्नि एतां पुरीं प्लावयिष्यति–आणि समुद्र सातव्या दिवशीं या नगरीला बुडवून टाकील. ३.

विप्रशापानें होरपळलेलें असें आमचें कुळ तेवढें आतां उरलें आहे. तें परस्परांचा कलह होऊन नाश पावेल. २० मीं सागराजवळून भूमि मागून घेतली व तींवर द्वारका रचिली. मी वैकुंठीं गेल्यावर सातवे दिवशीं तो सागर द्वारका बुडवील. २१.

साधो–हे सज्जना ! यर्हि एव मया अयं लोकः त्यक्तः–ज्या दिवशीं मी हा लोक सोडला आहें असें होईल, तदा एव अयं नष्टमंगलः–त्याच दिवशीं हा लोक सर्वमंगलशून्य व, कलिना अपि अचिरात् निराकृतः भविष्यति–कलीकडूनहि तत्काल आक्रमिलेला असा होईल. ४.

हे उद्धवा ! माझें हें हितवचन ऐक ! मी ही सृष्टि सोडून गेलों कीं थोड्याच काळानें लोक विवेकरहित होतील. २२ फार मोठा अधर्म वाढेल. लोक नष्ट व अमंगळ होतील. त्या अमंगळपणाचें मूळ मी तुला सविस्तर सांगतो, ऐक. २३ मी जोंपर्यंत या जगांत नांदत आहें तोंपर्यंत कलीची याच्याकडे डोळा उघडून पहाण्याचीहि छाती नाहीं. पण मी येथून जातांच तो एकदम उठेल. २४ कलीचें प्राबल्य फार वाढलें म्हणजे ब्राह्मण स्वधर्म सोडतील, त्यांना मनापासून दानधर्म आवडणार नाहीं. परंतु ते दंभानें मात्र क्रियाकर्म करितील. २५.

मया महीतले त्यक्ते त्वया इह एव न वस्तव्यं–मीं हा लोक सोडला असतां तूं येथेंच राहूं नयेस. भद्र–हे कल्याणा ! कलौ युगे–कलियुगांत, जनः अधर्मरुचिः भविष्यति–लोकांची अधर्मरुचि वाढेल. ५.

म्यां सांडिलिया महीतळीं । प्रबळ बळें वाढेल कळी । आजीच तुवां निघिजे तत्काळीं । जंव तो कळी नातळे ।। २६ ।। कळी आतळेल जेव्हां । जनीं अधर्मु वाढेल तेव्हां । कुविद्येच्या उठती हांवा । सैंघ धांवा निंदेच्या ।। २७ ।। न लभे स्वार्थाची कवडी । तरी करिती निंदेच्या कोडी । ऐसी कलियुगीं वस्ती कुडी । तुवां अर्ध घडी न राहावें ।। २८ ।।

त्वं तु सर्वं परित्यज्य स्नेहं स्वजनबन्धुषु । मय्यावेश्य मनः सम्यक् समदृग्विचरस्व गाम् ।। ६ ।।

उद्धवा तूं यालागीं । येथोनि निघावें वेगवेगीं । एकलाचि आंगोवांगीं । हितालागीं सर्वथा ।। २९ ।। धनधान्यसमृद्धीसी । सांडावें स्वजनगोत्रजांसी । भ्रातादुहितानिजभगिनींसी । स्त्रीपुत्रांसी त्यजावें ।। ३० ।। स्नेहो ठेवूनि घरदारीं । अंगें तूं जरी निघालासी बाहेरी । तरी तो त्यागूचि कठिण भारी । अनर्थकारी होईल ।। ३१ ।। आधीं समूळ स्नेहो सांडावा । पाठीं अभिमानुही दंडावा । वासनाजटाजूट मुंडावा । मग सांडावा आश्रमु ।। ३२ ।। स्नेहो कैसेनि सांडे । अभिमानु कैसेनि दंडे । हें तुज वाटेल सांकडें । तरी रोकडें परियेसीं ।। ३३ ।। माझें स्वरूप जें सर्वगत । तेथ ठेवोनियां चित्त । सावधानें सुनिश्चित । राहावें सतत निजरूपीं ।। ३४ ।। तये स्वरूपीं चित्ता । निर्धारेंसीं धारणा धरितां । निजभावें तन्मयता । तद्रूपता पावेल ।। ३५ ।। भृंगी जड किटी मूढ । ध्यानें तद्रूप होय दृढ । अभ्यासीं कांहीं नाहीं अवघड । तो अभ्यास गूढ विशद केला ।। ३६ ।। माझें स्वरूप ज्ञानघन । ध्यातां जीवू स्वयें सज्ञान । या स्थितीं करितां ध्यान । सहजें जाण तद्रूप ।।३७।। तेथ समसाम्यें समस्त । समत्व पावेल चित्त । तेणें समभावें निश्चित । जेथींच्या तेथ राहावें ।। ३८ ।। आधीं गृहाश्रमातें त्यागावें । मग म्यां म्हणसी कोठें राहावें । ऐसें मानिसील स्वभावें । तेविखीं बरवें परियेसीं ।। ३९ ।। स्वरूप साम्यें

मीं पृथ्वी सोडली कीं, कलि अत्यंत प्रबळ होईल. याकरितां जोंपर्यंत कलि शिरला नाहीं तोंपर्यंत आजच तूं येथून पाय काढ. २६ कलि जेव्हां प्रवेश करील, तेव्हां लोकांत अधर्म वाढेल. अविद्येची लोकांना हांव सुटेल आणि निंदेची पैज लागेल. २७ एक कवडीचा जरी स्वार्थ न साधला तरी लोक निंदेच्या राशी रचितील. अशी कलियुगांतील वस्ती फार वाईट आहे; म्हणून तूं क्षणभरहि येथें राहूं नकोस. २८.

त्वं तु स्वजनबन्धुषु सर्वं स्नेहं परित्यज्य–परंतु तूं स्वजन व बंधु यांवरील सर्व स्नेह टाकून, मयि सम्यक् मनः आवेश्य–माझ्या ठिकाणीं आपलें मन चांगल्याप्रकारें स्थापून, समदृक् गां विचरस्व–सर्वत्र समदृष्टि ठेवून पृथ्वीमध्यें संचार कर. ६.

यासाठीं हे उद्धवा ! तूं येथून स्वतःच्या हितासाठीं एकटाच धन, २९ धान्य, ऐश्वर्य, स्वजन, आप्त, भाऊ, कन्या, भगिनी, स्त्री व पुत्र या सर्वांना सोडून सत्वर निघावेंस. ३० घरदारांवर स्नेह ठेवून जर तूं बाह्यतः देहानें मात्र निघशील तर मात्र तो त्यागच तुला फार असह्य व अनर्थकारक होईल. ३१ पहिल्यानें सगळा स्नेह सोडावा, त्यानंतर अभिमान टाकावा, मग वासनारूपी जटांचें मुंडण करावें व शेवटीं आश्रम सोडावा. ३२ स्नेह कशानें तुटेल, अभिमान कशानें जाईल, असें जर तुला वाटत असेल तर तत्त्वतः ऐक. ३३ माझ्या सर्वव्यापी स्वरूपांत सर्वदा चित्त स्थिर करून आत्मस्वरूपांतच निरंतर निश्चयानें सावधान रहावें. ३४ त्या स्वरूपामध्यें निश्चयानें एकाग्र चित्त केलें म्हणजे भक्तीनें तें तन्मय होतें व तद्रूप बनतें. ३५ भृंगी जड असते, अळी मूढ असते, पण केवळ दृढ ध्यासानें तद्रूप होते. तेव्हां अभ्यासानें कोणतीहि गोष्ट असाध्य नाहीं. तोच गूढ अभ्यास मीं विशद केला आहे. ३६ माझें स्वरूप ज्ञानमय आहे. त्याचें ध्यान करणारा जीव स्वतःच सज्ञान होतो व सहजच तादात्म्य पावतो. ३७ तेथें समदृष्टि असल्यामुळें चित्तहि समत्वालाच प्राप्त होतें. त्या समभावांतच निश्चयानें रहावें. ३८ गृहस्थाश्रमाचा त्याग करून मीं कोठें रहावें, असें साहजिकच तुला वाटेल तर त्याविषयीं ऐक. ३९ स्वरूपसाम्यानें

समदृष्टी । समभावें विचरें सृष्टी । निवासस्थानाची आटाटी । सर्वथा पोटीं न धरावी ॥ ४० ॥ जेथ बहु काळ वसती घडे । त्या ठायाचा अभिमान चढे । वसतिस्थान ऐसें कुडें । वस्तीचें सांकडें सर्वथा न धरीं ॥ ४१ ॥ तूं सर्वीं सर्वगत होसी । सर्वाधार सर्वदेशी । ऐसा मी होऊन मज पावसी । न हालतां येसी निजधामा ॥ ४२ ॥ मज निजधामा न्यावें । होतें पुशिलें उद्धवें । तें निजबोधस्वभावें । स्वयें केशवें सांगितलें ॥ ४३ ॥ न करितां हे उपायस्थिती । सर्वथा न घडे माझी प्राप्ती । मग तूं निजधामाप्रती । कैशा गती येशील ॥ ४४ ॥ गरुडीं बाऊनी वेगेंसीं । न्यावें निजधामा म्हणसी । गति तेथ नाहीं पांखांसी । गम्य गरुडासी तें नव्हे ॥ ४५ ॥ सांडूनि उभय पक्षांसी । साधक पावती मद्रूपासी । पक्षाभिमान असे गरुडासी । गमन त्यासी तेणें नव्हे ॥ ४६ ॥ म्हणसी न्यावें घेवोनि खांदीं । मज खांदुचि नाहीं त्रिशुद्धी । तुज न सांडितां अहंबुद्धी । गमनसिद्धि तेथ नाहीं ॥ ४७ ॥ न त्यागितां अहंभावस्थिती । केल्या नाना उपाययुक्ती । तेणें निजधामाप्रती । नव्हे गती सर्वथा ॥ ४८ ॥ जें जें देखसी साकार । तें तें जाण पां नश्वर । तेचि विखींचा निर्धार । करीं साचार निजबोधें ॥ ४९ ॥

यदिदं मनसा वाचा चक्षुर्भ्यां श्रवणादिभिः । नश्वरं गृह्यमाणं च विद्धि मायामनोमयम् ॥ ७ ॥

जें जें दृष्टीं देखिलें । तें तें दृश्यत्वें वाळिलें । जें जें श्रवणा गोचर झालें । तेंही वाळिलें शब्दत्वें ॥ ५० ॥ जें जें वाचा वदे । तें तें वाळिजे जल्पवादें । वाचिक सांडविलें वेदें । नेति नेति शब्दें लाजिला ॥ ५१ ॥ जें जें संकल्पें आकळिलें । तें तें कल्पित पैं झालें । जें जें अहंकारा आलें । तें तें वाळिलें विजातीय ॥ ५२ ॥ जें जें इंद्रियें गोचरें । तें तें जाण पां नश्वरें । हें नित्यानित्यविचारें । केलें

समदृष्टि होऊन सृष्टींत समभावानेंच संचार कर. तूं आपल्या मनांत निवासस्थानाची काळजी मुळींच वाहूं नकोस. ४० एखाद्या जागेंत अल्पकाळहि जरी राहिलें तरी त्या जागेचा अभिमान वाटूं लागतो. असें तें वसतिस्थान वाईट असतें. म्हणून रहाण्याची काळजी तूं मुळींच करूं नकोस. ४१ तूं मजप्रमाणें सर्वगत-सर्वव्यापी झालास म्हणजे मला प्राप्त होशील. जागेवरून न हालतांच निजधामला येशील. ४२ 'मला निजधामाला न्या' अशी उद्धवानें विनंति केली होती, त्याचें उत्तर केशवानें आत्मबोधाच्या रूपानें दिलें. ४३ हे उपाय जर केले नाहींस, तर तुला माझी प्राप्ति कधींच होणार नाहीं. मग तूं निजधामाला कोणत्या मार्गानें येशील ! ४४ 'गरुडावर बसवून मला सत्वर निजधामाला न्या' असें म्हणतोस; पण तेथें पक्ष्यांची गति नसल्यामुळें गरुडाचा प्रवेशहि होऊं शकत नाहीं. ४५ साधक दोन्ही पक्ष सोडूनच मद्रूप होतात; पण गरुड पक्षाभिमानी असल्यामुळें त्याला तेथें जातां येत नाहीं. ४६ 'मला खांद्यावर बसवून ने' असें जर म्हणशील तर मला मुळीं खांदाच नाहीं. याकरितां तुला अहंकार सोडल्यावांचून तेथें येतां येणार नाहीं. ४७ अहंभाव सोडल्यावांचून कितीहि उपाय व युक्ति योजिल्या तरी निजधामांत प्रवेश होत नाहीं. ४८ म्हणून जेवढी साकार वस्तु आहे तेवढी सर्व नाशिवंत आहे, असा तूं आत्मबोधानें निश्चय कर. ४९.

—अहोपण, गुणदोषांनीं विषम झालेल्या लोकांमध्यें मी समदृष्टि कां ठेवूं ! पुढील श्लोकांत त्याचें उत्तर—

यत् इदं मनसा वाचा चक्षुर्भ्यां श्रवणादिभिः गृह्यमाणं तत् मनोमयं माया विद्धि—हें जें मनानें, वाणीनें, चक्षूंनीं व श्रवणादिकांनीं ग्रहण केलें जाणारें द्वैत तें मनोमय असल्यामुळें माया आहे असें जाण. **नश्वरं च विद्धि**—आणि तेंहि स्थिर नाहीं, नश्वर आहे असें समज. ७.

जें जें दृष्टीनें पाहिलें, तें दृश्यत्वामुळें नाहींसें झालें. जें जें कानांनीं श्रवण केलें, तें सर्व शब्दत्वानें लय पावलें. ५० जें जें वाणीनें उच्चारिलें, तेंहि वितंडवादानें नाहींसें झालें. म्हणून वेदानें बोलणेंच सोडून 'नेति' या शब्दानें लक्षणावृत्तीनें माझा बोध केला. ५१ संकल्पानें जें कल्पिलें तें सर्व कल्पिच ठरलें व जें अहंकाराचा विषय झालें, तें विजातीय ठरलें. ५२ वास्तव जेवढें इंद्रियगोचर आहे तेवढें सर्व नश्वर आहे, असें नित्यानित्य-

खरें निश्चित ॥ ५३ ॥ तोही नित्यानित्यविवेक । जाण पां निश्चित मायिक । एवं मायामय हा लोक । करी संकल्पसृष्टीतें ॥ ५४ ॥ जेव्हडा देखसी संसार । तेव्हडा मायिक व्यवहार । हा बोळख तूं साचार । धैर्यनिर्धार धरोनी ॥ ५५ ॥ जैशी स्वप्नींची राणिव । केवळ भ्रमचि जाणिव । तैसेंचि जाण हें सर्व । भववैभवविलास ॥ ५६ ॥

पुंसोऽयुक्तस्य नानार्थो भ्रमः स गुणदोषभाक् । कर्माकर्मविकर्मेति गुणदोषधियो भिदा ॥ ८ ॥

परमात्मेंसीं जो विभक्त । तो पुरुष बोलिजे अयुक्त । त्यासी नानात्वें भेदु भासत । निजीं निजत्व विसरोनि ॥ ५७ ॥ त्या विसराचेनि उल्हासें । मिथ्या भेदु सत्यत्वें भासे । त्या भेदाचेनि आवेशें । अवश्य दिसे गुणदोषु ॥ ५८ ॥ जरी भेदूचि नाहीं । तरी गुणदोषु नाहीं । दिसावया ठावो नाहीं । शुद्धीचे ठायीं सर्वथा ॥ ५९ ॥ यालागीं भेदाच्या उद्भटीं । गुणदोषदृष्टी उठी । तेथें कर्माकर्मत्रिपुटी । भेददृष्टी ठसावे ॥ ६० ॥ भेदें थोर केलें विषम । कर्म अकर्म विकर्म । जन्ममरणादि धर्म । निजकर्म प्रकाशी ॥ ६१ ॥ कर्में विकर्में नरकयातना । काम्यकर्में स्वर्गु जाणा । कर्मेंचि करूनि कर्ममोचना । समाधाना पाविजे ॥ ६२ ॥ येथ म्हणसी कर्म कोण । अकर्माचें काय लक्षण । विकर्माचा कवण गुण । तेंही संपूर्ण परिस पां ॥ ६३ ॥ काया वाचा अथवा मन । करिजे तितुकें कर्म जाण । सूक्ष्म स्फूर्तीचें जें भान । तें मूळ जाण कर्माचें ॥ ६४ ॥ मनसा वाचा देहीं । सर्वथा कर्मबीज नाहीं । अकर्म म्हणिजे तें पाहीं । न पडे ठायीं देहवंता ॥ ६५ ॥ जें कर्मावेगळें सर्वांगें । जेथ कर्म लावितांही न लगे । जें

विवेकानें निश्चित केलें आहे. ५३ पण तो नित्यानित्यविवेकहि मायिकच आहे. एकंदरींत हीं सर्व सृष्टीच मायामय आहे. माया संकल्पसृष्टि निर्मिते. ५४ जेवढा म्हणून संसार पहातोस तो सर्व मायिक व्यवहार आहे, हें तूं धैर्यानें निर्धार करून ओळख. ५५ स्वप्नांतील राज्य जसें भ्रामक तसाच हा सर्व संसारवैभवाचा विलास मायिक आहे, असें समज ५६.

—याच्या मनोमयत्वाविषयीं हेतु—

पुंसः अयुक्तस्य नानार्थः भ्रमः—पुरुषांच्या विक्षिप्त मनाचा हा द्वैतविषय भ्रम आहे. सः गुणदोषभाक्—तो भ्रम गुणदोषांनीं युक्त आहे. (' अहोपण, वेदानेंच विधिनिषेधांच्या योगानें भेदाची सत्यता सांगितली आहे' असें जर म्हणशील तर तें बरोबर नाहीं. कारण) गुणदोषधियः कर्माकर्मविकर्म इति भिदा—गुण व दोष या भ्रमजन्य बुद्धीनें युक्त असलेल्या पुरुषाला उद्देशून वेदानें कर्म सांगितलें आहे. अर्थात् अविद्यावान् पुरुषालाच कर्म, अकर्म व विकर्म हा भेद असतो. (अकर्म म्ह० कर्माचा लोप व विकर्म म्ह० निषिद्धकर्म. अविद्यावान् पुरुषाला विषय करूनच वेद प्रवृत्त झाला आहे, असा याचा भावार्थ.) ८.

परमात्म्याहून जो मनुष्य भिन्न असतो त्याला अयुक्त म्हणतात. आपल्याच आत्मस्वरूपाचा विसर पडल्या-मुळें त्याला अनेक भेद भासूं लागतात. ५७ त्या विस्मरणाच्या भरांत त्याला काल्पनिक भेद सत्य भासतात व त्या भेददृष्टीच्या आवेशांत त्याला गुणदोष अवश्य दिसतात. ५८ मुळीं भेदच जर नाहीं तर शुद्धवस्तूंत गुणदोष दिसावयाला अवसरच उरत नाहीं. ५९ भेदाच्या बळानेंच गुणदोषदृष्टि उत्पन्न होते, व कर्माकर्माची त्रिपुटी भेददृष्टीनें ठसते. ६० भेदानें फार विपरीत परिणाम केले आहेत. तो कर्म, अकर्म, विकर्म, जन्म-मरणादि धर्म व स्वकर्म यां सर्वांस प्रकाशित करितो. ६१ कर्म व विकर्म नरकयातना भोगावयास लावितात. काम्यकर्म स्वर्ग देतें. यास्तव कर्मानेंच निष्कर्म होऊन समाधान मिळवावें. ६२ तूं म्हणशील कीं तें कर्म कोणतें? अकर्माचें लक्षण काय? विकर्माचा गुण कोणता? तर तें सविस्तर ऐक. ६३ काया, वाचा आणि मन यांनीं जें होतें तें सर्व कर्म जाण. स्फूर्तीचें जें सूक्ष्म भान तें कर्माचें मूळ होय. ६४ कर्माचें बीज मनांत, वाणींत किंवा देहांत मुळींच नाहीं. ज्याला अकर्म म्हणतात तें देहवानाच्या हातून घडणें शक्यच

नव्हे कर्मठाजोगें । तें जाण सवेगें अकर्म ।। ६६ ।। विधिनिषेधजोडेपाडें । जेथ विशेष कर्म वाढे । विकर्म त्यातें म्हणणें घडे । थोर सांकडे पैं यांचें ।। ६७ ।। कर्म सर्वसाधारण । तेंचि विकारातें पावलें जाण । उठिले विधिनिषेध दारुण । विकर्म जाण तें म्हणिजे पैं ।। ६८।। जें विधिसी नातुडे । तें निषेधाचे अंगा चढे । करितां चुके ठाके विकळ पडे । तेंही रोकडें निषिद्धची ।। ६९ ।। ऐसें कर्म विकारलें । तें विकर्मपदें वाखाणिलें । एवं कर्माकर्म दाविलें । विभागनिमित्त तुज ।। ७० ।। जीवासी आविद्यक उत्पत्ती । त्याची कर्मै आविद्यकें होती । श्रीधरव्याख्यानाची युक्ती । तेही उपपत्ती परियेसीं ।। ७१ ।। अविद्यायुक्त जीव परम । त्यासी नित्यक्रिया तेंचि कर्म । नित्य न करणें तें अकर्म । विकर्म तें निषिद्ध ।। ७२ ।। ऐशी कर्माकर्मविकर्मत्रिपुटी । भेदानुरूपें वाढली सृष्टीं । तेथ गुणदोषबुद्धीच्या पोटीं । भेददृष्टी वाढती ।। ७३ ।। अभेदीं भेदु कैसा उठी । जेणें गुणदोषीं नांदे दृष्टी । विधिनिषेधीं पाडी गांठी । तेही गोठी परियेसीं ।। ७४ ।। पुरुष एकु एकला असे । तोचि मनोरथपूजे बैसे । ध्येयध्याताध्यानमिसें । वाढवी पिसें भेदाचें ।। ७५ ।। तेथें नाना परींचे उपचार । पूजासामग्रीसंभार । ऐसा एकपणीं अपार । भेदु साचार वाढवी ।। ७६ ।। तेथ ध्येय उत्तम म्हणे जाण । ध्याता नीच होये आपण । तदंगें ध्यान गौण । गुणदोष जाण वाढवी ।। ७७ ।। ध्यानीं गुणदोष विचित्र । ध्येय म्हणे परम पवित्र । ध्याता आपण होये अपवित्र । शौचाचारदोषत्वें ।। ७८ ।। एवं ध्यानाचिये दृष्टीं । आपणचि आपुल्या पोटीं । गुणदोषांची त्रिपुटी । भेददृष्टी वाढवी ।। ७९ ।। ध्येय ध्याता ध्यान । आघवाचि आहे आपण । तें सांडोनियां जाण । गुणदोषलक्षण वाढवी ।। ८० ।। उद्धवा हे अवघी सृष्टी । वाढली असे भेददृष्टीं । तेणें भेदें उठाउठी । कर्मत्रिपुटी वाढविली ।। ८१ ।। जंव जंव भेदाचा जिव्हाळा । जंव जंव विषयांचा सोहळा । पाळिजे इंद्रियांचा लळा ।

नाहीं. ६५ जें कर्माहून सर्वथा भिन्न, ज्याला कर्म लावूं गेलें तरी लागत नाहीं, जें कर्मठाच्या उपयोगी नाहीं, त्याला अकर्म असें म्हणतात. ६६ विधिनिषेधाला सोडून जें कर्म होतें त्याला विकर्म म्हणतात. तें मोठ्या संकटांत टाकणारें आहे. ६७ सर्वसाधारण कर्मांत विकृति होऊन त्यांत मोठाले विधिनिषेध उत्पन्न झाले म्हणजे तेंच विकर्म होतें. ६८ जें विधीला धरून नाहीं तें निषेधयुक्तच असणार, त्यामुळें तें आचरितांना दोष घडतात किंवा त्यांत खंड पडतो, म्हणून तें कर्म खरोखर निषिद्धच होय. ६९ अशा विकृत कर्माचें 'विकर्म' या नांवानें वर्णन करून तुला याप्रमाणें कर्म व अकर्म या विभागाचें निमित्त मीं दाखविलें. ७० अज्ञानामुळेंच जीवांची उत्पत्ति झाली आहे. तेव्हां त्यांचीं कर्मेंहि अज्ञानयुक्तच असणार. त्यासंबंधीं श्रीधरस्वामींनीं केलेल्या व्याख्यानाची उपपत्ति ऐक. ७१ जीव अत्यंत अविद्यायुक्त आहे. नित्यक्रिया हेंच त्याचें कर्म आहे. तें न आचरणें म्हणजे अकर्म झालें आणि निषिद्ध कर्म करणें हें विकर्म होय. ७२ अशी भेदानुरूप कर्माकर्मांची त्रिपुटी सृष्टीमध्यें वाढते व गुणदोषबुद्धीच्या पोटांत भेददृष्टिहि वाढत जाते. त्याच्या योगानें गुणदोषांत दृष्टि रहाते व विधिनिषेधाच्या गांठी पडतात. ७३ अभेदांत असा भेद कसा रहातो, असें जर म्हणशील, तर त्याविषयीं ऐक. ७४ पुरुष अगदीं एकटा असतो तो मनोरथाच्या पूजेला बसतो व ध्येय, ध्याता आणि ध्यान यांच्या निमित्तानें भेदाचें वेड पसरवितो. ७५ तेथें विविध प्रकारचे उपचार, पूजेचें साहित्य, सामग्री यांनीं तो आपल्या एकटेपणांत अनेक भेद वाढवितो. ७६ तेथें तो ध्येयाला उत्तम म्हणतो. तो ध्याता स्वतःला नीच समजतो. त्यामुळें त्याचें ध्यानहि गौण होऊन गुणदोषांना वाढवितें. ७७ ध्यानामध्यें विचित्र गुणदोष आहेत. ध्यानाला तो परमपवित्र म्हणतो व शौच आणि आचार यांच्या योगानें स्वतःला तो ध्याता अपवित्र मानितो. ७८ याप्रमाणें ध्यानाच्या दृष्टीनें आपणच आपल्या मनांत गुण-दोषांची त्रिपुटी व भेदबुद्धि वाढवितो. ७९ ध्येय, ध्याता व ध्यान हें सर्व आपणच आहोंत असा निश्चय करावयाचा सोडून तो गुण-दोषांचें स्वरूपच वाढवीत बसतो. ८० हे उद्धवा ! ही सारी सृष्टि भेददृष्टीनेंच वाढलेली आहे आणि त्या भेदामुळेंच कर्माची त्रिपुटीहि त्याच्या मागोमाग वाढली. ८१ भेदावरील आसक्ति जशी वाढत जाते तसा तसा विषयांचा सोहळा अनुभवास

तंव तंव आगळा संसारू ॥ ८२ ॥ सापा पाजिजे पीयूख । तेंचि परतोनि होय विख । तैसें इंद्रियां दीजे जंव जंव संतोख । तंव तंव दुःख भोगिजे ॥ ८३ ॥

तस्माद्युक्तेन्द्रियग्रामो युक्तचित्त इदं जगत् । आत्मनीक्षस्व विततमात्मानं मय्यधीश्वरे ॥ ९ ॥

यालागीं इंद्रियांच्या द्वारीं । विषयो नेदावा चतुरीं । जेवीं विषें रांधिली क्षीरधारी । सांडिजे दूरी न चाखतां ॥ ८४ ॥ घमघमित अमृतफळें । वरी सर्पें घातलिया गरळें । तें न सेविती काउळे । सेवनीं कळे निजघातु ॥ ८५ ॥ तैसें सेवितां विषयांसी । कोण गोडी मुमुक्षांसी । प्रतिपदीं आत्मघातासी । अहर्निशीं देखतां ॥ ८६ ॥ आत्मघातु न देखती । ते विषयी विषयो सेविती । जैशी दिवाभीता मध्यराती । असतां गभस्ती मध्यान्हीं ॥ ८७ ॥ तैसेंचि विषयसेवन । मुमुक्षांसी घडे जाण । तेणें न चुके जन्ममरण । आत्मपतन तयाचें ॥ ८८ ॥ म्हणसी प्राणियांची स्थिती । विषयांवरी निश्चितीं । विषयत्यागें केवीं राहती । ते सुगम स्थिती अवधारीं ॥ ८९ ॥ असतां इंद्रियांचा नेमु । करी चित्ताचा उपरमु । ऐसा दोहींपरी सुगमु । उत्तमोत्तमु हा त्यागु ॥ ९० ॥ इंद्रियें असोतु विषयांवरी । मन रिघों नेदी त्याभीतरीं । हाही त्यागू सर्वांपरी । योगेश्वरीं बोलिजे ॥ ९१ ॥ मनासी विषयांचें बळ । विषयध्यासें तें चपळ । नव्हे म्हणसी तें निश्चळ । ऐक समूळ उपावो ॥ ९२ ॥ माझें स्वरूप सर्वगत । मना बाहेरीं आणि आंत । जेथ जेथ जाईल चित्त । तेथ तेथ तें असे ॥ ९३ ॥ मजवेगळें जावयासी । ठावो नाहीं पैं चित्तासी । स्वदेशीं हो परदेशीं । अहर्निशीं मजआंतू ॥ ९४ ॥ ऐसें निजरूप सतत । पाहतां थोरावेल

येतो. इंद्रियांचे लाड जसे पुरवावे तसा तसा संसार वाढत जातो. ८२ सापाला अमृत पाजिलें तरी तें जसें पुनः विषच व्हावयाचें, त्याप्रमाणें इंद्रियांना जों जों सुख द्यावें तों तों दुःख भोगावें लागतें. ८३.

तस्मात् युक्तेंद्रियग्रामः युक्तचित्तः इदं विततं जगत् आत्मनि ईक्षस्व—म्हणून आपल्या इंद्रियसमूहाला नियत करून व चित्तालाहि आत्म्यामध्यें समाहित करून हें विस्तीर्ण जगत् आत्म्यामध्यें पहा. ('अहोपण, परिच्छिन्न आत्म्यामध्यें हें विस्तीर्ण जगत् कसें पहावें ?' उत्तर—) आत्मानं मयि अधीश्वरे (ईक्षस्व)—आणि आत्म्याला मज ब्रह्मामध्यें म्ह० ब्रह्मस्वरूपानें पहा. ९.

हुशार माणसानें, ज्याप्रमाणें विष घालून शिजविलेल्या खिरीचा एक थेंबहि तोंडांत न टाकतां ती दूर फेकून द्यावी, त्याप्रमाणें शहाण्या माणसानें इंद्रियांच्या दारांत विषयांचें पाऊलहि पडूं देऊं नये. ८४ रसयुक्त मधुर आंब्यावर सर्पानें गरळ टाकिलें असतां तें फळ कावळेहि खात नाहींत, कारण त्यानें आत्मघात होईल, हें त्यांना ठाऊक असतें. ८५ त्याप्रमाणें मुमुक्षूंना विषयांच्या सेवनाची गोडी कशी वाटावी ! पावलोपावलीं त्यांत त्यांना आत्मघात दिसत असतो. ८६ जे विषयी लोक त्यांतील आत्मघात पहात नाहींत, ते विषयांचें सेवन करितात. ज्याप्रमाणें वटवाघुळ भर दोनप्रहरीं सूर्य तळपत असतांहि मध्यरात्र समजतें, ८७ त्याप्रमाणें मुमुक्षु विषयसेवनाला अज्ञाननिशा समजतात. कारण त्या विषयांच्या योगानें जन्म मरण तर चुकत नाहींच उलट आत्मपतन मात्र होतें. ८८ प्राण्यांची उपजीविका विषयांवरच चालते, तेव्हां विषयत्याग करून ते कसे रहातील ! असें जर म्हणशील तर त्याचाहि सुलभ उपाय ऐक. ८९ इंद्रियांचा निग्रह केला असतां चित्त शांत होतें. असा दोन्ही प्रकारें हा त्याग सोपा व उत्तमोत्तम आहे. ९० इंद्रियें विषयांकडे जाईनांत कां ! मन मात्र त्यांत आसक्त होऊं देऊं नये. यालाहि श्रेष्ठ योगी त्यागच म्हणतात. ९१ मनाला विषयांचें बळ मिळालें म्हणजे विषयांच्या ध्यासानें तें चंचळच होईल. निश्चल होणार नाहीं, असें जर म्हणशील तर त्याचाहि उपाय ऐक. ९२ माझें स्वरूप सर्वव्यापी आहे. तें मनाच्या आंत व बाहेरहि आहे. जेथें जेथें मन जाईल तेथें तेथें तें आहेच. ९३ जेथें मी नाहीं अशी मुळीं चित्ताला जाण्यास जागाच नाहीं. तें स्वदेशीं, परदेशीं, सर्व ठिकाणीं अहोरात्र माझ्या आंतच आहे. ९४ याप्रमाणें तूं

चित्त । त्या चित्तामाजीं आद्यंत । पाहें समस्त हें जग ॥ ९५ ॥ अथवा जीवस्वरूप तुझें चांग । त्यामाजी पाहतां हें जग । जगचि होईल तुझें अंग । अतिनिर्व्यंग निश्चित ॥ ९६ ॥ चरें आणि अचरें । लहानें आणि कां थोरें । जीवरूपीं सविस्तरें । पाहें निर्धारें तूं हें जग ॥ ९७ ॥ म्हणसी जीवु तो एकदेशी । त्यामाजीं केवीं पहावें जगासी । त्यासी ऐक्यता करीं मजसीं । जेवीं कनकेंसीं अळंकार ॥ ९८ ॥ चिंतितां कीटकी भिंगुरटी । तेचि ते होऊनि उठी । तैसा तूं उठाउठीं । होईं निजदृष्टीं निजतत्त्व ॥ ९९ ॥ हो कां सैंधवाचा खडा । पडल्या सिंधूमाजिबडा । तो होवोनि ठाके त्याएवढा । तैसा तूं रोकडा मी होसी ॥ १०० ॥ जेथ मीतूंपणाचा भेद । फिटोनि जाईल विशद । परमानंदें शुद्धबुद्ध । मुक्त सिद्ध तूं होसी ॥ १ ॥

ज्ञानविज्ञानसंयुक्त आत्मभूतः शरीरिणाम् । आत्मानुभवतुष्टात्मा नान्तरायैर्विहन्यसे ॥ १० ॥

शास्त्रश्रवणें दृढ ज्ञान । मननाभ्यासें होय विज्ञान । या दोहींची जाणूनि खूण । ब्रह्मसंपन्न तूं होईं ॥ २ ॥ ऐसिया स्वार्थाचेनि लवलाहें । अविश्रम भजावे तुझे पाये । म्हणसी बोढवतील अंतराये । त्यासी काये करावें ॥ ३ ॥ सांडोनि दांभिक लौकिक । त्यजोनियां फलाभिलाख । जो मज भजे भाविक । विघ्न देख त्या कैंचे ॥ ४ ॥ त्याच्या विघ्ननाशासी देख । करीं चक्राची लखलख । घेऊनि पाठीसी अचुक । उभा सन्मुख मी असें ॥ ५ ॥ यापरी गा उद्धवा । जो मज भजे निजभावा । त्यासी विघ्न

आत्मस्वरूप सतत पाहूं लागलास म्हणजे तुझें चित्त व्यापक होईल. मग तूं हें सर्व जगत् आदीपासून अंतापर्यंत त्यांतच पहाशील ९५ अथवा तुझें जीवस्वरूप फार चांगलें आहे. त्यांत तूं हें जगत् पाहूं लागलास म्हणजे तुझें सकळ अंगच जगत् होईल, ९६ चराचर, लहानथोर इत्यादि हें सर्व विस्तीर्ण जगत् तूं आपल्या जीवस्वरूपांत पहा. ९७ 'जीव तर एकदेशी आहे, त्यांत सर्व जगत् कसें पहावें' असें जर ह्मणशील तर सोनें आणि त्याचे अलंकार हीं जशीं एकरूप आहेत, त्याचप्रमाणें जगतहि सद्रूपच आहे, असें जाण. ९८ कीटकानें गांधीलमाशीचा ध्यास केल्यानें तो स्वतः तीच होऊन उठतो, त्याप्रमाणें तूंहि आत्मध्यासानें तत्काळ तद्रूप बनशील. ९९ मिठाचा खडा समुद्रांत पडला म्हणजे तो जसा समुद्राएवढा होऊन रहातो, त्याप्रमाणें तूंहि साक्षात् मद्रूप होशील. १०० ज्यावेळीं मी-तूंपणाचा भेद सर्वदा पार निघून जाईल त्यावेळीं तूं परमानंदानें शुद्ध, बुद्ध, मुक्त व सिद्ध होशील. १०१.

—'अहोपण, याप्रमाणें युक्तचित्त होऊन कर्माचें अनुष्ठान न केल्यास देवादिक विघ्नें करतील' असें उद्धव म्हणेल म्हणून भगवान् सांगतात—

ज्ञानविज्ञानसंयुक्तः–परोक्ष व अपरोक्ष ज्ञानानें संयुक्त झालेला, शरीरिणां आत्मभूतः–सर्व शरीरीजीवांचा आत्मभूत, आत्मानुभवतुष्टात्मा–आत्मानुभवानें ज्याचें चित्त संतुष्ट झालें आहे असा तूं, अंतरायैः न विहन्यसे–विघ्नांकडून प्रतिबद्ध होणार नाहींस. [वेदाच्या तात्पर्याचा निश्चय हें ज्ञान व त्याच्या अर्थाचा अनुभव हें विज्ञान, यांनीं चांगल्याप्रकारें युक्त झालेला, त्यामुळेंच आत्मानुभवानें संतुष्टचित्त, म्हणूनच देवादि जीवांचा आत्मभूत झालेला, अशा तुला देव विघ्न करणार नाहींत. आत्मानुभव येईपर्यंत आपल्या आश्रमाप्रमाणें कर्में करावीं. त्यानंतर सर्वांचा आत्माच झाल्यामुळें त्या ज्ञान्याला कोणीहि विघ्न करीत नाहीं. बृ. भा. १.४.१०.पृ. २५४ पहा.] १०.

शास्त्रश्रवणानें ज्ञान दृढ होतें. वारंवार मनन केल्यानें अनुभवज्ञान प्राप्त होतें. या दोहोंचें लक्षण जाणून तूं ब्रह्मस्वरूप हो. २ 'पण अशा रीतीनें स्वार्थासाठीं त्वरेनें तुझ्या पायांचें भजन करावें, हें खरें; पण त्यांत विघ्नें येतील, त्यांस काय करावें ?' ३ असें जर म्हणशील तर जो भक्त दंभ आणि लौकिक सोडून व फलासक्ति टाकून माझें भजन करितो, त्याला विघ्न कोठचें ! ४ त्याच्या विघ्नांचा नाश करावयास मी हातांत लखलखीत चक्र घेऊन विघ्नांच्या मागोमाग येऊन त्याच्यापुढें नेमका उभा असतों. ५ उद्धवा ! याप्रमाणें आत्मभावानें जे

करावया देवां । नव्हे उठावा मज असता ॥ ६ ॥ एवं ब्रह्मसंपन्न जाहल्यावरी । आत्मा तूंचि चराचरीं । जंगमीं आणि स्थावरीं । सुरासुरीं तूंचि तूं ॥ ७ ॥ तुजहूनि कांहीं । अणुभरी वेगळें नाहीं । तेथ विघ्न कैंचें कायी । तुझे ठायीं बाधील ॥ ८ ॥ ब्रह्मादिकांसी जो ग्रासी । त्या काळाचा तूं आत्मा होसी । पाठी थापटून हृषीकेशी । उद्धवासी सांगतु ॥ ९ ॥ ऐशी बाध्यबाधकता फिटली । संकल्पकल्पना तुटली । ब्रह्मानंदें पाहांट फुटली । वाट मोडली कर्माची ॥ ११० ॥ ऐसा ब्रह्मानुभवी जो देख । कर्म तेथ होय रंक । वेद तयाचे सेवक । विधिविवेक कामारे ॥ ११ ॥ हेंचि किती सांगों कायी । मी त्याचा आज्ञाधारक पाहीं । प्रतिष्ठिती जे जे ठायीं । तेथ पाहीं प्रगटतु ॥ १२ ॥ वचनमात्रासाठीं । प्रगटलों कोरडे काष्ठीं । दुर्वासा वाइला पाठीं । त्वांही दिठीं देखिलें ॥ १३ ॥ म्हणसी देवो ज्याचा आज्ञाधरू । कर्म त्याचें होय किंकरू । तरी ज्ञाते यथेष्टाचारू । विषयींचें साचारू विचरती ॥ १४ ॥ ज्ञात्यासी स्वेच्छा विषयाचरण । सर्वथा न घडे गा जाण । तेंही विषयीं लक्षण । सावधान परियेसीं ॥ १५ ॥ ज्यासी दग्धपटअभिमान । मिथ्या प्रपंचाचें भान । मृषा विषयांचें दर्शन । विषयाचरण त्या नाहीं ॥ १६ ॥ जयासी प्रपंचाची आवडी । विषयांची अतिगोडी । यथेष्टाचरणाची वोढी । पडे संसारसांकडी तयासी पैं ॥ १७ ॥ ज्ञातयाच्या ठायीं । सत्यत्वें विषयो नाहीं । मा भोगावया कायी । अभिलाषी पाहीं तो होईल ॥ १८ ॥ आतां ज्ञातयाचें कर्म । ऐक सांगों त्याचें वर्म । नातळतां मनोधर्म । क्रियाधर्म आचरती ॥ १९ ॥

दोषबुद्ध्योभयातीतो निषेधान्न निवर्तते । गुणबुद्ध्या च विहितं न करोति यथाऽर्भकः ॥ ११ ॥

माझें भजन करितो, त्याला विघ्न करण्यास मी समोर असतां देवहि धजत नाहींत. ६ याप्रमाणें ब्रह्मसंपन्न झाल्यावर चराचर, स्थावर, जंगम, देव-दानव या सर्वांतील आत्मा तूंच होऊन रहाशील. ७ तुझ्याहून वेगळें एक अणुभरहि कांहीं रहाणार नाहीं. मग तेथें विघ्न तुला कसें बाधणार ! ८ ब्रह्मादिकांनाहि ग्रासणारा जो काळ त्याचा तूं आत्मा होशील, असें श्रीकृष्णानें उद्धवाची पाठ थोपटून त्याला सांगितलें. ९ याप्रमाणें बाध्यबाधकता नाहींशी होते, संकल्पाची कल्पना निघून जाते, ब्रह्मानंदाची पहांट झाली म्हणजे कर्माची वाट मोडते, ११० असा तो ब्रह्मानुभवी झाला म्हणजे कर्म दुर्बल होतें व वेद त्याचे सेवक होतात, विधिविवेक त्याचे दास होतात, ११ हेंच आणखी किती आणि काय काय म्हणून सांगावें ! मी देखील त्यांच्या आज्ञेंत रहातों. ते स्वतः जेथें उभे असतात तेथें तेथें मी प्रकट होतों. १२ आपला शब्द राखण्यासाठीं नरसिंहअवतारामध्यें मला कोरड्या लांकडांत प्रकट व्हावें लागलें. दुर्वासाला तर मी पाठीवर वाहून नेलेलें तूं प्रत्यक्षच पाहिलें आहेस. १३ तूं जर म्हणशील कीं देवच जर त्यांच्या आज्ञेंत राहिला तर कर्म सहजच त्यांचें सेवक होणार, आणि मग ज्ञाते खुशाल यथेष्टाचरणांत प्रवृत्त होतील, १४ पण ज्ञात्यांचें यथेष्टाचरण कधींच संभवत नाहीं, असें तूं जाण. त्याचेंहि कारण सांगतों, तें तूं लक्षपूर्वक ऐक. १५ जो जळालेल्या वस्त्रांवरील अभिमानाप्रमाणेंच प्रपंचभान मिथ्या समजतो, त्याला विषयदर्शनहि मिथ्याच आहे. म्हणून त्याला विषयाचरणहि नाहीं. १६ ज्याला प्रपंचाची अतिशय आवड असते, विषयाची गोडी असते व यथेष्टाचरणाची ओढ असते, तोच संसारसंकटांत सांपडतो. १७ पण ज्ञानी विषयांचा मुळीं खेदच मानीत नाहीं, मग तो भोगणार काय व आसक्त होणार कशावर ? १८ आतां ज्ञात्याच्या कर्मांतील रहस्य सांगतों, तें ऐक. तो मनोधर्माला स्पर्श न करितां सर्व कर्में व सर्व धर्म आचरीत असतो. ११९.

—'ज्याला आत्मज्ञान झालें आहे, त्याच्या यथेष्ट आचरणाचाहि प्रसंग येत नाहीं' असें भगवान् सांगतात—

उभयातीतः निषेधात् दोषबुद्ध्या न निवर्तते–गुणबुद्धि व दोषबुद्धि या दोहोंचेंहि ज्यानें उल्लंघन केलें आहे असा ज्ञानी दोषबुद्धीनें निषेधापासून निवृत्त होत नाहीं तर पूर्वसंस्कारामुळेंच निषेधापासून निवृत्त होतो. गुणबुद्ध्या च विहितं न करोति–गुणबुद्धीनें विहित कर्म करीत नाहीं. तेंहि पूर्वसंस्कारानेंच करितो. यथा अर्भकः–ज्याप्रमाणें संकल्प-विकल्पानें रहित असलेलें बालक यदृच्छेनें कांहीं करितो, व कांहीं करीत नाहीं त्याप्रमाणें. ११.

गुणदोषातीत ज्ञाता । तो निषेधीं न वर्ते सर्वथा । परी भ्यालेपण चित्ता । नाहीं तत्त्वतां तयासी ॥ १२० ॥ तो विहितही कर्म करी । तेथ गुणत्वें बुद्धि न धरी । कुलालचक्राचिये परी । पूर्वसंस्कारीं वर्तत ॥ २१ ॥ संकल्पु नाहीं वृत्तीं । हेतु स्फुरेना चित्तीं । ऐसीं कर्में ज्ञाते करिती । शरीरस्थितीं केवळ ॥ २२ ॥ तेथ सत्कर्म सिद्धी गेलें । तेणें फुगेना म्यां हें केलें । अथवा माझारीं विकळ पडिलें । तेणें तगमगिलेपण नाहीं ॥ २३ ॥ निद्रितामागें बैसला वाघु । अथवा पुढें आला स्वर्गभोगु । त्यासी नाहीं रागविरागु । तैसा लागु ज्ञात्याचा ॥ २४ ॥ गुणदोषीं चित्तवृत्ती । सांडोनियां सहजस्थिती । बाळकें जेवीं क्रीडती । तैशी स्थिति ज्ञात्याची ॥ २५ ॥ अभिमानें कर्मप्राप्ती । त्या अभिमानातें त्यागिती । मग निरभिमानें केवीं तर्तती । कर्मस्थिति त्यां न घडे ॥ २६ ॥ ऐसा विकल्पु जरी करिसी । ते स्थिति न कळे इतरांसी । निरभिमानता स्वानुभवेंसीं । केवीं येरासी कळेल ॥ २७ ॥ देहप्रारब्धाचेनि मेळें । स्वभावें सर्व कर्मीं चळे । तेथ अज्ञानाचेनि बळें । अभिमानु खवळे मी कर्ता ॥ २८ ॥ तेथ गुरुवाक्यानुवृत्ती । अभ्यासूनि यथानिगुतीं । अज्ञानेंसहित निरसिती । अभिमानस्थिति निजबोधें ॥ २९ ॥ शेष प्रारब्धाचेनि मेळें । निरभिमानें देह चळे । ज्ञाते कर्में करिती सकळें । जाण केवळें शारीरें ॥ १३० ॥ केवळ शारीरें कर्में होतीं । तींच अहेतुक बोलिजेती । अर्भकदृष्टांतें उपपत्ती । हेचि स्थिति सांगितली ॥ ३१ ॥ निरभिमानाचीं लक्षणें । कृष्ण उद्धवातें ऐक म्हणे । येरु आनंदला अंतःकरणें । सादरपणें परिसतु ॥ ३२ ॥

सर्वभूतसुहृच्छान्तो ज्ञानविज्ञाननिश्चयः पश्यन्मदात्मकं विश्वं न विपद्येत वै पुनः ॥ १२ ॥

गुणदोषातीत ज्ञाता निषिद्ध धर्माचें कधींच आचरण करीत नाहीं. त्यामुळें त्याच्या चित्ताला भय कसें तें ठाऊक नसतें. १२० तो विहित कर्महि करितो. पण हा मोठा गुण आहे अशी भावना धरीत नाहीं. कुंभाराच्या चक्राप्रमाणें पूर्वसंस्कारानुरूप वागत असतो. २१ वृत्तींत संकल्प नाहीं व मनांत कोणताच हेतु नाहीं, अशीं कर्में ज्ञाते केवळ देहानेंच करीत असतात. २२ त्यामुळें एखादें सत्कर्म सिद्धीस गेलें म्हणजे 'मीं हें केलें' असें म्हणून तो चढून जात नाहीं व एखादें मध्येंच थांबलें तर त्याची त्याला तळमळ वाटत नाहीं. २३ गाढ निद्रित माणसाच्या मागें वाघ येऊन बसला किंवा स्वर्गभोग त्याच्यापुढें येऊन उभा राहिला तरी त्याबद्दल त्याला जसें भय किंवा लोभ नसतो, तसें ज्ञात्याचें मन असतें. २४ गुणदोषांतील चित्तवृत्ति सोडून बालकांच्या क्रीडेप्रमाणें ज्ञानी सहजस्थितींत रहातो. २५ कर्मप्राप्ति अभिमानानें होत असते. तो अभिमान टाकिला कीं निरभिमानी झालेले ते कसे रहातात ? त्यांना कर्मस्थिति कशी घडत नाहीं ? २६ असा जर तुला संशय वाटेल तर ही स्थिति इतरांना कळण्यासारखी नाहीं. निरभिमानाचा अनुभव घेणारासच ती कळणार, इतरांना कशी कळेल ! २७ देहप्रारब्धाच्या संबंधानें स्वभावतःच तो सर्व कर्में करीत असतो. अज्ञानाच्या बळानेंच अभिमान खवळतो. आणि पुरुष 'मी कर्ता' असें म्हणतो. २८ पण गुरूपदेशाच्या अनुवृत्तीनें व योग्य अभ्यासानें आत्मज्ञान होऊन अज्ञानासह अभिमानाचें निरसन झालें २९ कीं ज्ञानाच्या देह व प्रारब्धशेषानुसार निरभिमानानें वर्तत असतो. ज्ञानी लोकांचीं सर्व कर्में केवळ देहानेंच होत असतात. १३० केवळ देहमात्र जीं कर्में त्यानाच 'अहेतुक कर्में' असें म्हणतात. लहान बालकांची उपमा देऊन मीं याच स्थितीचें स्पष्टीकरण वर केलें आहे. ३१ कृष्ण उद्धवाला म्हणाला 'आतां निरभिमानाचीं लक्षणें ऐक.' तें ऐकून उद्धव मनांत आनंदित होऊन मोठ्या आदरानें ऐकूं लागला. १३२.

——अर्थात् निषिद्धाचरण न करणारा पण तें दोषबुद्धीनें नव्हे, तसेंच प्रायः विहित आचरणच करणारा, पण तेंहि गुणबुद्धीनें नव्हे, असा जो ज्ञानी त्याला पुनः संसार नाहीं, असें सांगतात——

सर्वभूतसुहृत्—सर्व भूतांवर निरपेक्ष उपकार करणारा, **शान्तः**—शांत, **ज्ञानविज्ञाननिश्चयः**—ज्ञान व विज्ञान यांविषयीं निश्चित, **मदात्मकं विश्वं पश्यन्**—मद्रूप विश्व पहाणारा, **पुनः न विपद्येत वै**—पुनः संसारांत येत नाहीं. १२.

पहिलें शास्त्रश्रवणें ज्ञान । तदनुभवें होय विज्ञान । ऐसा ज्ञानविज्ञानसंपन्न । निरभिमान तो होय ॥ ३३ ॥ साचचि निरभिमानता । जरी आली होय हाता । तरी शांति तेथ सर्वथा । उल्हासता पैं पावे ॥ ३४ ॥ दाटूनि निश्चळ होणें । कां दांत चाऊनि साहणें । ते शांति ऐसें कोण म्हणे । आक्रोशपणें साहातु ॥ ३५ ॥ शांति म्हणिजे ते ऐशी । सागरीं अक्षोभ्यता जैसी । चढ वोहट नाहीं तिसी । सर्वदेशी सर्वदा ॥ ३६ ॥ नाना सरितांचे खळाळ । आणूनि घालिती समळ जळ । तो तिळभरी नव्हे डहुळ । अतिनिर्मळ निजांगें ॥ ३७ ॥ तैसी नानाभूतविषमता । स्वार्थविरोधें अंगीं आदळतां । पालटू नव्हे ज्याच्या चित्ता । ते जाण सर्वथा निजशांति ॥ ३८ ॥ ऐशी शांति ज्यासी देखा । तोचि सर्वभूतांचा सखा । आवडता सर्व लोका । सुहृद तो कां सर्वांचा ॥ ३९ ॥ नवल सख्यत्वाची परी । सर्वस्व दे निजमैत्री । स्वार्थीं वंचनार्थु न करी । कृपापात्रीं उपदेशु ॥ १४० ॥ अतर्क्य त्याची पाहती दिठी । मद्रूपें देखे सकळ सृष्टी । जगासी मज अभिन्न गांठी । निजदृष्टीं बांधली ॥ ४१ ॥ मग तो जेउतें पाहे । तेउता मीचि तया आहें । तो जरी मातें न पाहे । तें न पाहणेंही होये मीचि त्याचें ॥ ४२ ॥ त्याची पाहती जे दिठी । ते मीचि होये जगजेठी । ऐशी तया मज एक गांठी । सकळ सृष्टीसमवेत ॥ ४३ ॥ अवघें जगचि मी होये । तेव्हां तो मी हे भाष जाये । ऐसा तो मजमाजीं सामाये । समसाम्यसमत्वें ॥ ४४ ॥ सांडोनियां मनोधर्म । ऐसा ज्यासी मी झालों सुगम । त्यासी पुढती कैंचें जन्म । दुःख दुर्गम ज्याचेनी ॥ ४५ ॥ मातेच्या उदरकुहरीं । रजस्वलेच्या रुधिरामाझारीं । पित्याचेनि रेतद्वारीं । गर्भसंचारीं संसरण ॥ ४६ ॥ जे मातेच्या उदरीं । जंतु नाकीं तोंडीं उरीं शिरीं । विष्ठामूत्राचे दाथरीं । नव मासवरी उकडिजे ॥ ४७ ॥ जठराग्नीच्या तोंडीं । घालूनि

शास्त्रश्रवणानें पहिलें—परोक्ष ज्ञान होतें. त्यानंतर अनुभवानें तेंच विज्ञान होतें. अशा ज्ञान व विज्ञानानें युक्त झालेला मनुष्य निरभिमानी होतो. ३३ याप्रमाणें खरी निरभिमानता हातीं आली म्हणजे त्याची शांति वाढत जाते. ३४ जुलमानें मुद्दाम स्थिर होण्याचा प्रयत्न करणें किंवा दांत खाऊन सहनशीलता आणणें याला शांति असें कोण म्हणणार ! आरडाओरड करून सहन करणें ही कांहीं शांति नव्हे. ३५ शांति अशी असली पाहिजे कीं, जशी समुद्राची अक्षुब्धता. तिला सर्वदा सर्वत्र भरती-ओहटी नाहीं. ३६ अनेक नद्यांचे गढूळ पाण्याचे पाट सारखे समुद्रांत पडत असतात. पण तो तिळभरहि गढूळ न होतां स्वतः स्वरूपानें अति निर्मळ असतो; ३७ त्याप्रमाणें अनेक प्रकारच्या प्राण्यांच्या विषमतेनें आपल्या स्वार्थांत अडथळा आला असतां ज्याच्या चित्तात पालट होत नाहीं, तीच खरी शांति होय. ३८ अशी शांति ज्याला प्राप्त होते तोच सर्व प्राण्यांचा सखा, सर्व लोकांचा आवडता व सर्वांचा सुहृद् होतो. ३९ त्याच्या सख्याची रीतहि मोठी विलक्षण आहे. तो स्नेहासाठीं आपलें सर्वस्व अर्पण करितो. स्वार्थासाठीं कोणाला फसवीत नाहीं. तो कृपेला पात्र असणाराला उपदेश करितो. १४० त्याची पहाण्याची दृष्टिहि अतर्क्य असते. तो सर्व सृष्टि मद्रूपच पहातो. जगत् माझ्याहून भिन्न नाहीं अशीच त्याची भावना असते. ४१ म्हणून तो जेथें पहातो तेथें त्याला मीच दिसतों. त्यानें जरी मला पाहिलें नाहीं, तरी त्याचें न पहाणेंहि मीच होतों. ४२ त्याची पहाणारी दृष्टि मीच स्वतः भगवान् होतों. सर्व सृष्टीसह त्याची व माझी अशी एकात्मता होऊन जाते. ४३ सगळें जगत्च मी होऊन राहिलों म्हणजे 'तो व मी' हे शब्दच नाहींसे होतात. असा तो समदृष्टीमुळें एकात्मभावानें मजमध्यें रहातो. ४४ अशाप्रकारें मनोधर्म सोडल्यामुळें ज्याला मी सुलभ होतों, त्याला दुर्धर दुःख भोगविणारा पुढला जन्म कोठचा ! ४५ मातेच्या उदररूपीं गुहेंत जनक-जननींच्या शुक्र-शोणितांच्या संयोगानें गर्भसंचार होऊन संसाराचा आरंभ होतो. ४६ नंतर मातेच्या उदरांत असलेले जंतु त्याच्या नाकातोंडांत, हृदयांत, मस्तकांत शिरतात व तो मलमूत्रांच्या उष्णतेंत नऊ महिने उकडतो. ४७ जठराग्नीच्या मुखांत गर्भाचा गोळा देऊन तो उकडून उकडून त्याचा एकेक

गर्भाची उंडी । उकडउकडूनि पिंडीं । गर्भकांडीं घडिजेती ॥ ४८ ॥ ते गर्भींची वेदना । नानापरींची यातना । नको नको रघुनंदना । चिळसी मना येतसे ॥ ४९ ॥ अवघ्यांच्या शेवटीं । प्रसूतिवातु जो आटी । सर्वांगीं वेदना उठी । योनिसंकटीं देहजन्म ॥ १५० ॥ ऐसें अपवित्र जें जन्म । तें न पावतीच ते नरोत्तम । जिहीं ठाकिलें निजधाम । ते पुरुषोत्तम समसाम्यें ॥ ५१ ॥ मी असतां पाठीपोटीं । त्यांसी काइशा जन्मगोठी । कळिकाळातें नाणिती दिठी । आले उठाउठी मद्रूपा ॥ ५२ ॥ जेथ जन्म नाहीं जाहलें । तेथ मरण न लगतांचि गेलें । ऐसें भजोनि मातें पावले । भजनबळें मद्भक्त ॥ ५३ ॥ कृष्ण उद्धवातें थापटी । म्हणे वेगें उठीं उठीं । हेचि हातवशी हातवटी । जन्मतुटी तेणें होय ॥ ५४ ॥ जैसें मेघमुखींचें उदक । वरिच्यावरी झेलिती चातक । तैसें कृष्णवचनासी देख । उद्धवें मुख पसरिलें ॥ ५५ ॥ कां चंद्रकिरणीं चकोर । जेवीं अत्यंत सादर । तेवीं उद्धवाचा आदर । दिसे थोर हरिवचनीं ॥ ५६ ॥ हो कां पक्षिणी देखोनि पिलें । जाणोनि चारयाचे वेळे । सांडोनियां अविसाळें । मुख कोंवळें जेवीं पसरी ॥ ५७ ॥ तेवीं देखोनि कृष्णमुख । उद्धवासी अत्यंत हरिख । श्रवणाचे मुखें देख । कृष्ण-पीयूख सेवित ॥ ५८ ॥

श्रीशु०— इत्यादिष्टो भगवता महाभागवतो नृप । उद्धवः प्रणिपत्याह तत्त्वजिज्ञासुरच्युतम् ॥ १३ ॥

शुक म्हणे कौरवनाथा । कृपा उपजली भगवंता । उपदेशिलें महाभागवता । ज्ञानकथा निजबोधु ॥ ५९ ॥ तें ऐकोनि उद्धव । श्रवणीं थोर उठी हांव । कैसें बोलिला ज्ञानगौरव । अतिअपूर्व श्रीकृष्ण ॥ १६० ॥ श्रीकृष्ण श्रीमुखें सांगे कोड । तें निरूपण अतिगोड । जीवीं उठली श्रवणचाड ।

अवयव घडविला जातो. ४८ हे देवा, त्या गर्भांतील वेदना व अनेक प्रकारच्या यातना नको नकोशा होतात. त्यांची मनाला किळस येते. ४९ सर्वांच्या शेवटीं प्रसूतिवायु जेव्हां उठतो त्यानें तर सर्वांगांत वेदना उठतात व मोठ्या क्लेशानें योनीमार्गानें देह बाहेर येतो. १५० असा अपवित्र जन्म उत्तम पुरुषांना प्राप्त होत नाहीं. जे निजधामाला जाऊन पोंचले ते समसाम्यानें पुरुषोत्तमच झाले. ५१ त्यांच्या मागेंपुढें मी असतां जन्माची गोष्टच कशाला पाहिजे ! ते कळिकाळाला कधीं पहातहि नाहींत. तत्काल मद्रूप होतात. ५२ जेथें जन्मच नाहीं तेथें मरण रिक्तहस्तें परत जातें. असे माझे भक्त मला भजून भजनाच्या बळानें मला येऊन मिळतात. ५३ श्रीकृष्ण उद्धवाची पाठ थोपटून म्हणाले—ऊठ ऊठ, लवकर ऊठ, हीच आपल्या हातांत असलेली युक्ति आहे. तिनेंच जन्म-मरणांचा नाश होतो. ५४ मेघमुखींचें उदक चातक जसा तोंड पसरून वरचेवर घेतो, तसें उद्धवानें कृष्णवचन तोंड उघडून स्वीकारिलें. ५५ किंवा चकोर जसा चंद्रकिरणांसाठीं उत्सुक होतो, त्याप्रमाणें उद्धवाचा हरिवचना-वर मोठा आदर दिसला, ५६ किंवा चाऱ्याची वेळ झाली म्हणजे पक्ष्यांचीं पिलें जशीं पक्षिणीला पाहतांच घरट्यांतून बाहेर येऊन आपली कोमल चोंच उघडतात, ५७ त्याप्रमाणें श्रीकृष्णाचें मुख पाहून उद्धव अत्यंत आनंदित झाला व श्रवणद्वारां कृष्णामृत सेवूं लागला. १५८.

श्रीशुकः उवाच—श्रीशुकाचार्य म्हणतात, नृप—हे परीक्षित् राजा ! इति भगवता आदिष्टः—याप्रमाणें भगवानाकडून सांगितला गेलेला, महाभागवतः तत्त्वजिज्ञासुः उद्धवः—महाभगवद्भक्त तत्त्वजिज्ञासु उद्धव, अच्युतं प्रणिपत्य आह—अच्युताला नमस्कार करून म्हणाला. १३.

शुकाचार्य म्हणाले—हे कौरवराजा परीक्षिति ! भगवानाच्या मनांत कृपाच उत्पन्न झाली म्हणून त्यानें आपल्या महाभागवत उद्धवाला आत्मज्ञानाचा उपदेश केला. ५९ पण तो ऐकून उद्धवाची ऐकण्याची इच्छा दुणावली. यावरून श्रीकृष्णाचा ज्ञानबोध किती अपूर्व होता, पहा ! १६० श्रीकृष्णानें आपल्या मुखानेंच आपलें रहस्य सांगितलें. तें अति गोड निरूपण ऐकण्याची इच्छा वाढली; पण देवाची भीड तिचें उल्लंघन

तुलंघी भीड देवाची ॥ ६१ ॥ आवडी कळवळे चित्त । घाली साष्टांग दंडवत । हात जोडोनि पुसत प्रेमळभक्त उद्धव ॥ ६२ ॥

उद्धव उवाच–योगेश योगविन्यास योगात्मन्योगसम्भव ।
निःश्रेयसाय मे प्रोक्तस्त्यागः संन्यासलक्षणः ॥ १४ ॥

ऐकें योगियांच्या योगपती । योग्यांचा ठेवा तूं श्रीपती । योगीं प्रकट तूं योगमूर्ती । योगउत्पत्ती तुजपासीं ॥ ६३ ॥ मज मोक्षासी कारण । त्यागु संन्यासलक्षण । बोलिलासी तो अतिकठिण । परम दारुण हा त्यागू ॥ ६४ ॥

त्यागोऽयं दुष्करो भूमन् कामानां विषयात्मभिः । सुतरां त्वयि सर्वात्मन्नभक्तैरिति मे मतिः ॥ १५ ॥

पाहतां या त्यागाची रीती । मज तंव दुर्धरु गा श्रीपती । मग इतरांची येथ गती । कवण्या स्थिती होईल ॥ ६५ ॥ कामु जयाच्या चित्तीं । विषयीं आसक्त मती । त्यासी या त्यागाची गती । नव्हे श्रीपति सर्वथा ॥ ६६ ॥ तुझी कृपा जंव नव्हे । तंव ते अभक्तां केवीं करवे । त्यागु बोलिला जो देवें । तो सर्वांसी नव्हे सर्वथा ॥ ॥ ६७ ॥ तूं सर्वात्मा असतां हृदयीं । चित्त प्रवेशेना तुझे ठायीं । तें आवरिलें

करूं शकली नाहीं. ६१ स्नेहानें उद्धवाचें चित्त सद्गदित झालें. त्यानें त्याला साष्टांग नमस्कार केला व हात जोडून तो प्रेमळ भक्त विचारूं लागला. १६२.

—' परंतु तूं सर्वांचा परित्याग करून माझ्यामध्यें आपलें मन स्थिर कर ' असा जो तूं वर उपदेश केला आहेस (श्लो. ६.) तो आपल्याला अयोग्य आहे असें समजणारा उद्धव भगवानास प्रश्न करितो—

उद्धव उवाच–उद्धव म्हणाला, **योगेश**–हे योगाचें फल देणाऱ्या, **योगविन्यास**–हे योगवेत्त्यांचा जणुंकाय अतिगुप्त निधीच किंवा (**योगविन्यास**–ज्याच्या ठिकाणीं चित्ताचें ऐकाग्र्य केलें जातें,) **योगात्मन्**–योगांमध्यें ज्याचा आत्मा प्रकट होतो, व, **योगसंभव**–ज्याच्यापासून योगाचा उद्भव होतो अशा हे ईश्वरा ! (या चार संबोधनांनीं उद्धवानें ' तूं केवल आपल्या महिम्यानें हा उपदेश केलास, माझ्या अधिकाराकडे दृष्टि देऊन तो केला नाहींस, ' असें सुचविलें आहे. उद्धव या श्लोकाच्या उत्तरार्धानें तेंच सांगतो–) **निःश्रेयसाय मे संन्यासलक्षणः त्यागः प्रोक्तः**–तूं मला मोक्षासाठीं संन्यासलक्षणत्याग सांगितलास. (आरोग्यादिकांसाठीं सर्वस्वदानादिकांप्रमाणें अर्थत्याग सांगितलेला नाहींस, तर पुनः कोणत्याहि प्रकारें ज्याचा स्वीकार करितां येणार नाहीं असा संन्यासलक्षण त्याग सांगितला नाहींस, असा भावार्थ.) १४.

हे योग्यांच्या योगिराज ! ऐक. हे श्रीपते ! तूं योग्यांचा ठेवा आहेस. तूं साक्षात् योगमूर्ति योगानें प्रकट होतोस. सगळ्या योगांची उत्पत्ति तुझ्यापासून होते. ६३ मला मोक्षप्राप्तीसाठीं तूं त्यागाचें व संन्यासाचें लक्षण सांगितलेंस; पण तो त्याग अति कठिण व परम दारुण आहे. १६४.

हे **भूमन्**–हे व्यापक परमात्म्या, **अयं कामानां त्यागः विषयात्मभिः दुष्करः**–हा कामांचा त्याग विषयासक्त लोकांकडून होणें कठिण आहे. **सर्वात्मन्**–हे सर्व भूतांच्या आत्म्या, **अभक्तैः त्वयि सुतरां दुष्करः इति मे मतिः**–अभक्तांनीं तुझ्या ठिकाणीं कामाचा त्याग करणें तर अतिशयच कठिण आहे, असा माझा निश्चय आहे. १५.

हे श्रीपते ! या त्यागाची रीत पाहिली म्हणजे मलाहि ती अतिशय कठिण दिसते. मग इतरांची गति त्यांत कशी होणार ! ६५ हे श्रीकृष्णा ! ज्याच्या मनांत कामना आहे, ज्याची बुद्धि विषयासक्त झाली आहे, त्याला हा त्याग केव्हांहि घडणें शक्य नाहीं. ६६ जोंवर तुझी कृपा झाली नाहीं, तोंवर तुझ्या अभक्तांस तो त्याग कसा करितां येईल ! देवांनीं जो त्याग सांगितला तो सर्वांना करितां येण्यासारखा सर्वथा नाहीं. ६७ तूं सर्वात्मा

असे विषयीं । नवल कायी सांगावें ।। ६८ ।। ऐसें प्रपंचीं आसक्त । यालागीं विमुख झाले अभक्त । त्यांसी त्यागु नव्हे निश्चित । चित्त दुश्चित्त सर्वदां ।। ६९ ।। त्यागु कां नव्हे म्हणसी । तें परिस गा हृषीकेशी । कठिणत्व जें त्यागासी । तें तुजपाशीं सांगेन ।। १७० ।।

सोऽहं ममाहमिति मूढमतिर्विगाढस्त्वन्मायया विरचितात्मनि सानुबन्धे ।
तत्त्वञ्जसा निगदितं भवता यथाहं संसाधयामि भगवन्ननुशाधि भृत्यम् ।। १६ ।।

तुझी माया विचित्र उपाधी । शरीरीं केली आत्मबुद्धी । आत्मीयें शरीरसंबंधीं । विपरीत सिद्धि वाढली ।। ७१ ।। मी माझें वाढलें गाढ । तेणें मति झाली मूढ । गृहासक्ति लागली दृढ । त्यागु अवघड यालागीं ।। ७२ ।। ऐशी ही बुद्धि विवळे । अप्रयासें तत्त्व आकळे । तैशी कृपा कीजे राउळें । दासगोपाळें तारावया ।। ७३ ।। ऐकें गा पुरुषोत्तमा । निजदासां आपुल्या आम्हां । सोडवीं गा संसारश्रमा । आत्मयारामा श्रीकृष्णा ।। ७४ ।। तुज सांडोनि हृषीकेशी । पुसों जावें आणिकापाशीं । तें नये माझिया मनासी । विषयीं सर्वांसी व्यापिलें ।। ७५ ।।

सत्यस्य ते स्वदृश आत्मन आत्मनोऽन्यं वक्तारमीश विबुधेष्वपि नानुचक्षे ।।
सर्वे विमोहितधियस्तव माययेमे ब्रह्मादयस्तनुभृतो बहिरर्थभावाः ।। १७ ।।

प्रत्यक्ष हृदयांत असतां तुझ्यांत चित्त प्रवेश करीत नाहीं व विषयांत गुंतून रहातें, हें केवढें आश्चर्य आहे ! ६८ असे प्रपंचांत आसक्त झालेले अभक्त तुझ्यापासून विमुख असतात. त्यांना त्याग करितां येणें खरोखर शक्य नाहीं. कारण त्यांचें चित्त सर्वदा अस्थिर असतें. ६९ हे श्रीहरे ! त्याग कां होणार नाहीं, असे जर म्हणशील, तर ऐक. त्याग करण्यांत काय कठिण असतें तेंहि तुला सांगतों. १७०.

सः अहं मूढमतिः मम इति अहं इति च सानुबंधे त्वन्मायया विरचितात्मनि विगाढः—ज्याला तूं त्यागाचा उपदेश केलास तो मी मूढमति आहें. (तो कसा म्हणून विचारशील, तर सांगतों—) हें माझें, आणि हा मी, याप्रमाणें पुत्रादिकांसह तुझ्या मायेनें रचिलेल्या या देहामध्यें मी निमग्न झालों आहें. म्हणून, **तत् तु भवता निगदितं यथा अहं अञ्जसा संसाधयामि तथा भगवन् मां भृत्यं अनुशाधि**—आपण सांगितलेलें हें तत्त्व ज्याप्रकारें मी साक्षात् साधण्यास समर्थ होईन त्याप्रकारें हे भगवन् ! मज दासाला क्रमाक्रमानें उपदेश कर. १६.

तुझी माया ही विचित्र उपाधि आहे. ती शरीरावर आत्मबुद्धि ठेविते व शरीरसंबंधीं सर्व आत्म्याचेंच आहे अशी विपरीत भावना उत्पन्न करविते. ७१ 'मी व माझें' ही वृत्ति फार वाढल्यामुळें बुद्धि मूढ बनते व घरादारांवर आसक्ति जडते. म्हणून त्याग फार अवघड वाटूं लागतो. ७२ ती बुद्धि पालटेल व अनायासें आत्मस्वरूपाचें आकलन करितां येईल, अशी देवानें बालगोपाळ तरून जाण्यासाठीं कृपा केली पाहिजे. ७३ हे पुरुषोत्तमा ! आत्मारामा ! आमच्या सारख्या दासांना संसारक्लेशांतून सोडीव. ९४ हे हृषीकेशा ! तुझ्यावांचून दुसऱ्या कोणालाहि विचारावयास जाणें माझ्या मनांत येत नाहीं. कारण सगळ्यांना विषयांनीं ग्रासून टाकिलें आहे. १७५.

—'उद्धवा ! मीं तुला संक्षेपतः सांगितलें आहें, तेंच आतां तूं दुसऱ्या कोणापासून सविस्तर विचारून घे.' असें जर म्हणशील तर सांगतों—

हे ईश स्वदृशः सत्यस्य आत्मनः आत्मनः ते अन्यं वक्तारं विबुधेषु अपि न अनुचक्षे—हे ईश्वरा ! स्वयंप्रकाश व सत्य असा जो तूं आत्मा त्या तुझ्या स्वरूपाचें मला अनुशासन करील असा तुजहून दुसरा कोणी वक्ता देवांमध्येंहि मला दिसत नाहीं, **इमे सर्वे ब्रह्मादयः बहिरर्थभावाः तनुभृतः तव मायया विमोहितधियः**—कारण हे सर्व ब्रह्मादिक बाह्य विषयांमध्यें अर्थबुद्धि ठेवणारे शरीरी तुझ्या मायेनें मूढबुद्धि झाले आहेत, म्ह० त्यांची बुद्धि विवेकहीन झाली आहे. १७.

पुसों जावें ब्रह्मयासी । तो गुंतला सृष्टिकर्मासी । प्रजाउत्पत्ति मानसीं । अहर्निशीं चिंतितु ॥ ७६ ॥ जो आपुल्या निजस्वभावीं । सदा संसारू वाढवी । तो केवीं संसारू तोडवी । केलें न बुडवी सर्वथा ॥ ७७ ॥ वाढों नेदी संसारासी । कोपु आला प्रजापतीसी । शापु दिधला नारदासी । ब्रह्म उपदेशी म्हणौनी ॥ ७८ ॥ ऐसें संसारीं आसक्त । नित्य संसारयुक्त । त्यांसी पुसों न मनी चित्त । जाण निश्चित श्रीकृष्णा ॥ ७९ ॥ पुसों जावें ऋषींप्रती । तंव ते सदा आपमती । आपुलें मत प्रतिष्ठिती । अन्यथा देती शापातें ॥ १८० ॥ जीवीं धरोनि अर्थासक्ती । शिष्यांतें उपदेशिती । विषयो धरोनियां चित्तीं । जीविकावृत्ति उपदेशु ॥ ८१ ॥ गुरूसीच विषयासक्ती । तेथ शिष्यासी कैंची विरक्ती । ऐशियासी जे पुसती । ते भ्रंशती स्वार्थातें ॥ ८२ ॥ सत्यस्वरूप स्वप्रकाश । आत्मा तूं अविनाश । युक्तिप्रयुक्तीं उपदेश । विकल्पनिरास जाणसी ॥ ८३ ॥ ब्रह्मज्ञानाचा वक्ता । तुजवेगळा श्रीकृष्णनाथा । न दिसे गा सर्वथा । मज पाहतां त्रिलोकीं ॥ ८४ ॥ एवं आत्मा तूं तत्त्वतां । तूंचि आत्मज्ञानदाता । आत्मबोधीं संस्थापिता । कृष्णनाथा तूं एकु ॥ ८५ ॥

तस्माद्भवन्तमनवद्यमनन्तपारं सर्वज्ञमीश्वरमकुण्ठविकुण्ठधिष्ण्यम् ।
निर्विण्णधीरहमुह वृजिनाभितप्तो नारायणं नरसखं शरणं प्रपद्ये ॥ १८ ॥

ब्रह्मदेवाला विचारण्यास जावें तर तो सृष्टिकार्यांत गुंतलेला. रात्रंदिवस प्रजा उत्पन्न करण्याचें त्याच्या मनाला चिंतन. ७६ जो आपल्या स्वभावानुसार सर्वदा संसार वाढवितो, तो संसार तोडणार कसा ! आपण निर्माण केलेल्याचा कोणी आपणच कधीं नाश करीत नाहीं. ७७ नारद परब्रह्माचा उपदेश करून संसाराची वाढ होऊं देत नाहीं, म्हणून ब्रह्मदेवाला क्रोध आला व त्यानें नारदाला शाप दिला. ७८ म्हणून हे श्रीकृष्णा ! याप्रमाणें जे संसारांत आसक्त आहेत व नित्य संसारयुक्त आहेत त्यांना विचारण्यास खरोखर मन धजत नाहीं. ७९ बरें, ऋषींना विचारावयास जावें तर ते मताभिमानी, सदा आपल्या मताचा पुरस्कार करीत असतात व त्यांच्या विरुद्ध एक शब्द काढला कीं शाप देतात. १८० मनांत द्रव्याभिलाष ठेवून जे शिष्यांना उपदेश करितात ते विषयासक्तीनें केवल उदरपोषणासाठीं उपदेश करितात. ८१ जेथें गुरूलाच विषयासक्ति आहे तेथें शिष्याला विरक्ति कोठून येणार ! अशा गुरूला जे विचारण्यास जातात ते स्वार्थापासून च्युत होतात. ८२ तूं सत्यस्वरूप, स्वयंप्रकाश, सर्वात्मा व अविनाशी असल्यामुळें युक्तिप्रयुक्तीनें उपदेश करून विकल्पनिरास कसा करावा हें जाणतोस. ८३ हे श्रीकृष्णनाथा ! ब्रह्मज्ञानाचा उपदेश करण्यास समर्थ असा तुझ्यावांचून दुसरा कोणीहि सर्व त्रिभुवन शोधून पहातांहि मला दिसला नाहीं. ८४ अशाप्रकारें खरोखर हे अच्युता ! तूंच आत्मा आहेस, आत्मज्ञान देणाराहि तूंच व आत्मबोधांत स्थिर करणाराहि तूंच आहेस, ८५.

—त्यांतील कांहीं दुःशील आहेत, कित्येकांची किती जरी सेवा केली तरी ते फलसमयीं विनाश पावतात, कित्येक अज्ञ आहेत, कित्येक रक्षण करण्यास असमर्थ असतात व कांहीं स्वस्थानापासून भ्रष्ट झालेले असतात, यास्तव त्यांची व्यावृत्ति करण्यासाठीं पुढील श्लोकांत भगवानाला ' अनवद्यं० ' इत्यादि पांच विशेषणें दिलीं आहेत—

तस्मात् वृजिनाभितप्तः निर्विण्णधीः अहं—म्हणून दुःखानें संतप्त झालेला आणि त्यामुळेंच ज्याला या संसाराचा कंटाळा आला आहे असा मी, उह—हे भगवन्, अनवद्यं अनंतपारं सर्वज्ञं ईश्वरं अकुंठविकुंठधिष्ण्यं भवन्तं शरणं प्रपद्ये— निर्दोष, देशतः व कालतः परिच्छेदशून्य, सर्वज्ञ, ईश्वर व कालादिकांनीं ज्याचा लोक व स्थान हीं दोन्हीं अकुंठित आहेत अशा तुला मी शरण आलों आहें. (अरे पण, निर्दोषत्वादि विशेषणें माझ्या ठिकाणीं कशीं उपपन्न होतात, म्हणून म्हणशील तर सांगतों—) नारायणं नरसखं—तूं नारायण आहेस व दुःखानें व्याकुळ होणारा जो जीव त्याचा तूं सखा आहेस. (तूं जीवांचा आधार व त्यांच्यावर दया करणारा आहेस, म्हणून वरील विशेषणें तुझ्या ठिकाणीं उपपन्न होतात व त्यामुळेंच मी तुला शरण आलों आहें.) १८.

यालागीं जी यादवपती । नित्य शुद्ध पवित्रमूर्ती । तुज मायामोहो नातळती । पवित्र ख्याती यालागीं ॥ ८६ ॥ गोवळांचेनि उच्छिष्टकवळें । ज्याची पवित्रता न मैळे । तेणेंचि उच्छिष्टबळें । गोवळें सकळें तारिलीं ॥ ८७ ॥ प्राणें शोषिलें पूतनेसी । तरी पवित्रता अधिक कैसी । तेणेंचि उद्धरिलें तिसी । दोषें दोषांसी तारकु ॥ ८८ ॥ करूनि कालियमर्दन । मर्दिला त्याचा अभिमान । तरी मैळेना पवित्रपण । निर्विषें जाण तारिला ॥ ८९ ॥ रजक अंत्यज अत्यंत । आतळे तया अधःपात । त्यासी मारूनियां निश्चित । केला पुनीत सायुज्या ॥१९०॥ करूनि गोपिकांसीं निंद्य काम । तेणें त्या केल्या निष्काम । तेचि पवित्रता अनुत्तम । सायुज्यधाम पावल्या ॥ ९१ ॥ करितां सुकर्म कुकर्म । ज्याची पवित्रता अनुत्तम । यालागीं नामें पुरुषोत्तम । अकर्तात्म निजबोधें ॥ ९२ ॥ जो आकळे गुणांआंतू । त्यासी ते गुण करिती प्रांतू । त्या गुणांसी तुजमाजीं अंतू । यालागीं तूं अनंतू सर्वथा ॥ ९३ ॥ देशतः कालतः पार । तुज न करवेचि साचार । यालागीं अनंत तूं अपार । श्रुतींसी पार न कळेची ॥ ९४ ॥ तुज म्यां करावी विनंती । किती यावें काकुळती । तूं हृदयस्थ ज्ञानमूर्ती । जाणता त्रिजगतीं तूं एकु ॥ ९५ ॥ ज्ञान अज्ञान मायाशक्ती । ईश्वराआधीन गा असती । त्या ईश्वराची तूं ईश्वरमूर्ती । सत्यकीर्ति श्रीकृष्णा ॥ ९६ ॥ तूं सर्वांचा नियंता । सर्व करूनि अकर्ता । ऐसा ईश्वरू तूं कृष्णनाथा । भोगूनि अभोक्ता तूं एकु ॥ ९७ ॥ देशतः कालतः स्वभावेंसीं । नाशु न पावे ज्या स्थानासी । तेथींचा तूं निवासवासी । पूर्ण पूर्णांशी अवतारु ॥ ९८ ॥ नराचें अविनाशस्थान । यालागीं तूं नारायण । तुझेनि जीवांसी चळणवळण । चाळकपण तुजपासीं ॥ ९९ ॥ ऐसा ईश्वर तूं आपण । नरसखा नारायण । युद्धसमयीं अर्जुनासी जाण । ब्रह्मज्ञान त्वां दिधलें ॥ २०० ॥ दारुण होतां संग्रामासी । पावडा पावो युद्धासी । तेव्हां ब्रह्मज्ञान सांगसी । निजसख्यासी अर्जुना ॥ १ ॥ ऐसा कृपाळु तूं नारायण । यालागीं तुज आलों शरण । त्रिविधतापें तापलों

हे यादवराजा, तूं नित्य, शुद्ध, पवित्र मूर्ति आहेस. म्हणूनच तुला मायामोह स्पर्श करीत नाहीं. त्यामुळेंच 'तूं पवित्र आहेस' अशी लोक तुझी कीर्ति गातात. ८६ गोपांच्या उच्छिष्ट घांसानें ज्याची पवित्रता मलिन झाली नाहीं, उलट त्या उच्छिष्टाच्या बळानेंच सर्व गोप उद्धरून गेले. ८७ पूतनेला प्राणासह शोषून घेतलेंस तरी तुझी पवित्रता किती श्रेष्ठ आहे ! त्यानेंच तूं तिचा उद्धार केलास. दोषानेंच दोषांना तारलेंस. ८८ कालियानागाचें मर्दन करून त्याचा अभिमान घालविलास, तरी तुझी पवित्रता दूषित झाली नाहीं. त्याला निर्विष करून उद्धारिलास. ८९ अतिशय हीन, नीच वृत्तीचा रजक अधोगतीला गेला असतां त्याला मारून, पावन करून सायुज्य मुक्ति दिलीस. १९० गोपींना कामासक्तीनेंच निष्काम केलेंस. त्यायोगें त्या अत्यंत पवित्र होऊन सायुज्यधामाला गेल्या. ९१ सत्कर्म असो किंवा दुष्कर्म असो, तुझी पवित्रता कायमच. म्हणून तुला पुरुषोत्तम म्हणतात.९२आत्मज्ञानामुळें तूं अकर्ताच आहेस. ९३ जो गुणांमध्यें सांपडतो, त्याला गुण वेढून टाकितात. पण त्या गुणांचा तुझ्यामध्यें अंत होतो; म्हणून तूं सर्वथा अनंत आहेस. देश व काल तुला खरोखर मर्यादा घालूं शकत नाहींत. म्हणून तूं अनंत व अपार आहेस, श्रुतींनाहि तुझा अंत लागत नाहीं. ९४ तुला मीं किती विनवावें ! किती काकुळतीस यावें ! तूं हृदयस्थ ज्ञानमूर्ति आहेस. तूंच काय तो एक त्रैलोक्यांत ज्ञाता आहेस. ९५ ज्ञान, अज्ञान व मायाशक्ति या सर्व ईश्वराधीन आहेत. पण त्या ईश्वराचाहि ईश्वरमूर्ति तूं आहेस. हे श्रीकृष्णा ! ही तुझी कीर्ति सत्य आहे. ९६ हे प्रभो ! तूं सर्वांचा नियंता, सर्व करून अकर्ता, आणि सर्व भोगून अभोक्ता, असा ईश्वर तूंच एक आहेस. ९७ जें स्थान वस्तुतः देशतः व कालतः परिच्छिन्न होत नाहीं तेथला तूं रहिवाशी व पूर्णांशानें पूर्ण अवतार आहेस. ९८ नराचें तूं अविनाशी स्थान आहेस, म्हणून नारायण. तुझ्यामुळें जीवांचें चलनवलन होतें, सर्वांचें चालकत्व तुजपाशीं आहे. ९९ असा तूं स्वतः ईश्वर नराचा सखा नारायण आहेस. युद्धप्रसंगीं तूंच अर्जुनाला ब्रह्मज्ञान उपदेशिलेंस, २०० भयंकर युद्धप्रसंगीं योद्धे एकमेकाला मारण्यास तयार झाले असतां त्या वेळींहि तूं आपला सखा जो अर्जुन त्याला ब्रह्मज्ञानाचा उपदेश केलास. १ हे नारायणा ! असा तूं कृपाळु आहेस. म्हणून मी तुला शरण आलों आहें. मी आधिभौतिक, आधिदैविक

जाण। दुःख दारुण संसारु ।। २ ।। संसार म्हणजे अंधकूप । माजीं कामक्रोधादि दुष्ट सर्प। निंदा स्पर्धा कांटे अमूप । दुःखरूप मी पडिलों ।। ३ ।। तेथ पडिलियापाठीं। ब्रह्मद्वेषाचा शूळ पोटीं । भरला जे उठाउठी । तेणें हिंपुटी होतुसें ।। ४ ।। तेथून निघावया त्रिशुद्धी । उपावो न दिसे गा निजबुद्धी । कृपाळुवा कृपानिधी । आत्मबोधीं मज काढीं ।। ५ ।।

श्रीभ०—प्रायेण मनुजा लोके लोकतत्त्वविचक्षणाः । समुद्धरन्ति ह्यात्मानमात्मनैवाशुभाशयात् ॥ १९ ॥

भूत संचरलियापाठीं । सुटती जल्पवादगोठी । त्यांतें गुणिया पाहोनि दिठीं । अक्षता त्राहाटी मंत्रोनी ।। ६ ।। पाहतां पांचभौतिक संसारु । सहजें झाला असे थोरु । माजीं झोंबलासे कृष्णवियोगखेचरु। उद्धव लेंकरूं झडपिलें ।। ७ ।। मिसें उद्धवाची झडपणी । अहंम्हैसासुर लागला झणी । त्यासी करावया झाडणी । कृष्ण गुणी चालिला ।। ८ ।। तेथ झाडणीलागीं आतां । या यदुअवधूतसंवादकथा । त्याचि मंत्रूनि मंत्राक्षता । होय झाडिता श्रीकृष्णु ।। ९ ।। श्रीकृष्ण म्हणे उद्धवासी । सावध होयीं निजमानसीं । येऊनियां मनुष्यलोकासी । आपआपणांसी उद्धरिती ।। २१० ।। पाहतां यया परमार्था । साह्य नव्हे माता पिता । पुत्र भ्राता दुहिता कांता । साह्य सर्वथा हे नव्हती ।। ११ ।। साह्य परमार्था नव्हे व्याही। शेखीं साह्य नव्हे जांवयी। आपणिया आपण साह्य पाहीं। जो निजदेहीं विवेकी ।। १२ ।। मुमुक्षुमार्गींचे सज्ञान । लोकतत्त्वविचक्षण विचारूनि कार्यकारण । स्वबुद्धीं जाण उद्धरले ।। १३ ।। नित्यानित्यविवेकें । अनित्य सांडिती त्यागमुखें । नित्य तें यथासुखें । हित संतोखें अंगीकारिती ।। १४ ।। नित्यत्वें जें उरलें जाण ।

व आध्यात्मिक या त्रिविध तापानें तापलों आहें. हा संसार भयंकर दुःखानें युक्त आहे. २ संसार म्हणजे अंधकूप आहे. त्यांत कामक्रोधादि दुष्ट सर्प आहेत. निंदा व स्पर्धा हेच दाट कांटे पसरले आहेत. त्या दुःखांत मी पडलों आहें. ३ त्यांत पडतांक्षणीं ब्रह्मद्वेषाचा पोटशूळ एकसारखा उठला आहे. त्यामुळें मी अगदीं कष्टी झालों आहें. ४ तेथून सर्वथा बाहेर पडण्यास माझ्या बुद्धीला कांहीं उपाय सुचत नाहीं. तरी हे कृपानिधे, दयाळा ! मला आत्मज्ञानानें त्यांतून वर काढ. २०५.

—याप्रमाणें असंभावना व विपरीत भावना, यांमुळें उपदेशिलेल्या तत्त्वाचेंहि ग्रहण न करणाऱ्या पुरुषाच्या त्या दोन प्रतिबंधांची निवृत्ति होण्यासाठीं गुरूपदेशावांचूनहि अन्वय-व्यतिरेकांनींच तत्त्वनिश्चय होतो हें दाखविण्याकरितां—

श्रीभगवान् उवाच–भगवान् म्हणाले, प्रायेण लोके लोकतत्त्वविचक्षणाः मनुजाः–प्रायः या व्यवहारांत लोकतत्त्वाचें परीक्षण करणारे मानव, आत्मना एव आत्मानं अशुभाशयात् समुद्धरन्ति हि–स्वतःच स्वतःचा विषयवासनेपासून उद्धार करितात. १९.

एखाद्या माणसाच्या अंगांत भूताचा संचार झाला म्हणजे तो वेडेंवाकडें बडबडत सुटतो. त्याला पंचाक्षऱ्यानें पाहिलें म्हणजे तो अक्षता मंत्रवून त्याच्या अंगावर टाकितो. ६ त्याप्रमाणें वस्तुतः हा संसार पंचभूतात्मक आहे. तो स्वभावतःच अतिशय वाढला आहे. त्यांत या उद्धवरूपी लेंकराला कृष्णवियोगरूपी भूत झोंबून त्यानें त्याला पछाडलें आहे. ७ तेव्हां उद्धवाच्या या निमित्तानें त्याच्या अंगांत जो 'अहं' नांवाचा म्हसोबा संचारला होता, त्याला घालविण्यासाठीं पंचाक्षरी कृष्ण तयार झाला आहे. ८ तो आतां त्याला काढण्यासाठीं यदु-अवधूतसंवाद कथारूपी मंत्राक्षता मंत्रवून त्याला घालवील. ९ श्रीकृष्ण उद्धवाला म्हणाला, 'तूं आपल्या मनांत सावध हो. मृत्युलोकीं येऊन आपल्यालाच आपला उद्धार करितां येतो. २१० खरें पाहिलें तर परमार्थांत मातपिताहि साह्य करीत नाहींत. पुत्र, बंधु, भगिनी, स्त्री, हीं केव्हांहि सहाय होत नाहींत. ११ परमार्थांत व्याही, जांवई, यांचें साह्य मिळत नाहीं. तर जो स्वदेहामध्यें विवेकी असतो तो आपणच आपला उद्धार करितो. १२ मुमुक्षुमार्गांतील तत्त्वविवेक करणारे सज्ञान लोक कार्यकारणांचा विचार करून आपल्याच बुद्धीनें उद्धरून गेले. १३ ते नित्यानित्यविवेकानें त्यागद्वारां अनित्य सोडतात व नित्याचा स्वहितासाठीं संतोषानें व स्वेच्छेनें स्वीकार करितात. १४ नित्यत्वानें जें उरलें तेंच माझें चिद्घन

त स्वरूप माझं चिद्धन । तेंचि साधकांचें साधन जाण । अनन्यपण चिंतिती ॥ १५ ॥ भावितां माझी दृढ भावना । मीचि ते होती जाणा । कीटकीभृंगीचिया खुणा । आपआपणियां उद्धरिती ॥ १६ ॥

आत्मनो गुरुरात्मैव पुरुषस्य विशेषतः । यत्प्रत्यक्षानुमानाभ्यां श्रेयोऽसावनुविन्दते ॥ २० ॥

पश्वादि योनींच्या ठायीं । हिताहितज्ञान असे पाहीं । मा पुरुषाच्या पुरुषदेहीं । ज्ञान पाहीं स्फुरद्रूप ॥ १७ ॥ जें कर्म करितों मी देहीं । तेणें तरेन कीं नाहीं । हें ज्याचे त्याचे ठायीं । स्फुरद्रूप पाहीं कळतसे ॥ १८ ॥ सांडूनि अशुभ वासना । जो न करी विषयकल्पना । तो आपुला गुरु आपण जाणा । नरकयातना चुकविली ॥ १९ ॥ जो कंटाळला जन्मगर्भासी । मरमरों उबगला मरणासी । आधी लागली मानसीं । जन्ममरणांसी नासावया ॥ २२० ॥ आवडी नुपजे स्त्रीपुत्रांसी । निद्रा न लगे अहर्निशीं । काळें ग्रासिलें आयुष्यासी । निजहितासी न देखिजे ॥ २१ ॥ तुझीच तुजदेखतां । काळें गिळिली बाल्यावस्था । तारुण्याचा ग्रासिला माथा । वार्धक्याभंवता लागला असे ॥ २२ ॥ केवळ वार्धक्याचा जरंगा । त्यासीही काळु लागला पैं गा । आयुष्य व्यर्थ जातसे वेगा । हा निजनाडु जगा कळेना ॥ २३ ॥ क्षणक्षणा काळु जातसे व्यर्थ । कांहीं न साधे जी परमार्थ । जन्ममरणांचा आवर्त । पुढें अनर्थ रोकडा ॥ २४ ॥ स्वर्ग नरक कर्म ब्रह्म । चहूं प्राप्तींसीं मनुष्यधर्म । यालागीं त्यजूनि पापकर्म । मोक्षधर्म धरावा ॥ २५ ॥ नरदेह मोक्षाचा वांटा । वृथा जातसे कटकटा । हृदयीं आधी लागला मोटा । विषयचेष्टा विसरला ॥ २६ ॥ प्रत्यक्ष लक्षणें अनित्य । संसारु दिसे नाशवंत । यालागीं तो नव्हे आसक्त । होय विरक्त इहभोगीं ॥ २७ ॥ याचिपरी अनुमाना । परलोकभोगभावना । आतळों नेदी मना । नश्वर

स्वरूप जाण. तेंच साधकांचें साधन आहे, म्हणून ते अनन्यभावानें त्याचेंच चिंतन करितात. १५ माझ्या ठिकाणींच दृढभावना ठेविल्यामुळें ते मद्रूपच होतात. कीटक व गांधिलमाशी यांच्या दृष्टान्ताप्रमाणें सतत चिंतनानें ते आपणच आपला उद्धार करितात. २१६.

—याचेंच उपपादन—

विशेषतः पुरुषस्य आत्मा एव आत्मनः गुरुः—विशेषतः पुरुषाचा आत्माच त्याच्या पश्वादि शरीरांतीलहि हिताहित ज्ञानाचा गुरु आहे. यत् असौ प्रत्यक्षानुमानाभ्यां श्रेयः अनुविन्दते—कारण कीं, हा स्वतःच प्रत्यक्ष व अनुमान यांच्या योगानें आपलें हित जाणतो. २०.

पशु-पक्ष्यादिकांसहि हित-अहितांचें ज्ञान असतें, मग मनुष्यदेहांत तें कसें असणार नाहीं! स्फूर्तिरूपानें तें असतेंच. १७ मी देहानें जें कर्म करितों त्यानें तरून जाईन किंवा नाहीं, हें ज्याचें त्याला स्फूर्तिरूपानें कळत असतें. १८ जो अशुभ वासना सोडून विषयचिंतन करीत नाहीं, तो आपणच आपला गुरु होऊन नरकयातना चुकवितो. १९ जो गर्भावस्था व जन्म याला कंटाळला, जो मरून मरून मरणाला त्रासला, त्याच्या मनाला जन्ममरणांच्या नाशासाठीं तळमळ लागून रहाते. २२० त्याच्या मनांत स्त्री-पुत्रांविषयीं प्रेम उत्पन्न होत नाहीं. रात्रंदिवस त्याला झोंप येत नाहीं. आयुष्याला काळानें ग्रासून टाकिलें तरी आपलें हित त्याला दिसत नाहीं. २१ तुझ्या देखतच तुझें बालपण काळानें गिळून टाकिलें, तारुण्याचें शिखरच ग्रासिलें व आतां तो वृद्धपणाभोंवतीं घिरट्या घालीत आहे. २२ वृद्धपण म्हणजे केवळ जाळें आहे. पण त्याच्याहि मागें काळ लागला आहे. अशा रीतीनें हें आयुष्य *त्वरेनें व्यर्थ जात आहे, पण हा त्याचा नाश जगाला कळत नाहीं.* २३ क्षणोक्षणीं काळ व्यर्थ चालला आहे, त्यांत कांहींच परमार्थ साधत नाहीं. जन्म मरणांचा भोंवरा हा अनर्थ स्पष्ट पुढें आहे. २४ स्वर्ग, नरक, कर्म व ब्रह्म या चोहोंच्या प्राप्तीसाठीं मनुष्यधर्म आहे. यासाठीं पापकर्म टाकून मोक्षधर्म स्वीकारावा. २५ अरेरे मनुष्यदेह मोक्षाचा वांटा असून तो व्यर्थ जात आहेना! अशी मनाला मोठी तळमळ लागली म्हणजे विषयांचा विसर पडतो. २६ हा संसार प्रत्यक्षप्रमाणानें अनित्य व नाशिवंत दिसत आहे, असें जाणून साधक त्यांत आसक्त न होतां मृत्युलोकींच्या भोगांविषयीं विरक्त होतो. २७ त्याचप्रमाणें परलोकींच्या सुखाचेंहि अनुमान केलें असतां तेंहि नश्वरच वाटतें

पतना जाणोनि ॥ २८ ॥ कैं कृपा करील गोविंद । कैं तुटेल भवबंध । कैं देखेन तो निजबोध । परमानंद जेणें होय ॥ २९ ॥ धांव पाव गा श्रीहरी । कृपा करीं दीनावरी । मज उद्धरीं भवसागरीं । भक्तकैवारी श्रीकृष्णा ॥ २३० ॥ जैसा जीवनावेगळी मासोळी । तैसा बोधालागीं तळमळी । प्रेमपडिभराच्या मेळीं । देह न सांभाळी सर्वथा ॥ ३१ ॥ एक नेणोनि नरदेहा मुकले । एकीं नव्हे म्हणोनि उपेक्षिले । एक ज्ञानगर्वें गिळिले । एक भुलले विषयार्थीं ॥ ३२ ॥ एक साधनाभिमानें ठकिले । एक करूं करूं म्हणतां गेले । एक करितां अव्हाटां भरले । करणें ठेलें तैसेंची ॥ ३३ ॥ जरी विवेक कळला मना । तरी न तुटती विषयवासना । तेणें संतप्त होऊनि जाणा । नारायणा चिंतितु ॥ ३४ ॥ कृष्ण म्हणे उद्धवासी । सविवेक वैराग्य असे ज्यासी । तोचि आपुला गुरु आपणासी । विशेषेंसी जाणावा ॥ ३५ ॥ त्याचिये निजबुद्धीसी । मीचि विवेकु प्रकाशीं । तो स्वयें जाणे निजबोधासी । निजमानसीं विवेकें ॥३६॥ ज्यासी जैसा भावो । त्यासी मी तैसा देवो । ये अर्थीं संदेहो । उद्धवा पहा हो न धरावा ॥३७॥ उद्धवा येथ केवळ । पाहिजे निजबुद्धि निर्मळ । तरी आत्मबोध तत्काळ । होय सफळ सर्वथा ॥ ३८ ॥

पुरुषत्वे च मां धीराः सांख्ययोगविशारदाः । आविस्तरां प्रपश्यन्ति सर्वशक्त्युपबृंहितम् ॥ २१ ॥

एवं वैराग्यें पूर्ण भरित । धीर पुरुष विवेकयुक्त । सांख्ययोग विवंचित । निजीं निज प्राप्त तत्काळ ॥ ३९ ॥ नरदेहीं विवेक वसे । निजरूप पावले कैसे । जें शक्तियुक्त असे । तें सावकाशें देखती ॥ २४० ॥ जें प्रसवे सर्वशक्तीतें । तें सर्वशक्ति शक्तिदातें । जें नातळे सर्वशक्तीतें । त्या स्वरूपातें

व त्यांतहि पतन आहेच, हें जाणून तो मनाला त्याचाहि स्पर्श होऊं देत नाहीं. २८ गोविंद केव्हां कृपा करील ! संसारबंध कधीं तुटेल ! ज्याच्या योगें परमानंद होतो, तें आत्मज्ञान केव्हां होईल ! २९ हे श्रीहरे ! धांव, बाबा पाव, दीनावर दया कर. हे भक्तांच्या कैवारी श्रीकृष्णा ! मला या भवसागरांतून उद्धरून ने. २३० पाण्यावांचून जसा मासा तळमळतो त्यप्रमाणें मला आत्मज्ञानाची तळमळ लागली आहे. अशी भगवत्प्रेमातिशयाची उकळी आल्यावर देहभानहि रहात नाहीं. ३१ कोणी अज्ञानानेंच मनुष्यदेहाला मुकले, कोणीं नास्तिकपणानें त्याची उपेक्षा केली, कोणाला ज्ञानगर्वानेंच ग्रासिलें, तर कोणी विषयांना भाळून त्यांतच पडले. ३२ कोणी साधनाभिमानानें फसले, कोणी करूं करूं म्हणतच मरून गेले, कोणी करीत असतां आडमार्गांत शिरले व करणें तसेंच राहिलें. ३३ मनाला विवेक कळला तरी विषयवासना सुटत नाहींत. त्यामुळें संताप येतो व नारायणाचें स्मरण होतें. ३४ श्रीकृष्ण उद्धवाला म्हणाले 'ज्याला विवेकयुक्त वैराग्य असतें तोच विशेषतः आपला आपणच गुरु होतो, असें जाण. ३५ त्याच्या मनांत मीच जेव्हां विवेकाला प्रकाशित करितों तेव्हां तो स्वतः विवेकानें मनांत आत्मज्ञान जाणतो. ३६ ज्याचा जसा भाव असतो, त्याला मी देवहि तसाच होतों, यांत तिळभरहि संशय धरूं नकोस. ३७ हे उद्धवा ! यासाठीं केवळ अंतःकरण निर्मळ पाहिजे, तरच तत्काळ आत्मबोध सफळ होतो. २३८.

—त्यांतील प्रत्यक्ष प्रमाणच दाखवितात—

सांख्ययोगविशारदाः धीराः पुरुषत्वे च सर्वशक्त्युपबृंहितं मां आविस्तरां प्रपश्यन्ति—आत्मानात्मविवेक व ध्यानरूप योग, यांमध्यें निष्णात असलेले विद्वान् मनुष्यशरीरांत सर्वशक्तींनीं युक्त असलेल्या मला अत्यंत प्रकट झालेला पहातात. [भूलोकांतील दुसऱ्या कोणत्याहि शरीरापेक्षां मनुष्यशरीरांत आत्मा आपल्या सर्व शक्तींनीं प्रकट झालेला आहे, असें 'पुरुषत्वे चाविस्तरामात्मा०' इत्यादि ऐतरेय आरण्यक श्रुतीनें वर्णन केलें आहे.] २१.

असा जो वैराग्यपूर्ण, धीर व विवेकयुक्त पुरुष सांख्य-योगाचा विचार करितो त्याला आत्मस्वरूपांतच तत्काल आत्मज्ञान प्राप्त होतें. ३९ मनुष्यदेहांत विवेक रहातो, पण त्यास आत्मस्वरूपाची प्राप्ति कशी होते ! असें जर म्हणशील तर जें सर्वशक्तिमान् तत्त्व आहे तेंच त्यांत सावकाश प्रकट होतें. २४० नंतर त्याच्यापासून सर्व शक्ति उत्पन्न होतात व सर्व शक्तींना शक्ति देणारें, पण सर्वशक्तींनाहि न कळणारें असें तें स्वरूप त्याला दिसतें,

पाहताती ॥ ४१ ॥ उद्धवा काय सांगों गोष्टी । बहुत शरीरें स्रजिलीं सृष्टीं । मज नरदेहीं आवडी मोटी । उठाउठी मी होतों ॥ ४२ ॥

एकद्वित्रिचतुष्पादो बहुपादस्तथाऽपदः । बह्वयः सन्ति पुरः सृष्टास्तासां मे पौरुषी प्रिया ॥ २२ ॥

केलीं एकचरणी शरीरें । दोपायांचीं अपारें । तीपायांचीं मनोहरें । अतिसुंदरें चतुष्पदें ॥ ४३ ॥ सर्पादि योनींच्या ठायीं । म्यां चरणचि केले नाहीं । एकें चालती बहुपायीं । केलीं पाहीं शरीरें ॥ ४४ ॥ ऐशीं शरीरें नेणों किती । म्यां निर्माण केलीं ये क्षितीं । मज कर्त्यातें नेणती । मूढमति यालागीं ॥ ४५ ॥ मज कर्त्याची प्राप्ती । होआवयालागीं निश्चितीं । स्वांशें प्रकाशोनि ज्ञानशक्ती । पौरुषी प्रकृति म्यां केली ॥ ४६ ॥ जेणें देहें मज पावती । त्या देहाची मज अतिप्रीती । यालागीं श्रुति नरदेह वर्णिती । देव वांछिती नरदेहा ॥ ४७ ॥ ऐशी नरदेहाची प्रीती । कृष्ण सांगे उद्धवाप्रती । येणें शरीरें मज पावती । नाना युक्तिविचारें ॥ ४८ ॥

अत्र मां मार्गयन्त्यद्धा युक्ता हेतुभिरीश्वरम् । गृह्यमाणैर्गुणैर्लिङ्गैरग्राह्यमनुमानतः ॥ २३ ॥

---

४१ हे उद्धवा ! तुला आणखी काय म्हणून सांगूं ! या सृष्टीमध्यें मीं पुष्कळ शरीरें उत्पन्न केलीं, पण मला मनुष्यदेहाची फार आवड. कारण त्या शरीरांत जीव सत्वर मद्रूप होतात. २४२.

—आतां त्याच पुरुषाची स्तुति—

एकद्वित्रिचतुष्पादः बहुपादः तथा अपदः बह्वयः पुरः सृष्टाः सन्ति--ज्यांना एकच पाय आहे, किंवा दोन, तीन, चार पाय आहेत, ज्यांना असंख्य पाय आहेत, किंवा मुळींच पाय नाहींत, अशीं मी अनेक शरीरें उत्पन्न केलीं आहेत. **तासां पौरुषी मे प्रिया**—त्यांतील मनुष्यशरीर मला अधिक प्रिय आहे. (याविषयीं 'पुरश्चक्रे द्विपदः०' बृ. २-५-१८. पृ. २५२ इत्यादि श्रुति प्रमाण आहे.) २२.

मीं कांहीं शरीरें एक पायाचीं निर्माण केलीं. दोन पायांचीं शरीरें असंख्य केलीं. कित्येक तीन पायांचे प्राणी उत्पन्न केले. चतुष्पाद तर अतिशय सुंदर आहेत. ४३ सर्पादि प्राण्यांना मीं मुळीं पायच ठेविले नाहींत. कित्येक प्राणी अनेक पायांनीं चालणारे आहेत. ४४ अशीं विविध शरीरें मीं उत्पन्न केलीं आहेत. या पृथ्वीतलावर अशीं मीं निर्मिलेलीं शरीरें किती प्रकारचीं आहेत त्याची गणति नाहीं. पण त्यांच्या कर्त्याला ते जाणत नाहींत. म्हणून ते मूढमति होत. ४५ मीं जो कर्ता त्याची प्राप्ति व्हावी म्हणून मीं आपल्या अंशानें ज्ञानशक्ति प्रकाशित करून हें पुरुषशरीर उत्पन्न केलें. ४६ ज्या देहानें माझी प्राप्ति होते त्या देहाची मला फार आवड आहे. म्हणूनच श्रुति मनुष्यदेहाचें वर्णन करिते व देव नरदेहाची इच्छा करितात. ४७ याप्रमाणें श्रीकृष्णानें उद्धवाला नरदेहावरील आपली प्रीति सांगितली. या शरीरानेंच ते अनेक सयुक्तिक विचारानें मला प्राप्त होतात. २४८.

—आतां अनुमान सांगतात—

अत्र युक्ताः मां अद्धा मार्गयन्ति—या मनुष्यशरीरांत आपल्या पारमार्थिक हिताविषयीं दक्ष असलेले मानव बाह्यपदार्थांहून भिन्न असलेल्या मला साक्षात् जाणण्याचा यत्न करितात. (माझ्या मार्गाचे दोन प्रकार आहेत, ते असे—) **गृह्यमाणैः गुणैः हेतुभिः लिंगैः अनुमानतः ईश्वरं मार्गयन्ति**—ग्रहण केल्या जाणाऱ्या बुद्ध्यादि गुणरूप हेतूंनीं स्वप्रकाश एका आत्म्यावांचून जडांचा प्रकाश संभवत नाहीं, अशा अनुपपत्तीच्या द्वारां, त्याचप्रमाणें त्याच गुणरूप लिंगांनीं व्याप्तीच्या द्वारां अनुमानानें त्यांच्या प्रवर्तक ईश्वराचें ज्ञान करून घेण्याचा यत्न करितात. [बुद्ध्यादि करणें-साधनें कर्त्याकडून प्रयोज्य-प्रेरणा केली जाण्यास योग्य आहेत. कारण त्यांना कोष्टी, सुतार इत्यादिकांच्या साधनांप्रमाणें क्रियासाधनत्व आहे. इत्यादि अनुमानानें त्याला जाणतात. पण एवढ्यावरून आत्मा अनुमानाचा विषय होतो, असें समजूं नये. कारण या अनुमानानें आत्म्याचें देहादिकांहून भिन्नत्व विवक्षित आहे व त्यानें केवल 'त्वं' पदार्थाची शुद्धि होते.] २३.

येऊनि नरदेहाप्रती । कर्त्याची गवेषणा जे करिती । जो मी ईश्वर त्रिजगतीं । उत्पत्तिस्थिति संहर्ता ॥ ४९ ॥ बुद्धियुक्ती विवेक करणें । तें जडें जे प्रकाशपणें । त्याचाही मी प्रकाशकु म्हणे । येणें लक्षणें लक्षिती ॥ २५० ॥ ऐशा नानापरींच्या अनुमानां । मी तंव वश नव्हें जाणा । जे लक्षिती सांडोनि अभिमाना । साक्षात्पणा ते येती ॥ ५१ ॥ ज्याची आशा होय निराश । तोचि ब्रह्म पावे सावकाश । तेणें कळिकाळावरी कांस । जाण अवश्य घातली ॥ ५२ ॥ सुख तंव स्वतःसिद्ध असे । तें निर्मळ आरिसां दिसे । तेवीं बुद्धिचेनि विवेकवशें । आत्मा भासे नरदेहीं ॥ ५३ ॥ येचिविखींचा इतिहास जाण । तुज सांगेन पुरातन । यदुअवधूतसंवादलक्षण । ज्ञानसाधन साधकां ॥ ५४ ॥

अत्राप्युदाहरन्तीममितिहासं पुरातनम् । अवधूतस्य संवादं यदोरमिततेजसः ॥ २४ ॥

हरिखें म्हणतसे गोविंदू । उद्धवा आमुचा पूर्वज यदू । तेणें ब्रह्मज्ञानासी संवादु । केला विशदू अवधूतासीं ॥ ५५ ॥ राजा यदू म्हणसी कैसा । क्षात्रसृष्टीचा सूर्यो जैसा । राजचंद्राच्या प्रकाशा । निजतेजवशा लोपितु ॥ ५६ ॥ तेणें गुरूचीं लक्षणें ऐकतां । सायुज्यमुक्ति आली हाता । ते हे पुरातन कथा । तुज मी आतां सांगेन ॥ ५७ ॥

अवधूतं द्विजं कंचिच्चरन्तमकुतोभयम् । कविं निरीक्ष्य तरुणं यदुः पप्रच्छ धर्मवित् ॥ २५ ॥

कोणी एक अवधूतु । निजतेजें प्रकाशवंतु । ब्रह्मानंदें डुल्लतु । यदूनें येतु देखिला ॥ ५८ ॥ त्या अवधूताचें लक्षण । यदु निरीक्षी आपण । देखिलें ब्रह्मसूत्रधारण । होय ब्राह्मण ब्रह्मवेत्ता ॥ ५९ ॥

नरदेहाला प्राप्त होऊन मज कर्त्याचा जे शोध करितात, मी जो उत्पत्ति, स्थिति व लय करणारा त्रैलोक्याचा ईश्वर ४९ त्या माझा आपल्या विवेचक बुद्धीनें विवेक करणें, त्यांतहि ज्ञानरूपानें प्रकाशित होणें, या सर्वांचा मी प्रकाशक आहें, असें मानणें इत्यादि उपायांनीं मला जे ओळखितात, २५० प्रकाशकत्वादि हेतूंनीं माझें जें अनुमान करितात त्यांना मी वश होत नाहीं, असें समज. जे अभिमान सोडून माझें स्वरूप पाहूं लागतात त्यांनाच माझा साक्षात्कार होतो.५१ ज्याची सर्व आशा नाहींशी होते त्यालाच सावकाश ब्रह्मप्राप्ति होते. त्यानेंच कलिकाळाशीं झगडण्यास कांस बांधिली आहे, असें समजावें. ५२ सुख तर स्वतःसिद्ध आहेच, पण निर्मळ आरसा असला तरच त्यांत तें दिसतें, त्याचप्रमाणें विवेकाच्या योगानें अंतःकरण निर्मळ झालें म्हणजे नरदेहांत आत्मा भासतो. ५३ याविषयीं एक जुना इतिहास मी तुला सांगतों. हा यदु-अवधूतसंवाद साधकांच्या ज्ञानाचें साधनच आहे. २५४.

पुनरपि अन्वय-व्यतिरेकानें असंभावनादि प्रतिबंधाची निवृत्ति होते याविषयीं इतिहास सांगतात—

अत्र अपि इमं पुरातनं इतिहासं उदाहरन्ति-याविषयींहि असा एक पुरातन इतिहास सांगतात. 'अवधूतस्य अमिततेजसः यदोः संवादम्—अवधूत व अत्यंत तेजस्वी यदु यांचा पूर्वीं झालेला संवाद सांगतात. २४.

गोविंद आनंदानें म्हणाला—' उद्धवा ! यदुनांवाचा आमचा एक पूर्वज होता. त्यानें अवधूताबरोबर ब्रह्मज्ञानाचा संवाद केला होता. ५५ यदुराजा कसा होता म्हणशील, तर ऐक. तो क्षत्रियांतील जणुंकाय सूर्यच, इतर नृपरूपी चंद्रप्रकाशाला आपल्या तेजानें लोपवीत होता. ५६ त्यानें गुरूचीं लक्षणें ऐकतांच त्याला सायुज्यमुक्ति प्राप्त झाली. तीच पूर्वींची कथा मी तुला सांगतों. ऐक २५७.

धर्मवित् यदुः—धर्मज्ञ यदु, अकुतोभयं चरतं कंचित् अवधूतं कविं तरुणं द्विजं निरीक्ष्य पप्रच्छ—निर्भयपणें संचार करणाऱ्या एका अवधूत विद्वान् तरुण ब्राह्मणाला पाहून विचारिता झाला. २५.

एकदां यदुराजानें कोणी एक आत्मतेजानें प्रकाशणारा व ब्रह्मानंदांत डुलणारा अवधूत येत असलेला पाहिला. ५८ त्या अवधूताच्या स्वरूपाचें यदूनें सूक्ष्म दृष्टीनें निरीक्षण केलें. त्याच्या गळ्यांत यज्ञोपवीत पाहून तो ब्रह्मवेत्ता ब्राह्मण असावा असा त्यानें निश्चय केला. ५९ तो अवधूत पृथ्वीवर निर्भयपणें फिरत होता. यदु वनांत क्रीडेसाठीं

एसा तो अवधूतु । निर्भय निःशंक वर्ततु । यदु व्याहाळिये होता जातु । देखिला वनांतु सन्मुख ॥ २६० ॥ आंतुला प्राण तत्त्वतां । बाहेर रिघों नेदी सर्वथा । स्वभावें प्राणापानसमता । जाली न धरितां धारणा ॥ ६१ ॥ नवल तयाचें पाहणें । दृश्य दृश्यत्वें देखों नेणें । झाला सर्वांगें देखणें । देखणेपणें पाहातसे ॥ ६२ ॥ मी एकु वनीं वसता । हेंही नाठवे त्याचिया चित्ता । झाली सर्वत्र सर्वगतता समसाम्यता समत्वें ॥ ६३ ॥ कर्म कार्य कर्ता जाण । अवघा जाहला तो आपण । क्रियेनें वाहूनियां आण । निंबलोण जीवें केलें ॥ ६४ ॥ देहाचिया माथां । ठेविली होती अहंता । तें देह मिथ्यात्व पावतां । समूळ अहंता पळाली ॥ ६५ ॥ नित्यानित्यहोमद्वारें । ब्रह्माग्नि प्रज्वळला एकसरें । जाळूनि आश्रमांचीं चारी घरें । केलें खरें निराश्रमी ॥ ६६ ॥ त्या आश्रमांमाजीं होती । शास्त्रश्रवणविधिवादपोथी । ते जळाली जी निश्चितीं । भस्म हातीं न लगेची ॥ ६७ ॥ विधिनिषेधपैजा । जळाली पंचायतनदेवपूजा । होता संचितक्रियमाणपुंजा । तोही बोजा जळाला ॥ ६८ ॥ यापरी तो अवधूतु । ब्रह्मानंदें जी डुल्लतु । निजसुखें वेल्हावतु । देखिला येतु यदुरायें ॥ ६९ ॥ संकल्पविकल्परहित । शुद्ध सर्वांगीं विभूत । यालागीं बोलिजे अवधूत । येऱ्हवीं विख्यात ब्राह्मणू ॥ २७० ॥ सभोंवता समस्तु । प्रपंच निजबोधें असे धूतु । यालागीं बोलिजे अवधूतु । येऱ्हवीं विख्यातु ब्राह्मणू ॥ ७१ ॥ अहं धुईव तो अवधूतु । तोचि योगी तोचि पुनीतु । जो कां अहंकारग्रस्तु । तोचि पतितु जन्मकर्मीं ॥ ७२ ॥ वार्धक्य यावें देहासी । तंव देहपण नाहीं देहापासीं । रिगमु नव्हेच जरेसी । तारुण्यासी तें मूळ ॥ ७३ ॥ आणिकही त्याचीं लक्षणें । निच नवा बोधु मैळों नेणे । भोगिजे नित्य नूतनपणें । परम तारुण्यें टवटवला ॥ ७४ ॥ निजबोधाचिया सत्ता । द्वैत जिंतिलें तत्त्वतां । ऐसा निःशंकु विचरतां । भय सर्वथा त्या नाहीं ॥ ७५ ॥

जात असतां तो त्याच्यासमोर येऊन उभा राहिला. २६० तो आपल्या शरीरांतील प्राणाला बाहेर निघूं देत नसे. धारणा न धरितां स्वाभाविकपणेंच त्याचा प्राण व अपान यांची समता झाली होती. ६१ त्याची दृष्टि मोठी चमत्कारिक होती. तो दृश्याला दृश्यत्वानें कधीं पहात नसे. तो आपल्या सर्वांगानें दृष्टीच झाला होता व सर्वत्र ज्ञानरूप पहात असे. ६२ मी कोणी एक वनांत रहाणारा आहें याचेंहि त्याला भान नव्हतें. सर्वत्र समदृष्टीच्या योगानें त्याला असें सर्वव्यापित्व आलें होतें. ६३ कर्म, कार्य व कर्ता हीं सर्व तो स्वतःच झाला होता. त्यानें शपथ वाहून जीवावरून क्रियेचें लिंबलोण उतरून टाकिलें होतें. ६४ देहावर अहंता ठेविली होती, पण देह मिथ्या ठरतांच ती अहंता पळून गेली. ६५ नित्य व अनित्य यांच्या होमद्वारां ब्रह्माग्नि प्रज्वलित झाला व त्यानें चारी आश्रमांचीं घरें जाळून त्याला निराश्रमी केलें होतें. ६६ त्या आश्रमांमध्यें शास्त्रश्रवणविधींची जी पोथी होती ती जळून खाक झाली, तिची राखसुद्धां हातीं लागली नाहीं. ६७ विधिनिषेधाची पैज मारणारी पंचायतनदेवपूजा होती, ती जळून भस्म झाली. संचित्-क्रियमाण-कर्मांचा ढीग होता, तोहि भस्मसात् झाला. ६८ याप्रमाणें तो आत्मानंदांत निमग्न झालेला अवधूत निजानंदानें डुलत डुलत येत असलेला यदुराजानें पाहिला. ६९ तो सर्व संकल्पविकल्परहित होता. त्यानें सर्वांगाला भस्म चर्चिलें होतें. म्हणून त्याला अवधूत म्हणत असत. एरवीं तो प्रख्यात ब्राह्मण होता. २७० तो आपल्या सभोंवार पसरलेल्या सर्व प्रपंचाला आत्मबोधानें धुवून टाकीत होता. म्हणून त्याला अवधूत म्हणावें. एरवीं तो प्रख्यात ब्राह्मणच होय. ७१ 'अहं' धुतो तो अवधूत, तोच योगी व तोच पवित्र होय आणि जो अहंकारग्रस्त असतो तोच जन्म-कर्मांत पडतो. ७२ देहाला वृद्धत्व यावें तर देहाला मुळीं देहत्वच नाहीं. जरेला वावच नाहीं. तेंच तारुण्य कायम रहाण्याचें मुख्य कारण आहे. ७३ आणखीहि त्याचीं लक्षणें आहेत. त्याचें नित्य नवीनच असलेलें ज्ञान मळत नाहीं. त्याचा तो नित्य नाविन्यानें उपभोग घेतो, म्हणून त्याचें तारुण्य मुसमुसलेलें असतें. ७४ आत्मज्ञानाच्या सामर्थ्यानें तो द्वैताला जिंकितो. याप्रमाणें निःशंकपणें फिरत असतां त्याला सर्वथा भय वाटत नाहीं. ७५ अशाप्रकारें अवधूताचीं सर्व

ऐशीं लक्षणें निर्धारितां । अवधूत निजबोधें पुरता । यदूसी उपजली विनीतता । श्रद्धा सर्वथा अनिवार ॥ ७६ ॥ करूनि साष्टांग दंडवत । अति नम्र श्रद्धायुक्त । हात जोडूनि पुसत । प्रसन्नचित्त रायाचें ॥ ७७ ॥

यदुरुवाच--कुतो बुद्धिरियं ब्रह्मन्नकर्तुः सुविशारदा । यामासाद्य भवाँल्लोकं विद्वांश्चरति बालवत् ॥

अपूर्व बुद्धि हे स्वामी । तुमचे ठायीं देखों आम्ही । जे न लभे यमनियमीं । कर्मधर्मीं आचरतां ॥ ७८ ॥ दिसतोसी सर्वार्थी कुशळ । परी कांहीं न करूनि निश्चळ । अकर्तात्मबोधें तूं केवळ । जैसें बाळ अहेतुक ॥ ७९ ॥ तूं बाळाऐसा वर्तसी । परी बाळबुद्धि नाहीं तुजपासीं । सर्वज्ञ सर्वथा होसी । ऐसें आम्हांसी दिसतसे ॥ २८० ॥ येवोनियां या लोकासी । पावोनियां नरदेहासी । सार्थकता तुझ्याऐसी । आणिकापाशीं न देखों ॥ ८१ ॥

प्रायो धर्मार्थकामेषु विवित्सायां च मानवाः । हेतुनैव समीहन्ते आयुषो यशसः श्रियः ॥ २७ ॥

प्रायशा ये लोकीं लोक । धर्मअर्थकामकामुक । येचिविखीं ज्ञान देख । आवश्यक करिताती ॥ ८२ ॥ आम्ही स्वधर्म करितों म्हणती । स्नानसंध्येची कीर्ति मिरविती । शेवटीं गायत्रीचें फळ देती । अर्थप्राप्तीलागोनी ॥ ८३ ॥ वेदोक्त आम्ही करितों याग । संस्थापितों वेदमार्ग । शेखीं तो करिती जीविकायोग । स्वर्गभोग वांछिती ॥ ८४ ॥ एक म्हणती आम्ही स्वकर्मक । कुश मृत्तिका नाशिती उदक । समयीं आलिया याचक । इवलीसी भीक न घालिती ॥ ८५ ॥ दांभिक वाढवावया स्फीती । वैष्णवदीक्षा अवलंबिती । देवपूजा झळफळीत दाविती । शंख लाविती दों हातीं ॥ ८६ ॥

लक्षणें पाहून व तो आत्मज्ञानानें परिपूर्ण आहे, असें जाणून यदूच्या मनांत त्याच्याविषयीं पूज्यबुद्धि उत्पन्न झाली व त्यावर अत्यंत श्रद्धा बसली. ७६ राजाचें चित्त प्रसन्न झालें व त्यानें त्यास साष्टांग दंडवत घालून अति नम्रतेनें भक्तिपूर्वक हात जोडून प्रश्न केला. २७७.

यदुः उवाच--यदु म्हणाला, ब्रह्मन्--हे ब्राह्मणा ! अकर्तुः तव इयं सुविशारदा बुद्धिः कुतः--कांहींहि न करणाऱ्या अशा तुला ही सर्वलोकविलक्षण अशी बुद्धि कोणत्या उपायानें प्राप्त झाली ? यां आसाद्य--कीं ज्या बुद्धीला प्राप्त होऊन, विद्वान् भवान्--एवढा विद्वान् असलेलाहि तूं, लोकं बालवत् चरति--लोकांमध्यें बालकाप्रमाणें संचार करीत आहेस ! २६.

यदु म्हणाला 'स्वामिमहाराज ! धर्म-कर्म आचरून किंवा यम-नियम करूनहि जें प्राप्त होत नाहीं तें मला तुमच्यामध्यें दिसत आहे. ७८ तुम्ही सर्व कर्मांत कुशल तर दिसतां, पण कांहीं न करितां स्वस्थ आहांत. बालक जसें अहेतुक असतें ७९ तसें तुम्ही आत्मज्ञानानें अकृतकत्व संपादिलेलें दिसतें. तुम्ही मुलासारखें वागतां, पण तुमची बुद्धि मात्र मुलासारखी नाहीं. तुम्ही सर्वथा सर्वज्ञ आहांत, असेंच मला वाटतें. २८० या मृत्युलोकीं येऊन दुसरें कोणीहि तुमच्यासारखें नरदेहाचें सार्थक्य केलेलें मीं पाहिलें नाहीं. २८१.

--राजा त्याचें सर्वलोकवैलक्षण्यच सांगतो--

प्रायः मानवाः धर्मार्थकामेषु विवित्सायां च आयुषः यशसः श्रियः हेतुना एव समीहन्ते--बहुतेक सर्व मानव धर्म, अर्थ व काम यांमध्यें आणि आत्मविचारामध्येंहि आयुष्य, यश व श्री यांच्या कामनेनेंच प्रवृत्त होतात. २७.

मृत्युलोकांत प्रायः सर्वलोक धर्म-अर्थ-काम यांचीच इच्छा करणारे असतात. म्हणून त्यांविषयींचेंच ज्ञान ते अवश्य मिळवितात. ८२ आम्ही स्वधर्म पाळितों म्हणतात. स्नानसंध्येची प्रौढी मिरवितात आणि शेवटीं द्रव्यप्राप्तीसाठीं गायत्रीचें फल देऊन टाकितात. ८३ 'आम्ही वेदोक्त यज्ञ करितों, वेदमार्ग स्थापन करितों' असें म्हणून शेवटीं त्याला उपजीविकेचें साधन बनवितात व स्वर्गभोगांची इच्छा करितात. ८४ कोणी म्हणतात कीं, आम्ही कर्मठ आहोंत ! व ते दर्भ, माती आणि उदक यांचा व्यर्थ व्यय करितात. पण त्या वेळेला एखादा याचक जर दारांत आला तर त्याला एवढीशी भिक्षाहि घालीत नाहींत. ८५ दांभिक लोक आपला लौकिक वाढविण्यासाठीं 'वैष्णवदीक्षा' घेतात, घवघवित देवपूजा करून दाखवितात आणि दोन हातांनीं शंखध्वनि करितात. ८६ आयुष्य

आयुष्यदानी पुण्यपुरुष । आम्ही चिकित्सक अहिंस । स्थावर जंगम जीव अशेष । मारूनियां यश मिरविती ॥ ८७ ॥ यश वाढवावयाचें कारण । तुळापुरुष करिती दान । देहो मूत्रविष्ठें परिपूर्ण । धन त्यासमान जोखिती ॥ ८८ ॥ परी परमार्थाचिया चाडा । कोणी वेंचीना कवडा । भूल कैशी पडली मूढां । स्वार्थ रोकडा विसरले ॥ ८९ ॥ पूर्वी अदृष्टीं नाहीं प्राप्ती । ते श्रीकामा उपास्ती करिती । श्रियेचा स्वामी श्रीपती । त्यातें न भजती अभाग्य ॥ २९० ॥ लक्ष्मी विश्वगुरु हरीची पत्नी । तीतें जो तो राखे अभिलाषूनी । नेदिती हरीची हरीलागोनी । त्यांतें पचनीं हरि पचवी ॥ ९१ ॥ रोगत्यागें आयुष्य मागती । यालागीं सविता उपासिती । देहो नश्वर हें नाठवे चित्तीं । पडली भ्रांती निजपदा ॥ ९२ ॥ एवं आयुष्य-यश-श्रीकामीं । समस्त भजतां देखों आम्ही । परी नवल केलें तुवां स्वामी । परब्रह्मीं निजबोधू ॥ ९३ ॥ विषयबळ अलोलिक । मिथ्या भ्रमें भ्रमलें लोक । ज्ञानसाधनें साधोनि देख । विषयसुख वांछिती ॥ ९४ ॥ वेदान्तवार्तिकवाक्स्फूर्तीं । अद्वैतब्रह्म प्रतिपादिती । शेखीं पोटासाठीं विकिती । नवल किती सांगावें ॥ ९५ ॥ एक म्हणविती योगज्ञानी । वायुधारणा दाविती जनीं । टाळी लाऊनि बैसती ध्यानीं । जीविका मनीं विषयांची ॥ ९६ ॥ ऐसे विविदिष लोक । साधनें साधूनि झाले मूर्ख । तुवां केलें जी अलोलिक । आत्मसुख साधिलें ॥९७॥ ऐसें स्वामी अवधूता । तुवां तृणप्राय केलें जीविता । तुच्छ करोनि लोकां समस्तां । निजात्महिता मीनलासी ॥ ९८ ॥ निजानंदें निवालासी । अंतरीं शीतलु झालासी । ऐसें दिसताहे आम्हांसी । उपलक्षणेंसीं परियेसी ॥ ९९ ॥

त्वं तु कल्पः कविर्दक्षः सुभगोऽमृतभाषणः । न कर्ता नेहसे किंचिज्जडोन्मत्तपिशाचवत् ॥ २८ ॥

वाढविणारे पुण्यपुरुष आपल्याला वैद्य व अहिंसक म्हणवितात, परंतु स्थावर-जंगम जीवांची निःशेष हिंसा करून यशाची प्रौढी मिरवितात. ८७ आपलें यश वाढावें म्हणून कोणी तुळापुरुष दान देतात व मलमूत्रयुक्त असलेल्या देहाची धनाबरोबर तुलना करून दोहोंची योग्यता सारखी ठरवितात. ८८ परंतु परमार्थासाठीं कोणी एक कवडीहि खर्च करीत नाहीं. मूढ लोकांना कशी भुरळ पडते, पहा ! ते खऱ्या स्वार्थाला विसरतात ! ८९ त्यांच्या नशीबीं द्रव्ययोग नसूनहि ते लक्ष्मीसाठीं उपासना करितात; पण लक्ष्मीचा स्वामी जो श्रीपति त्याला ते अभागी भजत नाहींत. २९० विश्वाचा गुरु श्रीहरि, त्याची पत्नी लक्ष्मी, त्या लक्ष्मीचाच जो तो अभिलाष धरितो व हरीची पत्नी त्याची त्यालाच देत नाहींत, ९१ म्हणून तो त्यांना नरकांत टाकितो. रोगांचा नाश होऊन आयुष्य वाढावें म्हणून ते सूर्याची उपासना करितात, पण देहच मुळीं नश्वर आहे, याचें त्यांना स्मरणहि नसतें. त्यांना आत्मस्वरूपाची भ्रांति पडलेली असते. ९२ याप्रमाणें आयुष्य, यश व द्रव्य यांच्यासाठीं लोक देवाला भजत असलेले आम्ही पहातों. परंतु हे स्वामिराया ! तूं परब्रह्मस्वरूपांत व आत्मबोधांत निमग्न होऊन केवढें आश्चर्य करून दाखविलेंस ! ९३ विषयांची शक्ति कांहीं विलक्षण आहे. त्या मिथ्याभ्रमाला लोक भाळले आहेत. ज्ञानसाधनें जमवून ते विषयसुख इच्छितात ! ९४ वेदान्त, वार्तिक इत्यादि वाक्स्फूर्तीला ते अद्वैतब्रह्माचें प्रतिपादन करितात व शेवटीं त्याच ज्ञानाची पोटासाठीं विक्री करितात, हें केवढें आश्चर्य ! ९५ कोणी योगज्ञानी म्हणवितात व लोकांना वायुनिरोध करून दाखवितात. कोणी ध्यान धरून बसतात, पण मनांत मात्र विषयांचें चिंतन करीत असतात. ९६ असे अनेक जिज्ञासु नानाप्रकारचीं साधनें साधून मूर्ख बनतात. तुम्ही मात्र अलौकिक खरे. तुम्हीं आत्मसुखच संपादन केलेंत. ९७ याप्रमाणें हे अवधूतस्वामी ! तुम्हीं जीवित तृणप्राय करून टाकिलेंत. सर्व लोकांना तुच्छ करून स्वतः आत्महितामध्येंच रमला आहांत, ९८ आत्मानंदानें तृप्त होऊन हृदयांत शांत आहांत, असें आम्हांला दिसतें. त्याचीं लक्षणें ऐका ! २९९.

त्वं तु कल्पः कविः दक्षः सुभगः अमृतभाषणः—पण तूं समर्थ, अतिशय ज्ञानी, निपुण, सुंदर, व अमृतासारखें मधुर भाषण करणारा असा असूनहि (म्ह० असामर्थ्य, अज्ञान, अनैपुण्य, विरूपत्व किंवा मुखदुर्बलत्व यांतील औदासीन्याचें एकहि कारण तुझ्यांत संभवत नसतांना), जडोन्मत्तपिशाचवत् किंचित् न कर्ता—जड, मूढ, किंवा पिशाचवत्—मूर्ख मनुष्याप्रमाणें कोणतेंहि कर्म न करणारा, किंचित् न ईहसे—कशाचीहि इच्छा न करणारा आहेस. २८.

सर्वज्ञाता तूं होसी । तें ज्ञातेपणा दिसों नेदिसी । कांहीं करिसी ना वांछिसी । जडत्वें दाविसी निजशांती ॥ ३०० ॥ सर्वथा उगा असमी । परी तूं अंगें विकळ नव्हसी । अंगीं अव्यंगी दिसतोसी । स्वरूपरूपेंसीं शोभितु ॥ १ ॥ ज्ञान एकलेपणें ठेलें । दुजेनवीण परदेशी जालें । तें तुजमाजीं सामावलें । यालागीं आलें कविपद ॥ २ ॥ करूनि जालासी अकर्ता । हेचि तुझी थोर दक्षता । ब्रह्मरसें रसाळ बोलतां । चवि अमृता ते कैंची ॥ ३ ॥ ब्रह्मरस तूं प्यालासी । ब्रह्मानंदें मातलासी । जगीं उन्मत्त जालासी । दृष्टीं नाणिसी कोणातें ॥ ४ ॥ सदा सावध निजरूपेंसी । यालागीं माझें तुझें न म्हणसी । तेंचि पिसेपण तुजपासीं । दिसे जगासी सर्वथा ॥ ५ ॥ निजबोधें तृप्त झालासी । परमानंदें निवालासी । तीं हीं लक्षणें तुजपासीं । निर्धारेंसी दिसताती ॥ ६ ॥

जनेषु दह्यमानेषु कामलोभदवाग्निना । न तप्यसेऽग्निना मुक्तो गङ्गांभःस्थ इव द्विपः ॥ २९ ॥

कामलोभदवाग्नी- । माजीं जळतां लोक तीन्ही । देखत असों जी नयनीं । वेगळा कोणी दिसेना ॥ ७ ॥ ते दवाग्नीमाजीं असतां । तूं न पोळसी गा अवधूता । नवल तुझी अक्षोभ्यता । न कळे सर्वथा आम्हांसी ॥ ८ ॥ वणवा जळे दोहीं थडीं । गजें गंगाजळीं दिधली बुडी । त्यासी न लागती तापाच्या वोढी । तैसें निरवडीं तुज देखों ॥ ९ ॥ ऐशीं द्वंद्वें तुज नातळती । दृढ राहिलासी ब्रह्मस्थितीं । कांहीं एक करीन विनंती । कृपामूर्ति दयाळुवा ॥ ३१० ॥

त्वं हि नः पृच्छतां ब्रह्मन्नात्मन्यानन्दकारणम् । ब्रूहि स्पर्शविहीनस्य भवतः केवलात्मनः ॥ ३० ॥

तुम्ही सर्वज्ञ आहांत, पण आपला ज्ञातेपणा दिसूं देत नाहीं. तुम्ही कांहीं करीतहि नाहीं व कांहीं इच्छीत नाहीं. स्वस्थ राहून आपली शांति प्रकट करितां. ३०० तुम्ही अगदीं स्थिर दिसतां, पण विकल होत नाहीं. तुमचें शरीर अव्यंग असल्यामुळें स्वरूपानेंहि फार शोभिवंत दिसतां. १ ज्ञान एकटेंच होतें. त्यांच्याबरोबर दुसरें कोणी नसल्यामुळें तें परदेशी झालें होतें. पण तें तुम्हांमध्यें येऊन सामावलें, म्हणून तुम्हांला ज्ञानपद प्राप्त झालें आहे. २ तुम्ही करून अकर्ते आहांत, हेंच मोठें कौशल्य आहे. तुम्ही ब्रह्मरसानें रसाळ भाषण करूं लागलांत कीं, तें माधुर्य अमृताला कसचें येणार ! ३ तुम्ही ब्रह्मरस प्राशन करून ब्रह्मानंदानें मत्त झाला आहांत आणि जगांत कोणाकडे लक्षच देत नाहीं. ४ तुम्ही सदासर्वदा आत्मस्वरूपांत जागृत असल्यामुळें 'माझें तुझें' असें कधीं म्हणत नाहीं. हें वेड तुमच्यापाशीं आहे, तें मात्र सर्व जगाला दिसतें. ५ तुम्ही आत्मज्ञानानें तृप्त झालां आहां. परमानंदानें शांत झालां आहां. हीं लक्षणें तुमच्यामध्यें स्पष्ट दिसत आहेत. ३०६.

—तुमचा हा फार मोठा आनंद कोणत्या कारणानें व्यक्त होत आहे असें यदु विचारितो—

कामलोभदवाग्निना जनेषु दह्यमानेषु अग्निना मुक्तः गङ्गांभःस्थः द्विपः इव त्वं न तप्यसे–काम व लोभ याच दावाग्नीनें सर्वलोक दग्ध होत असतांना वणव्यांतून सुटलेल्या व गंगाजलांत उभ्या असलेल्या हत्तीप्रमाणें तूं मुळींच संतप्त होत नाहींस ! २९.

काम–लोभरूपी दावाग्नींत जळत असलेलें हें त्रैलोक्य आमच्या डोळ्यांना दिसत आहे. त्यांतून कोणीच सुटलेला दिसत नाहीं. ७ परंतु हे अवधूतस्वामी ! तूं त्या दावाग्नींत असूनहि पोळत नाहींस. तुझी शांति मोठी विलक्षण खरी ! ती आम्हांला कधींहि कळणार नाहीं. ८ नदीच्या दोन्ही तीराला वणवा लागला असतां हत्तीनें गंगेंत उडी टाकिली, म्हणजे त्याला जशा अग्नीच्या झळा लागत नाहींत, त्याप्रमाणें तूं निश्चयानें दुःखमुक्त आहेस. ९ शीतोष्णादि द्वंद्वें तुला स्पर्शहि करीत नाहींत. तूं ब्रह्मस्वरूपांत स्थिर राहिला आहेस. याकरितां हे दयाळा कृपामूर्ते ! तुला एक विनंति करितों. १०.

ब्रह्मन्-हे ब्राह्मणा ! पृच्छतां नः–आदरानें विचारीत असलेल्या आम्हाला, **स्पर्शविहीनस्य केवलात्मनः भवतः आत्मनि आनंदकारणं त्वं हि ब्रूहि**–कलत्रादि भोगसाधनशून्य व त्यामुळेंच विषयभोगरहित अशा तुझ्या चित्तांतील आनंदाचें कारण तूंच सांग. ३०.

तूं ब्रह्मवेत्ता ब्राह्मण । निजानंदें परिपूर्ण । त्या आनंदाचें कारण । विशद करून सांगावें ॥ ११ ॥ तूं देहीं वर्तसी विदेहस्थिती । तुज विषय आतळूं न शकती । हे अलिप्तपणाची प्राप्ती । कवण्यारीतीं तुज झाली ॥ १२ ॥ तुज नाहीं रायाची भीड । न करिसी धनवंताची चाड । दीनवचन मानिसी गोड । पुरविसी कोड निजबोधें ॥ १३ ॥ ऐसा केवळ तूं कृपाळू । आर्तबंधू दीनदयाळू । निजात्मभावें तूं केवळू । भक्तवत्सलू भावार्थें ॥ १४ ॥ ऐसा यदूचा संवादू । आवडीं सांगे गोविंदू । उद्धवासी म्हणे सावधू । हृदयीं बोधू धरावा ॥ १५ ॥

श्रीभ०–यदुनैवं महाभागो ब्रह्मण्येन सुमेधसा । पृष्टः सभाजितः प्राह प्रश्रयावनतं नृपम् ॥ ३१ ॥

श्रीमुखें श्रीकांत । यदूचें भाग्य वर्णित । ब्राह्मणभक्त सत्वयुक्त । बुद्धिमंत श्रद्धाळू ॥ १६ ॥ भगवद्भाग्यें भाग्यवंतू । यदूसी भेटला तो अवधूतू । त्यासी होऊनि अतिविनीतू । असे विनवितू निजहिता ॥ १७ ॥ मृदु मंजुळ वचनीं प्रार्थिला । मधुपर्कविधानें पूजिला । अवधूत अतिसंतोषला । बोलता झाला निजमुखें ॥ १८ ॥

ब्रा०–सन्ति मे गुरवो राजन् बहवो बुद्ध्युपाश्रिताः । यतो बुद्धिमुपादाय मुक्तोऽटामीह तान् श‍ृणु ॥ ३२ ॥

क्षीरसागर उचंबळला । कीं कृपेचा मेघ गर्जिन्नला । निजसुखाचा वाधावा आला । तैसें बोलिला ब्राह्मणु ॥१९॥ ऐकें राजया चूडामणी।यदुकुळदीप दिनमणी।धन्य धन्य तुझी वाणी।निजगुणीं निवविलें॥२०॥ राजा आणि सात्विकु । सिद्धलक्षणें लक्षकु । पृथ्वीमाजीं तूंचि एकु ।न दिसे आणिकु सर्वथा ॥२१॥ सुंदर आणि

तूं ब्रह्मवेत्ता ब्राह्मण असून आत्मानंदानें परिपूर्ण आहेस. त्या आनंदाचें कारण मला स्पष्ट करून सांग. ११ तूं देहांत असून विदेहस्थितींत वागत आहेस. तुला विषय स्पर्शहि करीत नाहींत. इतका अलिप्तपणा तुला कोणत्या उपायानें प्राप्त झाला ! १२ तुला राजाची भीड नाहीं, धनिकाची चाड नाहीं, गरिबाचें भाषण मात्र गोड मानितोस आणि त्यांचे मनोरथ आत्मज्ञानानें पूर्ण करितोस. १३ असा तूं अत्यंत कृपाळु आहेस. तूं दुःखार्तांचा बंधु, दीनदयाळ आहेस व तूं केवल आत्मभावानें भक्तवत्सल आहेस. १४ श्रीकृष्णानें यदुराजाचा हा संवाद आनंदानें सांगितला व तो उद्धवाला म्हणाला कीं, आतां हा बोध सावधान चित्तानें ग्रहण कर. ३१५.

श्रीभगवान् उवाच–श्री भगवान् म्हणाले, सुमेधसा ब्रह्मण्येन यदुना एवं पृष्टः सभाजितः–अतिशय बुद्धिवान् व ब्राह्मणांचा भक्त अशा यदूकडून असें विचारिला गेलेला व सत्कार केला गेलेला तो महात्मा अवधूत, प्रश्रयावनतं नृपं प्राह–विनयानें नम्र झालेल्या राजाला बोलला. ३१.

नंतर श्रीपति यदूचें भाग्य वर्णूं लागले. तो यदुराजा ब्राह्मणाचा भक्त बुद्धिमान् व श्रद्धाळु होता. १६ म्हणूनच भगवंताच्या कृपेनें भाग्यवान् झालेला अवधूत त्याला भेटला. तेव्हां आपल्या कल्याणासाठीं यदूनें अत्यंत नम्रतेनें त्याला विनंति केली. १७ त्याची मधुपर्कविधीनें पूजा करून मृदु व मधुर वाणीनें प्रार्थना केली. तेव्हां अवधूत संतुष्ट होऊन बोलूं लागला. ३१८.

ब्राह्मणः उवाच–ब्राह्मण म्हणाला, राजन्–हे राजा, बुद्ध्युपाश्रिताः मे बहवः गुरवः सन्ति–मीं केवल आपल्या बुद्धीनेंच ज्यांचा स्वीकार केला आहे [उपदेशानें नव्हे] असे माझे पुष्कळ गुरु आहेत. यतः बुद्धिं उपादाय–ज्यांच्यापासून मी स्वतःच ज्ञान संपादन करून, मुक्तः इह अटामि–व मुक्त होऊन जगांत फिरत आहें, तान् श‍ृणु–ते कोणते तें ऐक. ३२.

क्षीरसागर जसा उचंबळावा किंवा कृपारूपी मेघगर्जना व्हावी किंवा आत्मसुखाचा संदेश यावा तसा तो ब्राह्मण बोलूं लागला. १९ हे राजचूडामणे, यदुकुलदीपकदीनमणे ! ऐक, तुझी वाणी धन्य आहे, तूं आपल्या गुणांनीं मला तृप्त केलेंस. ३२० राजा असून सात्त्विक, सिद्धलक्षणांनीं युक्त असा पृथ्वीमध्यें तूंच एक मला दिसतोस. दुसरा कोणीहि दिसत नाहीं. २१ तूं जो प्रश्न केलास तो सुंदर, गुणयुक्त व उत्तमोत्तम आहे. तूं निजानंदाचें कारण

सगुण । उत्तमोत्तम केला प्रश्न । पुसिलें निजानंदकारण । तें यथार्थ जाण सांगेन ॥ २२ ॥ गुरुवीण आत्मप्राप्ती । सर्वथा न घडे गा नृपती । ते गुरुही मी तुजप्रती । यथानिगुतीं सांगेन ॥ २३ ॥ निजबुद्धीच्या विवेकस्थितीं । बहुत गुरु म्यां केले असती । जे जे सद्गुण म्यां देखिले भूतीं । ते ते स्थितीं तो गुरु ॥ २४ ॥ बुद्धीनें अंगीकारिलें गुणा । निजधैर्यें धरिली धारणा । तेणें मी मुक्त जालों जाणा । स्वेच्छा अटणा करीतसें ॥ २५ ॥ संसारु तरावया । मुख्य सद्बुद्धि गा राया । रिगमू नाहीं आणिका उपाया । व्यर्थ काह्या शिणावें ॥ २६ ॥ सद्बुद्धि नाहीं ज्यापासीं । तो संसाराची आंदणी दासी । उसंत नाहीं अहर्निशीं । दुःखभोगासी अनंत ॥ २७ ॥ सद्बुद्धि नाहीं हृदयभुवनीं । तेथ वैराग्य नुपजे मनीं । मा तो तरेल कैसेनी । विवेक स्वप्नीं न देखे ॥ २८ ॥ वैराग्याचेनि पडिपाडें । ज्यासी सद्बुद्धि सांपडे । तेथ संसार कोण बापुडें । घायें रोकडें विभांडी ॥ २९ ॥ आधीं संसारु एकु असावा । मग तो खटाटोपें नासावा । जो रिघाला विवेकगांवा । त्यासी तेव्हां तो नाहीं ॥ ३३० ॥ संसारनाशासी मूळ । साह्य प्रज्ञाचि केवळ । तिचें जाल्या अढळ बळ । होये मृगजळ संसारू ॥ ३१ ॥ जे मी गुरु सांगेन म्हणे । तें निजप्रज्ञेचेनि लक्षणें । हेयोपादेयउपायपणें । घेणेंत्यजणें सविवेकें ॥ ३२ ॥ हेचि मऱ्हाठिया भाखा । सांगेन तें सावध ऐका । जेणें शिष्याचा आवांका । पडे ठाउका प्रत्यक्ष ॥ ३३ ॥ ऐक प्रज्ञेचीं लक्षणें । सांगेन दृष्टांतपणें । सूपचाळणी रांधणें । घेणें त्यजणें विवेकें ॥ ३४ ॥ चाळणीमाजीं जें जें पडे । सूक्ष्म निजतत्त्व तळीं सांडे । उरती गुणदोषांचे खडे । करी बडबडे खडबडित ॥ ३५ ॥ ऐसी जे अवस्था । ते त्यागावी सर्वथा । भ्रंशु होईल स्वार्था । हे राखतां विशुद्धी ॥ ३६ ॥ सुपाची दशा ते ऐसी । त्यजी रजःकण भुंसासी । निडारल्या निजबीजासी । निजहृदयेंसीं राखत ॥ ३७ ॥ स्वयें

विचारिलेंस, तें मी तुला यथार्थ सांगतों. २२ हे राजा, गुरूवांचून आत्मप्राप्ति कधींच होत नाहीं. ते गुरु कसे, हें मी तुला स्पष्टपणें सांगतों. २३ आत्मबुद्धीचा विचार करीत असतां मीं अनेक गुरु केले. २४ ज्या ज्या वस्तूंत जो जो सद्गुण माझ्या दृष्टीस पडला त्या त्या विषयांत मीं त्याला गुरु केलें व मनानें त्या त्या गुणांचें ग्रहण केलें. आत्मधैर्यानें मीं धारणा धरिली म्ह० स्थिर झालों. त्यायोगें मी मुक्त झालों व आतां स्वेच्छेनें पर्यटन करीत आहें. २५ हे राजा ! संसार तरून जाण्यास मुख्य सद्बुद्धि पाहिजे. तिच्यावांचून अन्य उपायांचा तेथें प्रवेशहि होणें नाहीं, मग व्यर्थ कष्ट तरी कशाला सोसावे २६ ! ज्याच्यापाशीं सद्बुद्धि नाहीं, तो संसाराला आंदण दिलेल्या दासीसारखाच होय. रात्रंदिवस क्षणाचीहि विश्रांति नाहीं. हजारों दुःखें भोगीत असतो. २७ ज्याच्या हृदयमंदिरांत सद्बुद्धि नाहीं, त्याच्या मनांत विरक्ति कधींच उत्पन्न होत नाहीं, मग तो तरणार कशानें ! विवेक तर तो स्वप्नांतहि पहात नाहीं. २८ वैराग्याच्या भरांत सद्बुद्धि आठवली कीं मग तिच्यापुढें बिचाऱ्या संसाराची काय कथा ! त्याचे एका घावांत दोन तुकडे होतात. २९ अहो, अगोदर संसार जर असेल तर मग त्याचा नाश करण्याचा प्रयत्न करावयाचा ! पण जो विवेकाच्या गांवीं जावयास निघतो त्याला मुळीं संसारच नाहीं. ३३० संसारनाशाला साह्य करणारी मुख्य बुद्धीच काय ती एक आहे. तिचें बळ कायम असलें म्हणजे संसार मृगजलाप्रमाणेंच होतो. ३१ मी जे तुला गुरु सांगणार आहें त्यांची आपल्या बुद्धीनें निवड करून, त्यांतील ग्राह्य तेवढें स्वीकारावें व त्याज्य तें टाकावें. ३२ तेंच मी आतां प्राकृत भाषेंत सांगतों, तें तूं नीट लक्ष देऊन ऐक. त्यामुळें शिष्याची ग्रहणशक्ति स्पष्टपणें दिसून येईल. ३३ आतां अगोदर बुद्धीचीं लक्षणें ऐक. तीं दृष्टान्त देऊन सांगतों. तीं सुपांत घालून पाखडून व चाळणीनें चाळून मग रांधावीं. त्यांतील विचारानें हवें तें ठेवावें व नको तें टाकावें. ३४ चाळणींतून जें चाळावें त्यांतील अतिसूक्ष्म तत्त्व तेवढें खालीं पडून गुणदोषांचे खडे मात्र वर रहातात व ते खडबड खडबड वाजतात. ३५ अशा स्थितीचा विशेष त्याग करावा. कारण त्याच स्थितींत रहाण्यानें स्वार्थांत व्यत्यय येतो. ३६ पण सुपाचा प्रकार वेगळा असतो. तें भुसा, कोंडा वगैरे सर्व पांखडून दूर फेकून देतें व अस्सल बीज तेवढें आपल्या हृदयाशीं धरून ठेवितें. ३७ स्वतः वैराग्यानें तापणें याला शिजविणें असें म्हणतात. आपणच आपल्या गुणांनीं अपक्काला परि-

वैराग्यें तापणें । ते दशा रांधणें म्हणे । अपक्का परिपक्क करणें । निजगुणें निजांगें ॥ ३८ ॥ एवं या दोनी दशा । दृढ धराव्या वीरेशा । तेणें परमार्थु होये आपैसा । जेवीं आरिसा हातींचा ॥ ३९ ॥ यदूसी म्हणे ब्राह्मण । जें म्यां सांगितलें लक्षण । तेथें ठेवूनियां मन । सावधान परियेसीं ॥ ३४० ॥ जो जो जयाचा घेतला गुण । तो तो गुरु म्यां केला जाण । गुरूसी आलें अपारपण । जग संपूर्ण गुरु दिसे ॥ ४१ ॥ ज्याचा गुण घेतला । तो सहजें गुरुत्वा आला । ज्याचा गुण त्यागरूपें घेतला । तोही गुरु झाला अहितत्यागें ॥ ४२ ॥ एवं त्यागात्यागसमतुकें । दोहींसी गुरुत्व आलें निकें । राया तूं पाहें पां विवेकें । जगचि असकें गुरु दिसे ॥ ४३ ॥ ऐसें पाहतां सावकाशीं । गुरुत्व आलें जगासी । हेंचि साधन जयापासीं । तोचि परमार्थासी साधकु ॥ ४४ ॥ ऐसें सांगतां अचाट । तुज वाटेल हें कचाट । तरी गुरु सांगों श्रेष्ठश्रेष्ठ । मानिले वरिष्ठ निजबुद्धीं ॥ ४५ ॥

पृथिवी वायुराकाशमापोऽग्निश्चन्द्रमा रविः । कपोतोऽजगरः सिन्धुः पतङ्गो मधुकृद्गजः ॥ ३३ ॥
मधुहा हरिणो मीनः पिङ्गला कुररोऽर्भकः । कुमारी शरकृत्सर्प ऊर्णनाभिः सुपेशकृत् ॥ ३४ ॥

गुरु सांगेन अशेष । संख्याप्रमाण चोवीस । त्याचीं नांवें तूं परिस । सावकाश सांगेन ॥ ४६ ॥ पृथ्वी वायु आकाश । अग्नि आप सितांश । सातवा तो चडांश । कपोत परिस आठवा ॥ ४७ ॥ अजगर सिंधु पतंग । मधुमक्षिका गज भृंग । हरिण मीन वेश्या सांग । नांवें सुभग पिंगला ॥ ४८ ॥ टिटवी आणि लेंकरूं । कुमारी आणि शरकारु । सर्प कातणी पेशस्करु । इतुकेन गुरू चोवीस ॥ ४९ ॥ पावावया तत्व पंचविसावें । चोविसां गुरूंसी उपासावें । विवेकयुक्तिस्वभावें । गुरु भजावे निजबुद्धीं ॥ ३५० ॥ ठाकावया निजबोधासी । निजविवेकें अहर्निशीं । गुरुत्व देऊनि अनेकांसी । निजहितासी गुरु केले ॥ ५१ ॥ कोण युक्ती कोण विचारू । कोणें लक्षणें कोण गुरु । केला तोही निजनिर्धारू । सविस्तारू परियेसीं ॥ ५२ ॥

पक्व करणें हीच ती स्थिति होय. ३८ हे वीरश्रेष्ठा ! याप्रमाणें या दोनहि स्थिति दृढ कराव्या. म्हणजे हातच्या आरशाप्रमाणें परमार्थ सहज प्राप्त होतो. ३९ तो ब्राह्मण यदूला म्हणाला कीं, मीं तुला जें हें लक्षण सांगितलें तें ध्यानांत ठेवून आतां आणखी लक्षपूर्वक ऐक. ज्याच्यापासून जो गुण मीं घेतला त्याला मीं आपला गुरु केलें. त्यामुळें माझे गुरु इतके अगणित झाले कीं, सर्व जगत् मला गुरूंनीं भरलेलें दिसत आहे. ४१ ज्याचा मीं गुण घेतला तो तर माझा गुरु झालाच, पण ज्याचा दोष पाहून मीं त्याग केला तोहि पण माझा गुरूच झाला. (कारण दोषयुक्त असेल त्याचा त्याग करावा हें मी त्या गुरूपासून शिकलों.) ४२ याप्रमाणें गुणग्राह्यता व दोषत्याग या दोहोंतील समानभावानें त्या दोघांकडेहि गुरूचा मान आला. हे राजा ! आतां तूंहि असाच विचार करून पहा, म्हणजे तुलाहि हें सर्व जगत् गुरुमय दिसेल. ४३ असें सावकाश पाहिलें असतां सर्व जगत्च गुरु दिसूं लागतें. ज्याच्यापाशीं हें साधन असतें तो परमार्थ साधितो. ४४ असें हें विलक्षण वर्णन ऐकून तुला मोठें आश्चर्य वाटेल, म्हणून माझ्या मनानें जे श्रेष्ठ गुरु मानिले आहेत त्यांपैकीं मुख्य मुख्य सांगतों. ३४५.

(या श्लोकांचा अन्वय सरळ आहे) पृथ्वी, वायु, आकाश, जल, अग्नि, चंद्र, सूर्य, कपोत, अजगर, समुद्र, पतंग, भ्रमर, हत्ती, भृंग, हरिण, मासा, पिंगला, टिटवी, बालक, कुमारी, व्याध, सर्प, कोळी व कुंभारीण माशी.

एकंदर सर्व गुरू सांगतों. त्यांची संख्या चोवीस आहे. त्यांचीं नांवें मी सांगतों, तीं सावधान चित्तानें ऐक. ४६ पृथ्वी, वायु, आकाश, अग्नि, जल, चंद्र, सूर्य, कपोत, ४७ अजगर, समुद्र, पतंग, मधमाशी, हत्ती, भृंगा, हरिण, मासा, पिंगला नांवाची सुंदर वेश्या, ४८ टिटवी, बालक, कुमारी, बाण करणारा लोहार, सर्प, कोळी व कुंभारीण माशी असे चोवीस गुरू मीं केले. ४९ पंचविसावें जें ब्रह्मतत्व तें जाणण्यासाठीं या चोवीस गुरूंची उपासना करावी. विवेक व युक्ति यांच्यायोगें गुरूंचें भजन करावें. ३५० आत्मबोध मिळविण्यासाठीं रात्रंदिवस विवेक करून अनेकांना गुरुत्व देऊन स्वहितासाठीं मीं त्यांस गुरू केलें. ५१ कोणत्या युक्तीनें, कोणत्या विचारानें, कोणत्या लक्षणानें कोणाला गुरु केलें तोहि माझा निश्चय तूं सविस्तर ऐक. ३५२.

एते मे गुरवो राजन्चतुर्विंशतिराश्रिताः । शिक्षावृत्तिभिरेतेषामन्वशिक्षमिहात्मनः ॥ ३५ ॥

ऐकें राजवर्य नृपती । विवेकधवलचक्रवर्ती । गुरुसंख्या तुजप्रती । यथानिगुतीं सांगितली ॥ ५३ ॥ यांचिया शिक्षिता वृत्ती । शिकलों आपुलिया युक्तीं । मग पावलों आत्मस्थिती । विकल्पभ्रांती सांडूनि ॥ ५४ ॥

यतो यदनुशिक्षामि यथा वा नाहुषात्मज । तं तथा पुरुषव्याघ्र निबोध कथयामि ते ॥ ३६ ॥

नहुषाचा पुत्र ययाती । ययातीचा यदु निश्चितीं । नाहुषनंदन यदूसी म्हणती । मूळ व्युत्पत्ती तेणें योगें ॥ ५५ ॥ यालागीं म्हणे नाहुषनंदना । पुरुषांमाजी पंचानना । सांगेन गुरूंच्या लक्षणा । विचक्षणा परियेसीं ॥ ५६ ॥ ज्या गुरूचें जें शिक्षित । मी शिकलों सुनिश्चित । तें तें सांगेन समस्त । सावध चित्त करीं राया ॥ ५७ ॥ ऐकावया गुरुलक्षण । यदूनें सर्वांग केलें श्रवण । अर्थीं बुडवूनियां मन । सावधान परिसतु ॥ ५८ ॥ शब्द सांडोनियां मागें । शब्दार्थामाजीं रिगे । जें जें परिसतु तें तें होय अंगें । विकल्पत्यागें विनीतु ॥ ५९ ॥

भूतैराक्रम्यमाणोपि धीरो दैववशानुगैः । तद्विद्वान्न चलेन्मार्गादन्वशिक्षं क्षितेर्व्रतम् ॥ ३७ ॥

परमार्थीं मुख्य शांती । साधकांसी पाहिजे निश्चितीं । यालागीं प्रथम गुरु क्षिती । निजशांती- लागूनी ॥ ३६० ॥ पृथ्वी गुरु त्रिविध पाहीं । पर्वत वृक्ष आणि मही । यांचीं लक्षणें धरितां देहीं । गुरुत्व पाहीं पृथ्वीसी ॥ ६१ ॥ आंतरनिग्रहो तें शांती । बाह्येंद्रियनिग्रहो ते दांती । उभयसहिष्णुता ते क्षांती । क्षांतीसी क्षिती गुरु केली ॥ ६२ ॥ पृथ्वी ते नानाभूतीं । माझी माझी म्हणौनि झोंबती ।

राजन्–हे राजा, **मे एते चतुर्विंशतिः गुरवः आश्रिताः**–मीं या चोवीस गुरूंचा आश्रय केला. **एतेषां वृत्तिभिः इह आत्मनः शिक्षाः अन्वशिक्षम्**–यांच्या चरित्रांनीं मी येथें आपल्याला शिकण्यास योग्य असे त्याज्य व ग्राह्य अर्थ शिकलों. ३५.

हे निर्मल विवेकचक्रवर्ति राजराजेश्वरा ! ऐक, मीं तुला गुरूंची बरोबर संख्या सांगितली. ५३ त्यांच्यापासून घेण्यासारखे गुण मी आपल्या बुद्धीनेंच शिकलों व नंतर विकल्पाची भ्रांति सोडून आत्मस्थितीला पोंचलों. ३५४.

नाहुषात्मज–हे ययातीच्या पुत्रा यदो ! **यतः यथा वा यत् अनुशिक्षामि**–ज्याच्यापासून व जसें जें मी शिकलों, **तत् तथा**–तें तसेंच, **पुरुषव्याघ्र**–हे पुरुषश्रेष्ठा ! **ते कथयामि निबोध**–मी तुला सांगतों, तें ऐक. ३६.

नहुषराजाचा पुत्र ययाति, ययातीचा पुत्र यदु, या पूर्व वंशपरंपरेनें यदूला नहुषनंदन म्हणतात. ५५ अवधूत म्हणाला कीं, हे नहुषनंदना, चतुर पुरुषसिंहा ! गुरूंचीं लक्षणें सांगतों, तीं ऐक. ५६ ज्या गुरूचा जो घेण्यासारखा गुण होता तोच मी निश्चयानें शिकलों. ते गुण कोणते हें सविस्तर सांगतों, तें सावधान चित्तानें ऐक. ५७ तें गुरूंचें लक्षण ऐकण्यासाठीं यदूनें आपलें अंगच श्रवणेंद्रिय बनविलें आणि तो अर्थाकडे चित्त ठेवून लक्षपूर्वक ऐकूं लागला. तो शब्द टाकून देऊन त्यांच्या अर्थाकडेच लक्ष लावीत होता. सर्व विकल्प सोडून नम्र झालेला तो यदु जें जें ऐकत होता तें तें तो स्वतःच झाला. ३५९.

—मी पृथ्वीपासून क्षमा शिकलों असें अवधूत सांगतो—

दैववशानुगैः भूतैः आक्रम्यमाणः अपि धीरः तद्विद्वान् मार्गात् न चलेत् इति व्रतं क्षितेः अन्वशिक्षम्– दैवाधीन असलेल्या प्राण्यांकडून पीडा केल्या जाणाऱ्याहि धीर पुरुषानें सर्व भूतें दैवाधीन आहेत असें जाणून आपल्या सन्मार्गापासून ढळूं नये, हें व्रत मी पृथ्वीपासून शिकलों. ३७.

परमार्थांत शांति मुख्य आहे. साधकाच्या अंगीं ती अवश्य असली पाहिजे. यासाठीं मीं प्रथम शांतीकरितां पृथ्वीला गुरु केलें. ३६० पृथ्वी तीन प्रकारें गुरू आहे. पर्वत, वृक्ष व भूमि या तिहींचे गुण आपल्या ठिकाणीं धारण केले असतां पृथ्वीला गुरुपणा प्राप्त होतो. ६१ अंतरिंद्रियनिग्रह म्हणजे शांति, बाह्यइंद्रियनिग्रह तोच दम आणि द्वंद्वसहिष्णुता म्ह० या दोहोंनाहि सहन करणें ती क्षमा होय. ही शांति संपादण्यासाठीं मीं क्षितीला गुरु

नाना भेदीं भिन्न करिती । निजवृत्तिव्यवहारें ॥ ६३ ॥ त्या भूतांचें भिन्न वर्तन । पृथ्वी संपादी आपण । मोडों नेदी अभिन्नपण । अखंड जाण सर्वदा ॥ ६४ ॥ तैसें योगियांचें लक्षण । करितां कर्म भिन्नभिन्न । वृत्ति अखंडदंडायमान । सर्वदा जाण असावी ॥ ६५ ॥ देहासी अदृष्टयोगें गती । भूतें अदृष्टयोगें आक्रमिती । भूतीं निजात्मता भाविती । द्वंद्वें न बाधिती साधकां ॥ ६६ ॥ येथ भूतीं पृथ्वी पूजिली । नातरी विष्ठामूत्रीं गांजिली । हर्षविषादां नाहीं आली । निश्चळ ठेली निजक्षांती ॥ ६७ ॥ भूतें पार्थिवेंचि तंव झालीं । तिहीं पृथ्वी पूजिली ना गांजिली । ऐक्यें द्वंद्व-भावा मुकलीं । निश्चळ झालीं निजरूपें ॥ ६८ ॥ तैसाचि योगियाही जाणा । भूतवैषम्यें डंडळेना । सर्वभूतीं निजात्मभावना । विषमीं समाना भावितां ॥ ६९ ॥ आतां पृथ्वीची अभिनव शांती । ते सांगेन राया तुजप्रती । जे शांति धरोनि संतीं । भगवद्भक्ति पावले ॥ ३७० ॥ पृथ्वी दाहें करूनि जाळिली । नांगर घालूनि फाळिली । लातवरीं तुडविली । तोडिली झाडिली पैं भूतीं ॥ ७१ ॥ तो अपराधु न मनूनि क्षिती । सबेंचि भूतांतें प्रसन्न होती । तेथेंचि पिकवूनि नाना संपत्ती । तृप्ति देती भूतांतें ॥ ७२ ॥ ऐसऐशिया निजशांती–। लागीं गुरु म्यां केली क्षिती । एक सभाग्या भूपती । शांतीची स्थिति अभिनव ॥ ७३ ॥ एकें अपराधु केला । दुजेनि उगाचि साहिला । इतुकेनि शांतु केवीं झाला । उपेक्षिला अपराधी ॥ ७४ ॥ ऊंसु मोडी त्या गोड भारी । छेदितें शस्त्र गोड करी । पिळिलियाआळिलियावरी । स्वादाचिया थोरी अपकाऱ्यां देतू ॥ ७५ ॥ अपराध साहोनि अंगीं । त्याच्या प्रवर्ते हितालागीं । तेचि शांति पैं जगीं । होय दाटुगी निर्द्वंद्व ॥ ७६ ॥ अपराध साहोनि अंगावरी । अपराध्या होईजे उपकारी । हें शिकलों पृथ्वियेवरी । परोपकारी पर्वत ॥ ७७ ॥

केलें. ६२ अनेक प्राणी पृथ्वीला 'माझी माझी' म्हणून झोंबत असतात व आपली वृत्ति व व्यवहार, यांसाठीं तिचे तुकडे करितात. ६३ परंतु त्या भूतांचे भिन्न भिन्न व्यवहार पृथ्वी चालवीत असते व आपलें एकात्मत्व न सोडितां ती सर्वदा अखंडच रहाते. ६४ त्याप्रमाणें योग्याचें लक्षण असतें. त्यानें कर्में जरी भिन्न भिन्न केलीं तरी त्याची वृत्ति सर्वदा एकरूपच असावी. ६५ देहाची गति प्रारब्धानुसार असते व जीवहि अदृष्टाप्रमाणेंच वर्तत असतात. हें जाणून प्रत्येक भूतांत आपलाच आत्मा भरलेला आहे असें जो साधक जाणतो त्याला द्वंद्व बाधत नाहीं. ६६ प्राण्यांनीं पृथ्वीची पूजा केली किंवा तिजवर घाण करून तिला त्रास दिला तरी त्याचा हर्षविषाद न मानितां ती आपली क्षमा ढळूं देत नाहीं. ६७ सर्व भूतें पृथ्वीपासूनच उत्पन्न झालीं आहेत. त्यांनीं तिची पूजा केली किंवा तिला गांजिलें तरी ऐक्यानें, द्वंद्वभावाला मुकलेली ती आत्मरूपानें निश्चल रहाते. ६८ त्याचप्रमाणें योगीहि प्राण्यांच्या विविधत्वाला घाबरत नाहीं. सर्व भूतांमध्यें त्याची आत्मभावना असल्यामुळें विषमहि तो समानच मानितो. ६९ हे राजा ! आतां तुला पृथ्वीची आणखी एक अद्भुत शांति सांगतों, ऐक. त्याच शांतीचें ग्रहण करून साधु-संत भगवद्भक्तीला प्राप्त झाले. ३७० पृथ्वीवर अग्नि पेटवून तिला जाळिली, नांगर फिरवून तिची फाळणी केली, तिला पायानें तुडविली किंवा भूतांनीं तिला तोडिली व झाडिली, ७१ तरी पृथ्वी त्यांचे हे सर्व अपराध मनांत न आणितां उलट सर्व प्राणिमात्रावर प्रसन्न होते व नानाप्रकारचीं पिकें पिकवून सर्व भूतांना तृप्त करिते. ७२ अशाप्रकारच्या आत्मशांतीसाठीं मीं पृथ्वीला गुरु केलें. हे भाग्यवान् भूपते ! अशी शांतीची मोठी अपूर्व महति आहे. ७३ एकानें अपराध केला व त्यानें तो मुकाट्यानें सहन केला, पण इतक्यानें त्याला शांत म्हणवत नाहीं, कारण त्यानें अपराध्याची उपेक्षा केलेली असते, एवढेंच. ७४ ऊंस मोडणाराला तो फार गोड लागतो, त्याला तोडणाऱ्या शस्त्रालाहि तो गोड करितो आणि त्याला पिळलें, कढविलें म्हणजे त्या अपकार करणारांस तर तो जास्तच चव देतो. ७५ दुसऱ्यानें केलेला अपराध स्वतः सहन करून उलट त्याच्याच हितासाठीं प्रवृत्त होणें हीच जगांत खरी निर्द्वंद्व शांति होय. ७६ दुसऱ्याचा अपराध सहन करून उलट त्या अपराध करणारावरच उपकार करणें हें मी पृथ्वीपासून शिकलों व परोपकारास प्रवृत्त झालों. ३७७,

शश्वत्परार्थसर्वेहः परार्थैकान्तसम्भवः । साधुः शिक्षेत भूभृत्तो नगशिष्यः परात्मताम् ॥ ३८ ॥

पृथ्वीपासोनि जाले । ते पर्वतही म्यां गुरु केले । त्यांपासोनि जें जें शिकलें । तेंहि वाहिलें परियेसीं ॥ ७८ ॥ रत्नादि निकर समस्त । पर्वत परार्थचि वाहत । तृण जळ नाना अर्थ । तेही परार्थ धरितसे ॥ ७९ ॥ कोणासी नेमी ना निवारी । उबगोनि न घाली बाहेरी । याचकाचे इच्छेवरी । परोपकारी देतसे ॥ ३८० ॥ ग्रीष्माअंतीं सर्व सरे । परी तो देतां मागें न सरे । सर्वेचि भगवंतें कीजे पुरें । वर्षोनि जळधरें समृद्धी ॥ ८१ ॥ जंव जंव उल्हासें दाता देतु । तंव तंव पुरवी जगन्नाथु । विकल्प न धरितां मनाआंतु । देता अच्युतु अनिवार ॥ ८२ ॥ सत्य अच्युत दाता । हें न मनेचि तत्वतां । यालागीं दरिद्रता । विकल्पवंता लागली ॥ ८३ ॥ एवं पर्वताची जे उत्पत्ती । ते परोपकारार्थ एकांतीं । उपकारावांचूनि चित्तीं । दुजी वृत्ति जाणेना ॥ ८४ ॥ त्या पर्वताऐशी तत्त्वतां । असावी साधुकासी उदारता । काया वाचा आणि चित्ता । सर्वस्व देतां उल्हासु ॥८५॥ चेष्टामात्रें परोपकारता । सर्वदा करावी समस्तां । कोटि लाभा हाणोनि लाता । उपकारीं तत्त्वतां उद्यतु ॥ ८६ ॥ परमार्थाचिया चाडा । स्वार्थ सांडोनि रोकडा । परोपकारार्थ अवघडा । रिघे सांकडा परार्थें ॥ ८७ ॥ उपकारुचि साकारला । कीं परोपकारू रूपा आला । तैसा जन्मौनि उपकारी झाला । उपकारला सर्वांसी ॥ ८८ ॥ ऊंसु जैसा अवधारीं । सर्वांसी गोडपणें उपकारी । तैसाचि योगिया संसारीं । परोपकारी मधुरत्वें ॥ ८९ ॥ जसें पर्वतीं निर्झर ।

——पर्वतरूप व वृक्षरूप पृथ्वीपासून आपण काय शिकलों तें अवधूत सांगतो——

शश्वत् परार्थसर्वेहः–ज्याच्या सर्व चेष्टा सर्वदा परोपकारार्थच आहेत, परार्थैकान्तसम्भवः–ज्याची उत्पत्ति केवळ परार्थच आहे अशा, साधुः–साधूनें, भूभृत्तः–पर्वतापासून, शिक्षेत–हे गुण शिकावे. नगशिष्यः परात्मतां शिक्षेत–व त्यानें वृक्षाचा शिष्य होऊन आपलें जीवन दुसऱ्यासाठीं आहे हें शिकावें. [पर्वताच्या–वृक्ष, तृण, जलप्रवाह इत्यादिकांना उत्पन्न करण्याच्या–क्रिया जशा परार्थ असतात, त्याप्रमाणें आपल्या सर्व क्रिया व आपला जन्म केवळ परोपकारार्थ आहे, असें साधूनें पर्वतापासून शिकावें. त्याचप्रमाणें वृक्षाला दुसऱ्यानें जरी तोडिलें किंवा त्याला उपटून कोणीं नेलें, तरी तो जसा त्याला प्रतिबंध करीत नाहीं. तर खुशाल तोडूं व नेऊं देतो त्याप्रमाणें साधूनें वृक्षाचा शिष्य होऊन आपलें जीवित पराधीन आहे, असें शिकावें.] ३८.

पृथ्वीपासून झालेल्या पर्वतांनाहि मीं गुरू केलें. त्यांच्यापासून जें जें शिकलों तेंहि ऐक. ७८ पर्वत रत्नादिकांचा समूह परोपकारार्थच वहात असतो. त्यावरील गवत, जल किंवा इतर अनेक पदार्थांचा सांठाहि परोपकारार्थासाठींच असतो. ७९ तो कोणाला नियुक्त करीत नाहीं किंवा कोणाचें निवारण करीत नाहीं. किंवा कोणाला उठवून बाहेर घालवीत नाहीं, तर याचकाच्या इच्छेप्रमाणें त्याच्यावर उपकार करीत असतो. ३८० ग्रीष्मऋतूच्या शेवटीं त्यावरील तृण, धान्य वगैरे सर्व संपतें. पण पर्वत देण्यांत कधींच माघार घेत नाहीं, म्हणून परमेश्वर मेघवृष्टीनें त्याला समृद्ध करीत असतो. ८१ दाता जों जों उल्हासानें देऊं लागतो तों तों जगन्नाथ त्याला पुरवठा करीत असतो. मनांत कांहीं विकल्प न धरिल्यास अच्युत अनिवार देणारा आहे. ८२ विकल्पवानांस भगवान् सत्यदाता आहे, हें खरें वाटत नाहीं, म्हणून त्यांना दारिद्र्य भोगावें लागतें. ८३ याप्रमाणें पर्वतांची उत्पत्ति केवळ एका परोपकारासाठींच आहे. परोपकारावांचून दुसरी कसली कल्पनाहि त्याच्या मनांत येत नाहीं. ८४ साधकांत या पर्वतासारखी उदारता असावी. काया, वाचा व मन यांनीं सर्वस्व देत असतांना उल्हास वाटावा. ८५ सर्व व्यवहार करीत असतां सर्वांवर सतत उपकार करीत असावें. कोट्यवधि लाभांवर लाथ मारून परोपकारांतच उद्युक्त व्हावें. ८६ साधक परमार्थाच्या आशेनेंच प्रत्यक्ष स्वार्थ सोडून अवघड परोपकार करावयास तयार होतो व परोपकारांत देह कष्टवितो. ८७ मूर्तिमंत उपकारच जन्मावा, किंवा परोपकारानेंच अवतार घ्यावा, त्याप्रमाणेंच हा जन्मून उपकारी झाला व सर्वांवर उपकार करूं लागला. ८८ ऊंस जसा आपल्या अंगच्या गोडपणानें सर्वांवर उपकार करितो, त्याचप्रमाणें योगी संसारांत राहून आपल्या गोड वर्तनानें परोपकार करितो. ८९

तैसे उपकाराचे पाझर । सुकों नेणती निरंतर । कृतोपकार जग केलें ॥ ३९० ॥ सांडोनि कृपणवृत्तीची संगती । उपकारी पर्वत एकांतीं । राहिलासे उपकारमूर्ती । धैर्यवृत्ति निर्धारें ॥ ९१ ॥ परोपकारालागीं निश्चित । गुरु केला म्यां पर्वत । आतां वृक्षापासोनि जें शिक्षित । तेंही समस्त परियेसीं ॥ ९२ ॥ सर्वांगें सर्वभावेंसी । सर्वकाळ सर्वदेशीं । पराधीन होआवें सर्वांसीं । हें वृक्षापाशीं शिकलों ॥ ९३ ॥ वृक्ष जेणें प्रतिपाळिला । तो त्या आधीन झाला । कां जो छेदावया रिघाला । त्याही झाला स्वाधीनु ॥ ९४ ॥ योगिया पालखीसीं घातला । तेव्हां त्याचिया आधीन झाला । एकीं शूळीं द्यावया चालविला । तेव्हां त्याच्याहि बोला आधिनु ॥ ९५ ॥ सांडूनि देहींची अहंता । योगियासी झाली पराधीनता । विश्वामाझारीं आत्मा सर्वथा । सर्वांच्या वर्तती बोलांत ॥ ९६ ॥ सर्व तें मीचि आहें । यालागीं साधक बाधक न पाहे । त्याच्या बोलामाजीं राहे । वर्तता होये संतोषें ॥९७॥ प्राप्त जें जें सुखदुःख । तें तें अदृष्टाआधीन देख । आत्मा मानुनी सकळ लोक । पराधीन देख वर्तत ॥९८॥ सकळ लोकीं निजात्मता । देखतां झाली पराधीनता । हे वृक्षापासोनि तत्त्वतां । परार्थता शिकलों ॥ ९९ ॥ आणिक एक लक्षण । वृक्षापासोनि शिकलों जाण । अतिथींचें पूजाविधान । तें सावधान परियेसीं ॥४००॥ अतिथी आल्या वृक्षापासीं । वंचनार्थु न करीच त्यासी । पत्रपुष्पफळमूळच्छायेसीं । त्वचाकाष्ठांसीं देतसे ॥ १ ॥ जो वृक्षासी प्रतिपाळी । कां जो घावो घालूनि मूळीं । दोहींसी सममेळीं । पुष्पीं फळीं संतुष्टी ॥ २ ॥ जैसा वृक्ष समूळ सगळा । आर्थियांलागीं सार्थक जाहला । तैसा चित्तें वित्तें देहें बोला । साधु संतुष्टला अर्थ्यांसीं ॥ ३ ॥ अतिथीसी नव्हे पराङ्मुख । हा साधूसी गुण अलोलिक । अन्न धन उदक । यथासुखें देतसे ॥ ४ ॥ अर्थी आल्या अर्थावयासी । विमुख न व्हावें सर्वस्वेंसी । हें शिकलों वृक्षापासीं । विवेकेंसीं निजबुद्धी ॥ ५ ॥

पर्वतांतून जसे नैसर्गिक झरे वहात असतात, तसे योग्याला उपकाराचे पाझर फुटतात व ते सतत वहात असतात, कधींच आटत नाहींत. तो सर्व जगत् उपकारानें बद्ध करून सोडितो. ३९० कृपण वृत्तीची संगती सोडून पर्वत एकांतांत उपकार करीत रहातो. तसाच हा धैर्यवृत्ति साक्षात् उपकार होऊन निश्चयानें राहिलेला असतो. ९१ खरोखर परोपकार शिकण्यासाठींच मीं पर्वताला गुरु केलें. आतां मी वृक्षापासून काय शिकलों, तें सविस्तर ऐक. ९२ सर्वस्वीं, सर्व प्रकारें, सर्वदा व सर्वत्र सर्वांच्या पराधीन होऊन रहावें, हें मी वृक्षापासून शिकलें. ९३ वृक्षाला ज्यानें वाढविलें त्याच्याच तो स्वाधीन असतो, असें नाहीं. तर त्याला तोडणाराच्याहि तो अधीनच असतो. ९४ त्याचप्रमाणें योग्याला कोणीं पालखींत बसविलें तरी तो बसतो व कोणीं सुळावर चढविण्यास नेलें तरीहि तो तयार होतो. ९५ देहावरील अहंता सोडल्यामुळेंच योग्याला पराधीनता आलेली असते. त्याचा आत्मा विश्वांत भरलेला असतो, त्यामुळें तो सर्वांच्या म्हणण्याप्रमाणें वागतो. ९६ 'हें सर्व मीच आहें' असें म्हणून तो साधक बाधकाकडे मुळींच लक्ष देत नाहीं. संतोषानें सर्वांच्या आज्ञेंत रहातो. ९७ सुख-दुःख प्रारब्धाच्या अधीन आहे, असें जाणून सर्व लोकांना आपला आत्मा समजून तो पराधीन होऊन वागतो. ९८ सर्व लोकांमध्यें आपलाच आत्मा आहे, अशी दृष्टि ठेवितांच पराधीनत्व प्राप्त होतें. ही परात्मता मी खरोखर वृक्षापासून शिकलों. ९९ अतिथिपूजन हें आणखी एक लक्षण मी वृक्षांपासून शिकलों, तें लक्ष देऊन ऐक. ४०० वृक्षापाशीं कोणी अतिथि आला तर त्याला तो कधींच विमुख करीत नाहीं. पान, फूल, फळ, छाया, साल, लांकूड यांतील कांहीं तरी देत असतो. १ वृक्षाची जोपासना करणारा व त्याच्या मुळावर घाव घालणारा या दोघांनाहि तो सारखींच फळें व पुष्पें देऊन संतुष्ट करितो. २ ज्याप्रमाणें वृक्ष मुळासह आपला सर्व देह याचकांना वाहून सार्थकीं लावितो, त्याप्रमाणें साधूहि आपली तनु, मन, धन व शब्द हीं सर्वच अतिथीला देऊन संतुष्ट होतो. ३ अतिथीला पराङ्मुख करावयाचा नाहीं, हा साधूमध्यें अलौकिक गुण असतो. तो त्याला अन्न, जल व धन आनंदानें देत असतो. ४ याचक मागावयास आला असतां त्याची कामना पूर्ण करण्यांत सर्वस्व जरी गेलें तरी त्याला विमुख करावयाचें नाहीं, हें मी विवेकानें आत्मबुद्धीनें वृक्षापासून शिकलों. ५ याप्रमाणें पृथ्वी

एवं पृथ्वी गुरु जाली ऐसी । दुजें गुरुत्व तें वायूसी । आलें जें जें युक्तीसी । तें तें परियेसी नरदेवा ॥ ६ ॥ गुरुत्व जें वायूसी । तें दों प्रकारीं परियेसी । एक तें प्राणवृत्तीसी । बाह्यवायूसी दुसरें ॥ ७ ॥

प्राणवृत्त्यैव सन्तुष्येन्मुनिर्नैवेन्द्रियप्रियैः । ज्ञानं यथा न नश्येत नावकीर्येत वाङ्मनः ॥ ३९ ॥

प्राणाचियेपरी । जो विषयीं आसक्ती न धरी । विषय सेविलियाही वरी । नव्हे अहंकारी प्राणु जैसा ॥ ८ ॥ प्राणाभ्यासें क्षुधा अद्भुत । तेव्हां प्राणासीच क्षोभ येत । तेणें काया वाचा चित्त । विकळ पडत इंद्रियें ॥ ९ ॥ तया प्राणासी आधारु । भलतैसा मिळो आहारू । परी धडगोडांचा विचारू । न करी साचारू पैं प्राणु ॥ ४१० ॥ तैसाचि योगिया पाहीं । तो अभिमान न धरी देहीं । विषयो सेवी परी कांहीं । आसक्ति नाहीं तयासी ॥ ११ ॥ क्षुधेचिया तोंडा । मिळो कोंडा अथवा मांडा । परी रसनेचा पांगडा । न करी धडकुडा तयासी ॥ १२ ॥ ज्ञानधारणा न ढळे । इंद्रियें नव्हती विकळें । तैसा आहार युक्तिबळें । सेविजे केवळें निजधैर्यें ॥ १३ ॥ प्राणास्तव इंद्रियें सबळें । प्राणयोगें देह चळे । त्या देहकर्मा प्राणु नातळे । अलिप्तमेळें वर्ततू ॥ १४ ॥ त्या प्राणाची ऐसी स्थिती । योगियांची वर्तती वृत्ती । सर्व करूनि न करी आसक्ती । देहस्थिति नातळे ॥ १५ ॥ ब्रह्मादिकांचा देह पाळूं । कां सूकरादिकांचा देह टाळूं । ऐसा न मानीच विटाळू । प्राणु कृपाळू समभावें ॥ १६ ॥ तैसेंच योगियाचें कर्म । न धरी उंच नीच मनोधर्म । कदा न देखे अधमोत्तम । भावना सम समभावें ॥ १७ ॥ आवडीं प्रतिपाळावा रावो ।

माझी पहिली गुरु झाली. दुसरा गुरु वायु झाला. त्याच्यापासून जें ग्रहण केलें तेंहि आतां ऐक. हे राजा ! ६ वायूला दोन प्रकारानें गुरुत्व आलें आहे. एक प्राणवृत्तीनें व दुसरें बाह्यवायूच्या योगानें. तें आतां ऐक. ४०७.

—वायुहि प्राण व बाह्य असा दोन प्रकारचा आहे. त्यांतील प्राणाचें गुरुत्व अवधूत सांगतो—

मुनिः प्राणवृत्त्या एव सन्तुष्येत् इन्द्रियप्रियैः न एव–(प्राण केवळ आहारादिकांनींच आपला निर्वाह करितो. रूपरसादि इंद्रियविषयांची अपेक्षा करीत नाहीं, त्याप्रमाणें) मुनीनें प्राणधारणापुरतें अन्न मिळालें म्हणजे तेवढ्यानेंच तृप्त व्हावें. शब्दादि इंद्रियविषयांनीं कधींहि संतुष्ट होऊं नये. (प्राणधारणापुरता आहार न केल्यास मन विकल होऊन ज्ञानाचा नाश होईल. म्हणून देहरक्षण करावें. पण विषयांची इच्छा केल्यास वाक् व मन हीं दोन्हीं विक्षिप्त होतील. यास्तव आहाराहून दुसऱ्या कशाचीहि इच्छा करूं नये, असें उत्तरार्धानें अवधूत सांगतो–) **ज्ञानं यथा न नश्येत**–ज्या प्रकारें ज्ञानाचा नाश होणार नाहीं, **मनः वाक् यथा नावकीर्येत**–आणि वाक् व मन ज्याप्रकारें विक्षिप्त होणार नाहीं, तशा प्रकारें केवळ आहाराची इच्छा करावी. ३९.

प्राणाप्रमाणें तो विषयामध्यें आसक्ति ठेवीत नाहीं व विषयांचें सेवन केल्यावरहि प्राणाप्रमाणेंच तो अहंकार धरीत नाहीं. ८ प्राणायामाच्या अभ्यासानें जीवाला फार भूक लागते तेव्हां सुद्धां प्राणच व्याकुळ होतो. क्षुधेनें शरीर, वाणी, मन, इंद्रियें हीं सर्व व्याकुळ होतात, ९ त्यावेळीं प्राणरक्षणासाठीं आधारभूत असलेला आहार कसाहि कां मिळेना, तो चांगला आहे कीं वाईट आहे याचा विचार प्राण कधींहि करीत नाहीं. ४१० त्याचप्रमाणें योगी देहावर अभिमान ठेवीत नाहीं. तो आसक्ति न ठेवतां विषयसेवन करितो. ११ भुकेच्या तोंडाला कोंडा असो किंवा मांडा असो, जिव्हेचा पगडा त्याच्यावर कधींच बसत नाहीं. १२ ज्ञानधारणा ढळूं नये, इंद्रियें विकल होऊं नयेत, यासाठीं तो बेतानें व धैर्यानें आहार करीत असतो. १३ प्राणामुळें इंद्रियांना बळ येतें, प्राणाच्यायोगें देह चालतो. पण देहकर्मानें प्राण लिप्त होत नाहीं. तो अलिप्तच असतो. १४ त्या प्राणासारखीच योग्याची स्थिति असते. सर्व करूनहि तो अनासक्त असतो; त्यामुळें देहस्थिति त्याला स्पर्शीहि करीत नाहीं. १५ ब्रह्मादिकांच्या देहांत राहून त्यांचें पालन करावें व डुकरादिकांच्या देहांत मुळीं प्रवेशहि करूं नये, असा विचार त्याच्या मनाला स्पर्शीहि करीत नाहीं. कारण प्राण समभावानें कृपाळु असतो, १६ त्याचप्रमाणें योग्याचें कर्म उच्च-नीचभाव धरीत नाहीं. त्याची भावना सर्वत्र सम असल्यामुळें तो उत्तम व अधम अशी दृष्टि केव्हांहि ठेवीत नाहीं. १७ राजाचा देह

रंकाचा टाळावा देहो। ऐसा प्राणासी नाहीं भावो। शुद्ध समभावो सर्वत्र ॥ १८ ॥ प्राण अपान समान उदान। सर्व संधी वसे व्यान। इतुकीं नामें स्थानें पावोनि जाण। न सांडी प्राण एकपणा ॥ १९ ॥ तैसे उंच नीच वर्णावर्ण। अधमोत्तमादि गुणागुण। देखोनियां योगी आपण। भावना परिपूर्ण न सांडी ॥ ४२० ॥ प्राणु असोनि देहाभीतरीं। बाह्य वायूसी भेद न धरी। तैशी योगिया भावना करी। बाह्याभ्यंतरी ऐक्यता ॥ २१ ॥

विषयेष्वाविशन्योगी नानाधर्मेषु सर्वतः। गुणदोषव्यपेतात्मा न विषज्जेत वायुवत् ॥ ४० ॥

पार्थिवेष्विह देहेषु प्रविष्टस्तद्गुणाश्रयः। गुणैर्न युज्यते योगी गन्धैर्वायुरिवात्मदृक् ॥ ४१ ॥

ऐक्यता साधावी चतुरीं। ते वायूच्या ऐसी दोहींपरी। बाह्य आणि अंतरीं। ऐक्यकरीं वर्तावें ॥ २२ ॥ प्राणवृत्तीचीं लक्षणें। तुज सांगितलीं संपूर्णें। आतां बाह्य वायूचीं चिन्हें। सावधानें परियेसीं ॥ २३ ॥ वायु सर्वांतें स्पर्शोनि जाये। परी अडकला कोठें न राहे। तैसें विषय सेवितां पाहें। आसक्तु नव्हे योगिया ॥ २४ ॥ असोनि इंद्रियांचेनि मेळें। तो विषयांमाजीं जरी खेळे। तरी गुणदोषआसक्तिमेळें। बोधू न मळे तयाचा ॥ २५ ॥ वस्त्र चंदन वनिता माळा। सदा भोगितां विषयसोहळा। वायु नातळे जेवीं जाळा। तेवीं योगी वेगळा विषयांसी ॥ २६ ॥ जैसें वारेंनि जाळ

प्रेमानें जिवंत ठेवावा व भिकाऱ्याचा देह सोडून जावा असा प्राणाचा क्षुद्र भाव कधींच नसतो. त्याचा सर्वत्र शुद्ध समभावच असतो. १८ प्राण, अपान, समान, उदान किंवा सर्व सांध्यांतून राहणारा व्यान इतकीं नांवें व स्थानें असूनहि प्राण आपलें एकत्व सोडीत नाहीं. १९ त्याचप्रमाणें उच्च-नीच, वर्ण-अवर्ण, उत्तम-अधम, गुण व अवगुण पाहून योगी आपला समत्वभाव कधींच सोडीत नाहीं. ४२० प्राण वास्तविक देहाच्या आंत असूनहि बाह्य वायूशीं भेदभाव धरीत नाहीं, त्याप्रमाणें योग्याची वृत्ति अंतर्बाह्य एकसारखीच असते. ४२१.

—विषयसेवन करणाऱ्याहि योग्यानें बाह्यवायूपासून विषयांविषयींची अनासक्ति शिकावी असें अवधूत सांगतो—

नानाधर्मेषु विषयेषु आविशन् योगी—शीत, उष्ण इत्यादि अनेक धर्मांनीं युक्त असलेल्या विषयांमध्यें प्रवेश करणाऱ्या म्ह० त्याचा उपभोग घेणाऱ्या योग्यानें, सर्वतः गुणदोषव्यपेतात्मा—त्या सर्व विषयांतील गुणदृष्टि व दोषदृष्टि या दोन्ही दृष्टि ज्यानें टाकिल्या आहेत असा होऊन, वायुवत् न विषज्जेत—वायूप्रमाणें त्यांत आसक्त होऊं नये. [वायु वनामध्येंहि आसक्त होत नाहीं व त्याला जाळणाऱ्या अग्नीमध्येंहि आसक्त होत नाहीं, हें प्रसिद्ध आहे.] ४०.

—पुष्पादि सुगंधी पदार्थांशीं संसर्ग पावलेला वायु गंधादिधर्मांनीं युक्त असल्यासारखा जरी भासतो तरी तो त्या गंधादिकांनीं युक्त होत नाहीं, त्याप्रमाणें योगी देहादि धर्मयोगानें म्ह० 'धर्मच मी' अशा प्रत्ययानें जरी प्रतीत होत असला तरी आत्मा देहधर्मवान् नाहीं, हें मी वायूपासून शिकलों असें अवधूत सांगतो—

पार्थिवेषु इह देहेषु प्रविष्टः तद्गुणाश्रयः आत्मदृक् योगी गंधैः वायुः इव गुणैः न युज्यते—पार्थिव देहांमध्यें प्रविष्ट झालेला व त्यांच्या गुणांचा आश्रय असा आत्मज्ञानी योगी, वायु जसा गंधांनीं युक्त होत नाहीं त्याप्रमाणें देहगुणांनीं युक्त होत नाहीं. ४१.

शहाण्या माणसानें वायूप्रमाणें दोन्हीप्रकारें ऐक्य साधावें. अंतर्बाह्य नेहमींसारखेंच एकरूप वागावें. २२ प्राणवायूचीं सर्व लक्षणें मीं सविस्तर सांगितलीं, आतां बाह्य वायूचीं चिन्हें सावधान चित्तानें ऐक. २३ वायु सर्वांना स्पर्श करून जातो, पण कोठेंच अडकून रहात नाहीं. २४ योगीहि इंद्रियांच्या संगतींत राहून जरी विषयांबरोबर खेळत असतो तरी गुणदोषांच्या आसक्तीनें त्याचें आत्मज्ञान कधींच मलीन होत नाहीं. २५ वस्त्र, चंदन, स्त्री किंवा फुलांची माला यांच्या सहवासांत वायु जरी नेहमीं विलास भोगितो तरी तो त्यांच्या जालांत अडकून पडत नाहीं. त्याप्रमाणें योगी विषयांत आसक्त होत नाहीं. २६ वायूनें जाळें उडून जातें, पण तो

उडे । परी जाळीं वारा नातुडे । तेवीं भोग भोगितां गाढे । भोगीं नातुडे योगिया ॥ २७ ॥ जातया वायूचे भेटी । सुगंध कोटी घालिती मिठी । त्याची आसक्ती नाहीं पोटीं । उठाउठीं सांडितु ॥ २८ ॥ तैसा आत्मत्वें योगिया पाहीं । प्रवेशलासे सर्वां देहीं । देह गुणाश्रयो पाहीं । ठायींच्या ठायीं तोचि तो ॥२९॥ निजात्मदृष्टीचेनि बळें । तो देहगुणांसी नातळे । जैसा गंधावरी वारा लोळे । परी नाकळे गंधासी ॥ ४३० ॥ तेचि परिपूर्ण आत्मस्थिती । राया मी सांगेन तुजप्रती । जैसी आकाशाची प्रतीती । सर्व पदार्थीं अलिप्त ॥ ३१ ॥

अन्तर्हितश्च स्थिरजङ्गमेषु ब्रह्मात्मभावेन समन्वयेन ।
व्याप्त्याऽव्यवच्छेदमसङ्गमात्मनो मुनिर्नभस्त्वं विततस्य भावयेत् ॥ ४२ ॥

सर्व पदार्थीं समत्व । यालागीं आकाशासी गुरुत्व । असंगत्व अभेदत्व । निर्मळत्व जाणोनी ॥ ३२ ॥ विषमीं असोनि समत्व । संगीं असोनि असंगत्व । भेदु करितां अभेदत्व । यालागीं गुरुत्व आकाशा ॥ ३३ ॥ वैर सर्पामुंगुसासी । आकाश दोहींचें हृदयवासी । वैर निर्वैरता आकाशासी । ते स्थिती योगियासी पाहिजे ॥ ३४ ॥ तेणें आकाशदृष्टांतें । ब्रह्मभावें आपणियातें । योगीं देखिजे पुरतें । व्यापकत्वें आपुल्या ॥ ३५ ॥ ब्रह्मसमन्वयें पाहतां पाहीं । स्थावरजंगमांच्या ठायीं । तिळभरी वाढी

जसा त्या जाळ्यांत सांपडत नाहीं, तसा योगी भोग भोगीत असला तरी त्यांत आसक्त होत नाहीं. २७ वायूला भेटण्यासाठीं कोट्यवधि सुवास येऊन त्याला चिकटतात, परंतु तो त्यांत आसक्त न होतां, त्या सर्व सुवासांना तत्काल सोडून निघून जातो, २८ त्याप्रमाणें योगी आत्मरूपानें सर्वांच्या शरीरांत प्रवेश करितो व त्या त्या शरीरांतील गुणांचा आश्रय तेथल्यातेथेंच करितो, २९ परंतु वायु जसा सुगंधावर लोळत असूनहि त्यानें लिप्त होत नाहीं, तसा योगी त्या शरीरांतील गुणांनीं लिप्त होत नाहीं. ४३० आतां आकाश जसें सर्व पदार्थांपासून अलिप्त असल्याचा प्रत्यय येतो, तशीच योग्याची परिपूर्ण असलेली आत्मस्थिति मी तुला सांगतों. ४३१.

——अवधूत आकाशापासून शिकलेले दोन धर्म पुढील दोन श्लोकांनीं सांगतो——

अन्तर्हितः च मुनिः आत्मनः असंगं अव्यवच्छेदं च भावयेत्—देहामध्यें असलेल्याहि मुनीनें आत्म्याचा देहादिकांशीं कांहीं संबंध नाहीं व त्यामुळेंच त्याचा कोणत्याही देहामध्यें परिच्छेद झालेला नाहीं अशी भावना करावी. (कोणत्या कारणानें ?) स्थिरजंगमेषु समन्वयेन व्याप्त्या—स्थिरजंगमांतील अनुवृत्तीनें त्याची जी व्याप्ती त्या व्याप्तीनें आत्म्याचा देहादिकांशीं कांहीं संबंध नाहीं व देहादिकांच्या योगानें त्याचा परिच्छेदहि झालेला नाहीं असें चिंतन करावें. (तर मग माळेंतील मण्यामध्यें जशी सूत्राची व्याप्ती असते, तशी त्याची स्थावरजंगमामध्यें व्याप्ती असते कीं काय ? नाहीं. तशी नाहीं. तर मग कशी ?–) विततस्य—सर्वगत-सर्ववस्तूंना सर्वत: व्यापणाऱ्या आत्म्याचा देहादिकांशीं संबंध नाहीं व त्यानें त्याचा विच्छेदहि झालेला नाहीं असें चिंतन करावें. (पण त्याच्या सर्वगतत्वाची सिद्धि कशी होते ?–) ब्रह्मात्मभावेन—' तत्त्वमसि ' इत्यादि श्रुतीच्या अनुसार ब्रह्मस्वरूपाच्या भावनेनें आत्म्याच्या सर्वगतत्वाची सिद्धि होते. (पण हें सर्व कसें संभवतें ?–) नभस्त्वं—आत्म्याला आकाशतुल्यत्व आहे अशी भावना केल्यानें हें सर्व संभवतें. [ज्याप्रमाणें सर्वगत आकाश घटादिकांशीं संबद्ध होत नाहीं किंवा त्याचा घटादिकांनीं परिच्छेदहि होत नाहीं त्याप्रमाणें आत्म्याचा असंग व अपरिच्छेद संभवतो.] ४२.

आकाश सर्व वस्तूंशीं समभाव ठेवणारें आहे. तें असंग, अभेद्य व निर्मल आहे, हें जाणून मीं त्यास गुरु केलें. ३२ तें विषमांत असून सम, संगांत असून असंग व भेद केला तरी अभेद्य असतें म्हणून त्याला गुरुत्व दिलें. ३३ साप व मुंगूस या दोघांचें वैर आहे. पण आकाश त्या दोघांच्याहि हृदयांत रहातें. आकाश वैराला निर्वैरच समजतें, योग्याची स्थितिहि अशीच असली पाहिजे. ३४ त्या आकाशाच्या दृष्टान्तानेंच योग्यानें आपल्याला ब्रह्मभावानें पूर्णव्यापक पहावें. ३५ ब्रह्मैक्यरूप होऊन पाहूं लागलें कीं, स्थावर व जंगम या सर्वांत आपणच भरून राहिलों

रिती नाहीं । आपण पैं पाही कोंदला ।। ३६ ।। आकाश सर्व पदार्थीं असे । परी असे हें सर्वांसी न दिसे । तेवीं दृश्य द्रष्टा अतीतदर्शें । सर्वत्र असे योगिया ।। ३७ ।। नभ न खोंचे सांबळें । जळेना वणव्याचेनि जाळें । नव्हतां ज्वाळांवेगळें । असे सगळें टवटवित ।। ३८ ।। तैसी योगियासी द्वंद्वें सकळें । बाधूं न शकती कवणे काळें । नव्हतां द्वंद्वावेगळें । स्वरूप सगळें शोभत ।। ३९ ।। योगिया छेदावया लवलाहें । सोडिले शस्त्रांचे समुदाये । तो शस्त्रांमाजीं आपणियातें पाहे । न रुपती घाये जेवीं गगना ।।४४०।। जें जें द्वंद्व बाधूं आलें । तें तें स्वरूप देखे आपुलें । सहजें द्वंद्वभावा मुकलें । अबाधित उरलें निजरूप ।। ४१ ।। गगन बुडालें दिसे डोहीं । परी तें उदकें भिजलेंचि नाहीं । तैसा असोनियां सर्व देहीं । अलिप्त पाहीं योगिया ।। ४२ ।। आकाशा चिखल माखूं जातां । ते न माखे माखे लाविता । तैसा योगिया दोषी म्हणतां । दोषू सर्वथा म्हणत्यासी ।। ४३ ।। गगन असोनियां जनीं । मैळेना जनघसणीं । तैसा योगिया सकळ कर्में करूनी । कर्मठपणीं न मैळे ।। ४४ ।। मोटे बांधितां आकाशातें । चारी पालव पडती रिते । तेवीं कर्मीं बांधितां योगियातें । कर्म तेथें निष्कर्म ।। ४५ ।। घटामाजीं आकाश असे । ते वाच्य कीजे घटाकाशें । पाहतां घटा सबाह्य समरसें । आकाश असे परिपूर्ण ।। ४६ ।। तैसा आत्मा म्हणती देहीं । तंव तो देहा सबाह्य पाहीं । देह मिथ्यात्वें ठायींचे ठायीं । चिन्मात्र पाहीं परिपूर्ण ।। ४७ ।।

तेजोऽबन्नमयैर्भावैर्मेघाद्यैर्वायुनेरितैः । न स्पृश्यते नभस्तद्वत्कालसृष्टैर्गुणैः पुमान् ।। ४३ ।।

आहेत, आपल्याशिवाय उणीपुरी तिळभरहि जागा नाहीं असें तो जाणतो. ३६ आकाश सर्व पदार्थांत असतेंच, पण सर्वांना कांहीं तें दिसत नाहीं. त्याप्रमाणें योगी दृश्य व द्रष्टा यांहून भिन्नत्वानें सर्वत्र असतो. ३७ पहारीनें आकाशाला भोंक पडत नाहीं किंवा वणव्यानें तें जळत नाहीं. तें ज्वाळांपासून वेगळें नसूनहि टवटवीत रहातें. ३८ त्याप्रमाणें योग्यालाहि शीतोष्णादि द्वंद्वें कधींहि बाधूं शकत नाहींत. द्वंद्वांतीत नसूनहि त्याचें स्वरूप शोभत असतें. ३९ योग्याला तोडण्यासाठीं त्याच्या अंगावर शस्त्रांचे भारे जरी टाकिले तरी तो त्या शस्त्रांत स्वतःलाच पहात असतो, त्यामुळें आकाशावर जसा घाव बसत नाहीं तसा त्यालाहि शस्त्रांचा घाव लागत नाहीं. ४४० जें जें द्वंद्व त्याला बाधावयास येतें, तें तें आपलेंच स्वरूप आहे असें त्याला वाटतें. त्यामुळें तें द्वंद्व सहजच द्वंद्वभावाला मुकतें व आत्मस्वरूपानें उरतें. ४१ आकाश डोहांत बुडालेलें दिसतें, परंतु तें पाण्यानें भिजत नाहीं. तसाच योगी सर्व देहांत राहून अलिप्त असतो. ४२ आकाशाला जर चिखल माखावयाला गेलें तर तो आकाशाला न माखतां, लावणारास माखून टाकितो; त्याप्रमाणें योग्याला दोष लावणारा स्वतःच दोषी ठरतो. ४३ आकाश लोकांत असून तें त्यांच्या संसर्गानें कधीं मळत नाहीं. त्याप्रमाणें योगी सर्व कर्में करूनहि कर्मठपणानें कधीं मलीन होत नाहीं. ४४ आकाशाची मोट बांधूं गेल्यास चारहि पदर रिकामे पडतात. त्याप्रमाणें योग्याला कर्मानें बांधूं लागल्यास तें कर्मच निष्कर्म बनतें. घटांतील आकाशाला घटाकाश म्हणतात; परंतु समत्वानें पाहूं गेल्यास घटाच्या आंत व बाहेर आकाश परिपूर्ण भरलेलें आहे. ४६ त्याचप्रमाणें आत्मा देहांत आहे असें म्हणतात, पण तो देहाच्या बाहेरहि भरलेला आहे. देह मिथ्यात्वामुळें जागच्याजागीं रहातो व चैतन्य परिपूर्ण असतें. ४४७.

—कूटस्थ आत्म्याचा उत्पत्ति-विनाशशील देहादिकांशीं संबंध नाहीं हेंच पुढील श्लोकांनीं अवधूत सांगतो—

तेजोऽबन्नमयैः भावैः–तेज, जल आणि पृथ्वी यांच्या विकाररूप पदार्थांनीं, **वायुना ईरितैः मेघाद्यैः**–वायूनें प्रेरणा केलेल्या मेघादिकांनीं, **कालसृष्टैः गुणैः च**–आणि काळानें उत्पन्न केलेल्या देहादिकांनीं, **नभः न स्पृश्यते**–आकाश संबद्ध होत नाहीं. [या सर्व पदार्थांनीं आकाश मर्यादित होत नाहीं.] **तद्वत् पुमान्**–त्याचप्रमाणें पुरुषहि पूर्वोक्त पदार्थांनीं संबद्ध किंवा परिच्छिन्न होत नाहीं.] ४३.

नभ पृथ्वीरजें न गदळे । उदकेंकरीं न पघळे । अग्नीचेनि ज्वाळें न जळे । वायुबळें उडेना ॥ ४८ ॥ कडकडीत आभाळें । येऊनि आकाश झांकोळे । त्या समस्तां नभ नातळे । अलिप्त बळें संस्थित ॥ ४९ ॥ तैसेंचि योगियासी । असतां निजात्मसमरसीं । काळें सृजिलिया गुणांसी । वश्य त्यांसी तो नव्हे ॥ ४५० ॥ काळाचें थोर सामर्थ्य जाण । देहासी आणी जरामरण । योगी देहातीत आपण । जन्ममरण न देखे ॥ ५१ ॥ स्वप्नीं चिंतामणी जोडला । सवेंचि अंधकूपीं पडला । जागा जाहल्या न म्हणे नाडला । तैसा घडला देहसंगु ॥ ५२ ॥ जो ब्रह्मादि देहांसी खाये । तो काळ्र वंदी योगियाचे पाये । जो काळाचाही आत्मा होये । निधडा पाहे महाकाळ्र ॥ ५३ ॥ विजु कडकडूनि आकाशीं । तेजें प्रकाशी गगनासी । गगन नातळे ते विजुसी । असोनि तिशीं सबाह्य ॥ ५४ ॥ तैसा सत्वगुण प्रकाशी ज्ञान । त्यासी योगिया नातळे जाण । ज्ञानस्वरूप निखळ आपण । वृत्तिज्ञान मग नेघे ॥ ५५ ॥ जालिया सूर्यउदयासी । दीपप्रभा नये उपेगासी । तेवीं सहज आलिया हातासी । वृत्तिज्ञानासी कोण पुसे ॥ ५६ ॥ सत्वें प्रकाशिलें ज्ञान । तें आवडोनि नेघे जाण । अथवा खवळल्या रजोगुण । कर्मठपण त्या न ये ॥ ५७ ॥ हो कां तमोगुणाचेनि मेळें । क्रोधमोहांसी नातळे । गुणातीत जाला बळें । बोधकल्लोळें स्वानंदें ॥ ५८ ॥ उदकासी गुरुपण । आलें तें ऐक लक्षण । अवधूत म्हणे सावधान । नृपनंदना यदुवीरा ॥ ५९ ॥

स्वच्छः प्रकृतितः स्निग्धो माधुर्यस्तीर्थभूर्नृणाम् । मुनिः पुनात्यपां मित्रमीक्षोपस्पर्शकीर्तनैः ॥ ४४ ॥

आकाश पृथ्वीवरील धुळीनें मलीन होत नाहीं, जलानें भिजत नाहीं, अग्नीच्या ज्वालांनीं जळत नाहीं, वायूच्या सोसाट्यानें उडत नाहीं, ४८ घनदाट मेघांनीं आकाश झांकून जातें पण त्या अभ्रांनीं तें लिप्त होत नाहीं, आपल्या जागेवर जसेच्यातसेंच अलिप्त असतें. ४९ त्याचप्रमाणें योगी आत्मस्वरूपांत समरस झाला म्हणजे काळानें उत्पन्न केलेल्या गुणांना वश होत नाहीं. ४५० काळाचें सामर्थ्य फार मोठें आहे. तो देहाला जरा-मरण देतो; पण योगी देहातीत असल्यामुळें तो जरा-मरणांकडे पहातच नाहीं. ५१ एखाद्याला स्वप्नांत चिंतामणि सांपडला व तो लगेच अंधकूपांत पडला तर जागा झाल्यावर तो 'मी नाडलों' म्हणून शोक करीत नाहीं, त्याप्रमाणें योग्याचा देहसंग असतो. ५२ ब्रह्मदेवादिकांच्याहि शरीराला खाणारा काळ योग्याच्या पायांना वंदन करितो. योगी काळाचाहि आत्मा असल्यामुळें तो महाकाळ आहे. ५३ वीज आकाशांत कडाडून आकाशालाच आपल्या तेजानें प्रकाशित करिते, पण आकाश तिच्या अंतर्बाह्य असूनहि तिच्या योगानें लिप्त होत नाहीं, ५४ तसा सत्त्वगुण ज्ञानाला प्रकाशित करितो; पण योगी त्यालाहि स्पर्श करीत नाहीं. कारण तो स्वतःच शुद्धज्ञानस्वरूप असतो. त्यामुळें तो वृत्तिज्ञान घेत नाहीं. ५५ सूर्योदय झाला म्हणजे दिव्याच्या प्रकाशाचा जसा उपयोग नसतो, त्याप्रमाणें ज्ञान सहज हातीं आल्यावर मग वृत्तिज्ञानाला कोण विचारितो ! ५७ सत्त्वानें प्रकाशित केलेलें ज्ञान तो योगी मोठ्या प्रेमानें स्वीकारीत नाहीं किंवा रजोगुण खवळला तरी त्याला कर्मठपणा येत नाहीं. ५७ किंवा तमोगुणाच्या बळानें तो क्रोध-मोहांसहि स्पर्श करीत नाहीं. तो स्वानंदसमुद्रांतील ज्ञानतरंगानें बळेंच गुणातीत झालेला असतो. ५८ हे नृपनंदना यदुवीरा ! आतां जलाला गुरूपणा कसा आला, तें लक्ष देऊन ऐक ४५९.

—उदक आपल्या स्वच्छत्वादि गुणांनीं पावन करितें, यास्तव त्याचे गुण मी शिकलों असें अवधूत सांगतो—

स्वच्छः—निर्मल, प्रकृतितः स्निग्धः—स्वभावतःच लोकांवर प्रीति करणारा, माधुर्यः—मधुर भाषण करणारा, नृणां तीर्थभूः—मनुष्यांचें तीर्थस्थान असा, अपां मित्रं—जलासारखा, मुनिः—मुनि, ईक्षोपस्पर्शकीर्तनैः—दर्शन, स्पर्श व कीर्तन यांच्या योगानें, पुनाति—पापापासून पावन करितो. [अर्थात् योग्यानें स्वच्छत्वादि गुणांनीं जलासारखें व्हावें.] ४४.

लक्षणें पाहतां जळ । स्वभावें अतिनिर्मळ । प्रकृतीस्तव कोमळ । मधुर केवळ सर्वांसी ॥ ४६० ॥ पवित्र व्हावया प्राणियांसी । तीर्थी तीर्थत्व उदकासी । इतुकीं लक्षणें योगियासी । अहर्निशीं असावीं ॥ ६१ ॥ उदकीं रिघाले जे समैळ । ते स्वभावें करी निर्मळ । परी न धरी अहंबळ । जे म्यां हे मळ क्षाळिले ॥ ६२ ॥ तैसे योगियासी भजनशीळ । भावें भाविक जे केवळ । त्यांचे निरसूनि कळिमळ । न धरी बळ गुरुत्वें ॥ ६३ ॥ प्राणु गेला तरी प्राणियांसी । कठिणत्व उपजेना मानसीं । जें जें भेटे तयासी । मृदुता कैसी वर्तत ॥ ६४ ॥ जेवीं चंद्रकिरण चकोरांसी । पांखोवा जेवीं पिलियांसी । जीवन जैसें कां जीवांसी । तेवीं सर्वांसी मृदुत्व ॥ ६५ ॥ जळ वरिवरी क्षाळी मळ । योगिया सबाह्य करी निर्मळ । उदक सुखी करी एक वेळ । योगी सर्वकाळ सुखदाता ॥ ६६ ॥ उदकाचें सुख तें किती । सवेंचि क्षणें तृषितें होती । योगिया दे स्वानंदतृप्ती । सुखासी विकृती पैं नाहीं ॥ ६७ ॥ उदकाची जे मधुरता । ते रसनेशींचि तत्त्वतां । योगियांचें गोडपण पाहतां । होय निवविता सर्वेंद्रियां ॥ ६८ ॥ लागल्या योगियांची गोडी । अमृताची चवी थोडी । ब्रह्मेंद्रादि पदें बापुडीं । अर्धघडीमाजीं करीत ॥ ६९ ॥ तापले आले उदकापाशीं । अंगस्पर्शें निववी त्यांसी । तैसिचि दशा योगियासी । स्पर्शें तापासी निवारी ॥ ४७० ॥ उदकें निवविलें ज्यासी । परतोनि ताप होय त्यासी । योगी कृपेनें स्पर्शे ज्यासी । त्रिविध तापांसी निर्मुक्त ॥ ७१ ॥ योगी ज्यासी निववी जीवेंभावें । त्यासी जीवु गेलियाही तापू नव्हे । निवालेपणें तो बोल्हावे । स्वानुभवें डुल्लत ॥ ७२ ॥ मेघमुखें अधःपतन । उदकाचें देखोनि जाण । अधःपातें निवती जन । अन्नदान सकळांसी ॥ ७३ ॥ तैसें योगियासी खालतें येणें । जे इहलोकीं जन्म पावणें । जन निववी श्रवणकीर्तनें । निजज्ञानें उद्धरी ॥ ७४ ॥ पर्जन्योदक देखतां जाण । जेवीं निवती सकळही जन । कां गंगादिकांचें

जलाचीं लक्षणें पाहिलीं तर तें स्वभावतःच अति निर्मल असतें व आपल्या स्वभावानुरूप तें सर्वांशीं मधुर व मृदु असतें. ४६० जीवांनीं पवित्र व्हावें म्हणून तीर्थांच्या ठिकाणीं जलाला तीर्थत्व येतें. योग्याच्या अंगींहि रात्रंदिवस हीं लक्षणें असावीं. ६१ मलिन अंगानें जे पाण्यांत शिरतात त्यांना तें जल आपल्या स्वभावाप्रमाणें निर्मळ करून सोडितें, परंतु 'मीं यांचा मळ धुवून टाकिला' असा अहंभाव धरीत नाहीं. ६२ त्याप्रमाणें योगीहि भक्तीनें भजनशील असलेल्या भाविकांच्या पातकाचा नाश करून त्याबद्दल गुरुत्वाचा अहंकार धरीत नाहीं. ६३ प्राण गेला तरी त्याच्या मनांत प्राण्याविषयीं कठोरपणा उपजत नाहीं. जो जो भेटतो त्याच्याशीं त्याचें प्रेमळ वर्तन कसें असतें, म्हणून म्हणशील तर ऐक. ६४ चकोर पक्ष्याला जसें चंद्रकिरण, किंवा पक्ष्यांच्या पिलांना जसे पंख, किंवा जीवांना जसें जल, तसें त्याचें सर्वांशीं मृदु वर्तन असतें. ६५ उदक वरवरचा मळ धुवून टाकितें, पण योगी अंतर्बाह्य निर्मल करितो. उदक एकदांच क्षणिक सुख देतें, पण योगी सदासर्वदा सुखदाता आहे. ६६ जलाचें सुख किती ? क्षणभरानें पुनः तहान लागते, परंतु योगी आत्मानंदानें इतकें तृप्त करून टाकितो कीं, तें सुख कधीं नाहींसें होतच नाहीं. ६७ पाण्याची गोडी फक्त रसनेपुरतीच असते, पण योगी आपल्या माधुर्यानें सर्व इंद्रियांना तृप्त करितो. ६८ योग्याची गोडी एकदां लागली म्हणजे त्यांच्यापुढें अमृतहि फिकें वाटूं लागतें व ते एका क्षणांत ब्रह्मदेव, इंद्र इत्यादिकांचें पदहि तुच्छ करून सोडितात. ६९ संतप्त झालेले लोक जलापाशीं येतांच तें आपल्या नुस्त्या स्पर्शानें त्यांस शांत करितें, त्याचप्रमाणें योगीहि आपल्या स्पर्शानें संसारतापाचें निवारण करितो. ४७० जलानें एकदां शांत केलेला मनुष्य पुनः तृप्त होतो पण योग्यानें ज्याला कृपास्पर्श केला आहे तो त्रिविध तापापासून कायमचा मुक्त होतो. ७१ योगी ज्याला जिवाभावानें तृप्त करितो त्याला प्राण गेला तरी कसलाहि ताप होत नाहीं. तो त्या शान्तीच्या ओलाव्यानेंच स्वानुभवांत डुलत असतो. ७२ मेघमुखांतून जलाचें अधःपतन होतें, पण त्याच्यामुळें सर्व लोक तृप्त होऊन त्यांना अन्नदान मिळतें. ७३ त्याचप्रमाणें योग्याचें खालीं येणें म्हणजे मृत्युलोकीं जन्म घेणें होय. पण तो लोकांना श्रवण-कीर्तनाच्या द्वारां शान्त करितो व आत्मज्ञानानें त्यांचा उद्धार करितो. ७४ पाऊस पडलेला

दर्शन । करी मोचन पापाचें ॥ ७५ ॥ तैसें योगियाचें दर्शन । भाग्येंवीण नव्हे जाण । ज्याणें देखिले त्याचे चरण । करी मोचन भवरोगा ॥ ७६ ॥ न घडे दर्शन स्पर्शन । तरी करावें त्याचें नामस्मरण । इतुकेनि भवमूळ जाण । करी छेदन तें नाम ॥ ७७ ॥ सांडूनि भगवंताचें कीर्तन । केल्या भक्ताचें नामस्मरण । केवीं तुटेल भवबंधन । ऐसें न म्हणा सर्वथा ॥ ७८ ॥ देवासी पूर्वीं नामचि नाहीं । त्यासी भक्तीं प्रतिष्ठूनि पाहीं । नामरूपादि सर्वही । नाना विलास अर्पिले ॥ ७९ ॥ ऐसा भक्तीं देव थोर केला । आणूनि वैकुंठीं बैसविला । भक्तउपकारें दाटला । मग त्यांच्या बोलामाजीं वर्ते ॥ ४८० ॥ देवो भक्तवचनें करी । झाला नर ना केसरी । प्रगटला खांबामाझारीं । शब्द करी भक्ताचा ॥ ८१ ॥ आतांही प्रत्यक्ष प्रमाण । दासांचेनि वचनें जाण । पाषाणप्रतिमे देवो आपण । आनंदघन प्रगटे पैं ॥ ८२ ॥ भक्तभावें आभारला । देवो उपकारें दाटला । यालागीं नुल्लंघवे बोला । पांगें पांगला भक्तांच्या ॥ ८३ ॥ एवं जेथ भक्तांचें नाम घेणें । तेथ अवश्य देवें धावणें । भक्तउपकारा उत्तीर्ण होणें । वेगें पावणें यालागीं ॥ ८४ ॥ यालागीं भक्तांचें नाम घेतां । तुटती भवबंधनव्यथा । ऐसें सांगतां अवधूता । प्रेम सर्वथा न संडे ॥ ८५ ॥ आतां अग्नि गुरु जो करणें । त्याचीं सांगेन लक्षणें । काना मना एक करणें । सावधपणें परियेसी ॥ ८६ ॥

तेजस्वी तपसा दीप्तो दुर्धर्षोदरभाजनः । सर्वभक्षोऽपि युक्तात्मा नादत्ते मलमग्निवत् ॥ ४५ ॥

पाहून सर्व लोकांना जसा हर्ष होतो; किंवा गंगादि नद्यांच्या दर्शनानें पापाचें जसें क्षालन होतें, ७५ तसें योग्याचें दर्शन भाग्यावांचून घडत नाहीं. त्याच्या चरणाचें दर्शन जो घेतो तो भवरोगापासून मुक्त होतो. ७६ योग्याचें दर्शन किंवा स्पर्श घडणें शक्य नसेल तर त्याचें नामस्मरण करावें, म्हणजे तें नाम संसारमूलाचा उच्छेद करितें. ७७ 'भगवंताचें नामस्मरण करावयाचें सोडून त्याच्या भक्ताचें स्मरण केल्यानें भवबंध कसा तुटेल !' असें मुळींच बोलूं नको. ७८ खरें म्हटलें तर देवाला मुळीं नांवच नाहीं. भक्तानें त्यांची प्रतिष्ठा करून त्याला नांवरूपादि अनेक विलास अर्पिले आहेत. ७९ याप्रमाणें भक्तांनींच देवाची प्रतिष्ठा वाढविली व त्याला वैकुंठांत आणून बसविलें. तो असा भक्तांच्या उपकारांनीं वांकल्यामुळें भक्तांच्या आज्ञेंत रहातो. ४८० देव भक्तांच्या शब्दाप्रमाणें चालत असतो म्हणूनच तो धड मनुष्यहि नाहीं व धड सिंहहि नाहीं, असें रूप धारण करून खांबांतून प्रकट झाला व त्यानें भक्ताचा शब्द खरा केला. ८१ आतांहि याला प्रत्यक्षप्रमाण आहेच. देव स्वतः ज्ञानघन असूनहि आपल्या दासांच्या शब्दासाठीं दगडाच्या मूर्तींतहि प्रकट होतो. ८२ भक्तांच्या भक्तीच्या ओझ्यानें देव इतका आभारी झालेला असतो व त्यांच्या दुःखानें इतका कळवळतो कीं, त्याला भक्तांच्या शब्दांचें उल्लंघन करवत नाहीं. ८३ म्हणून जेथें भक्ताचें नामस्मरण होतें तेथें देवाला अवश्य धांवत जावें लागतें. भक्ताच्या उपकारांचा उतराई होण्यासाठीं तो लगेच पावतो. ८४ त्यामुळें भक्ताचें नामस्मरण केलें असतां भवबंधनाची व्यथा तुटून जाते. असें सांगत असतां अवधूताचें मन प्रेमानें भरून आलें. तो म्हणाला, ८५ 'आतां पुढला गुरु जो अग्नि त्याचीं लक्षणें सांगतों, तीं कान आणि मन एकाग्र करून लक्षपूर्वक ऐक.' ४८६.

—अग्नीपासून आपण काय शिकलों, तें अवधूत सांगतो—

तेजस्वी–ज्ञानाधिक्यामुळें तेजस्वी, **तपसा दीप्तः**–तपानें विशेष देदीप्यमान, **दुर्धर्षोदरभाजनः**–अक्षोभ्य व तसाच अपरिग्रह (कोणाकडून क्षुब्ध केला न जाणारा व जें मिळेल तें उदरांत सांठविणारा), **सर्वभक्षः अपि युक्तात्मा अग्निवत् मलं न आदत्ते**–व सर्वभक्षक असूनहि मुनि अग्नीप्रमाणें मलिनतेचा स्वीकार करीत नाहीं. [अग्नि ज्याप्रमाणें तेजस्वी असून जें प्राप्त होईल त्याचें भक्षण करीत असूनहि गुण-दोषांनीं लिप्त होत नाहीं, तसेंच योग्यानें व्हावें.] ४५.

अग्नि निजतेजें देदीप्यमान। साक्षात् हातीं न धरवे जाण। उदरमात्रीं सांठवण। सर्वभक्षण निजतेजें ॥ ८७ ॥ तैसाचि योगियाही जाण। भगवद्भावें देदीप्यमान। त्यासी धरावया आंगवण। नव्हे जाण सुरनरां ॥ ८८ ॥ हातीं न धरवे खदिरांगारू। तैसा योगिया अतिदुर्धरू। तयासी न शके आवरूं। मायाव्यवहारू गुणेंसीं ॥ ८९ ॥ अग्नीसी जेवीं मुखचि पात्र। तैसें योगियासी उदर मात्र। ठेवा ठेवणें विचित्र। नाहीं पात्र गांठीसी ॥४९०॥ अग्नीनें जें जें सेवणें। तें तें जाळूनि आपुल्या ऐसें करणें। यापरी सर्व भक्षणें। नाहीं स्पर्शणें मळासी ॥ ९१ ॥ चंदन सुवासें दुर्गंधधुरें। निंब कडू ऊंस गोडिरे। तें जाळूनि आकारविकारें। कीजे वैश्वानरें आपणाऐसीं ॥ ९२ ॥ तैसा योगी जें अंगीकारी। तें आत्मादृष्टीं निर्धारी। दोष दवडूनियां दुरीं। मग स्वीकारी निजबोधें ॥ ९३ ॥ भाग्य जें भोगूं जाये। तेथ आत्मप्रतीति पाहे। भोक्ता तद्रूपाचि होये। हा भोगू पाहे योगिया ॥ ९४ ॥ अग्नींत पडिलें जें समळ। तें अग्निमुखें होय निर्मळ। योगिया जें सेवी अळुमाळ। परम मंगळ तें होय ॥ ९५ ॥ अग्निमुखीं यागू घडे। तेणें अदृष्टें स्वर्गभोगु जोडे। योगियाचे मुखीं जें पडे। तेणें जोडे निजपद ॥ ९६ ॥ आणिक अग्नीचें चिन्ह। ऐक राया सावधान। तेंचि साधकासी साधन। सिद्ध लक्षण सिद्धाचें ॥ ९७ ॥

क्वचिच्छन्नः क्वचित्स्पष्ट उपास्यः श्रेय इच्छताम्। भुंक्ते सर्वत्र दातॄणां दहन् प्रागुत्तराशुभम् ॥ ४६ ॥

भीतरीं तेजस्वी वरी झांकिला। होमकुंडीं अग्नि पुरिला। कां यज्ञशाळे प्रज्वळला। याज्ञिकीं केला महायागू ॥ ९८ ॥ जो जो उपासका भावो जीवीं। त्या श्रेयातें उपजवी। पूर्वोत्तर अशुचित्वें आघवीं।

अग्नि आपल्या स्वाभाविक तेजानेंच देदीप्यमान असतो. त्याला प्रत्यक्ष हातांत धरितां येत नाहीं. पण तो प्रत्येक प्राण्याच्या पोटांत सांठलेला असून स्वभावतःच प्रदीप्त होऊन सर्व भक्षण करितो. ८७ त्याचप्रमाणें योगीहि भगवद्भक्तीनें देदीप्यमान असतो. त्याला धरण्याचें देवादिकांनाहि सामर्थ्य नसतें. ८८ खैराचे रखरखीत निखारे जसे हातांत धरवत नाहींत, तसा योगीहि दुर्धर आहे. गुणांसह मायेचा व्यवहार त्याला आवरूं शकत नाहीं. ८९ अग्नीचें पात्र जसें मुख, तसें योग्याचें पात्र उदर. कसलीहि विचित्र ठेव ठेवण्यास त्याजपाशीं दुसरें पात्र नसतें. ४९० अग्नि ज्याचें सेवन करितो, त्याला जाळून तो स्वतःसारखें बनवितो. याप्रमाणें सर्व भक्षण करून तो मलिनतेला स्पर्शहि करीत नाही. ९१ सुवासिक चंदन असो किंवा दुर्गंधयुक्त पदार्थ असो, कडु लिंब असो, किंवा गोड ऊंस असो, अग्नि त्यांचा आकार विकार सर्व जाळून टाकून त्यांस स्वतःसारखा करितो. ९२ त्याप्रमाणें योगी ज्याचा अंगीकार करितो, त्याच्याकडे आत्मदृष्टीनें अगोदर पहातो व त्याचे दोष दूर घालवून आत्मज्ञानानें त्याला स्वीकारितो. ९३ भोक्ता जें भोगावयास जातो, त्यांत त्याला आत्मप्रतीति येते व तो भोक्ता तद्रूप होतो. हाच योग्यांचा भोग होय. ९४ अग्नींत जी अपवित्र वस्तु ती सर्व त्याच्या मुखानें निर्मळ होते. त्याचप्रमाणें योगी जें कांहीं किंचित् सेवन करितो तें सर्व पवित्र होतें. ९५ अग्निमुखानें यज्ञ होतो. त्या कर्मानें स्वर्गप्राप्ति घडते, त्याप्रमाणें योग्याच्या मुखांत जें पडतें, त्यानें आत्मपदाची प्राप्ति होते. ९६ हे राजा! अग्नीचें आणखी एक लक्षण सावधान चित्तानें ऐक. तेंच साधकाचें साधन व सिद्धांचें लक्षण आहे. ४९७.

—अग्नीपासूनच शिकलेल्या आणखी एका गुणाचें वर्णन—

क्वचित् छन्नः—कोठें गुप्त, **क्वचित् स्पष्टः**—कोठें प्रकट, **श्रेयः इच्छतां उपास्यः**—पण श्रेयाची इच्छा करणारांना उपास्य असलेला योगी, **सर्वत्र भुंक्ते**—सर्व ठिकाणीं अन्नादिकांचा स्वीकार करितो (जसा अग्नि परेच्छेनेंच हवीचें ग्रहण करितो त्याचप्रमाणें मुनीहि दात्यांच्या अन्नादिकांचें ग्रहण करून) **दातॄणां प्रागुत्तराशुभं दहन्**—दात्यांच्या मागील व पुढील पापांचा नाश करितो. ४६.

होमकुंडांत पुरलेला अग्नि आंतून तेजस्वी व वरून राखेनें आच्छादिलेला असतो, किंवा यज्ञशाळेंत त्याला प्रज्वलित करून याज्ञिक मोठा यज्ञ करितात. ९८ उपासकांच्या मनांत जो भाव असतो, तें श्रेय अग्नि त्याला प्राप्त

जाळूनि हवी सेवितु ॥ ९९ ॥ तैशीच योगियाची लीळा । भाविकां प्रकट दिसे डोळां । एका गुप्तचि होऊनि ठेला । न दिसे पाहिला सर्वथा ॥ ५०० ॥ ऐशियाच्याही ठायीं । भावबळें भाविक पाहीं । अर्पिती जें जें कांहीं । तेणें मोक्ष पाहीं मुमुक्षां ॥ १ ॥ तें पडतांचि योगियांच्या मुखीं । संचित क्रियमाणें असकीं । जाळोनियां एकाएकीं । करी सुखी निजपदीं ॥ २ ॥ आणीकही अग्नीचें लक्षण । राया तुज मी सांगेन जाण । जेणें सगुण आणि निर्गुण । दिसे समान समसाम्यें ॥ ३ ॥

स्वमायया सृष्टमिदं सदसल्लक्षणं विभुः । प्रविष्ट ईयते तत्तत्स्वरूपोऽग्निरिवैधसि ॥ ४७ ॥

अग्नि सहजें निराकार । त्यासी काष्ठानुरूपें आकार । दीर्घ चक्र वर्तुल थोर । नानाकार भासतु ॥ ४ ॥ तैसीचि भगवंताची भक्ती । स्वमायाकल्पित कल्पनाकृती । तेथ प्रवेशला सहजस्थितीं । बहुधा व्यक्ती तो भासे ॥ ५ ॥ जैसें गंगेचें एक जळ । भासे भंवरे लहरी कल्लोळ । तैसा जगदाकारें अखिळ । भासे सकळ जगदात्मा ॥ ६ ॥ कां छायामंडपींच्या चित्रासी । दीपप्रभा भासे जैसी । राम रावण या नांवेंसी । दावी जगासी नटनाट्य ॥ ७ ॥ तैशा नानाविधा व्यक्ती । नाना मतें नाना कृती । तेथ प्रवेशोनि श्रीपती । सहजस्थितीं नाचवी ॥ ८ ॥ तैशी योगियाची स्थिती । पाहतां नानाकार व्यक्ती । आपणियांतें देखे समवृत्ती । भेदभ्रांति त्या नाहीं ॥ ९ ॥ तेथ जें जें कांहीं पाहे । तें तें आपणचि आहे । या उपपत्ती उभवूनि बाहे । सांगताहे अवधूतू ॥ ५१० ॥ या देहासी जन्म नाशू । आत्मा नित्य अविनाशू । हा दृढ केला विश्वासू । गुरु हिमांशू करूनी ॥ ११ ॥

करून देतो. तो पूर्वोत्तर सर्व अशुचित्व–अमंगलता जाळून टाकून हवी ग्रहण करितो. ९९ योग्याची लीलाहि भाविकांच्या दृष्टीस अशीच पडते. तो कित्येकांपासून अगदीं गुप्त असतो. त्याला शोधूनहि कोठें सर्वथा सांपडत नाहीं. ५०० परंतु भाविक जन त्यालाहि सर्व अर्पण करितात. त्यामुळें मुमुक्षु मुक्त होतो. १ तें सर्व योग्याच्या मुखांत पडतांच त्यांचीं संचित, क्रियमाण सर्व कर्में जाळून टाकून तो त्यास आत्मपद देऊन सुखी करितो. २ हे राजा ! ज्यामुळें सगुण, निर्गुण साम्यभावानें एकरूप दिसतें तें आणखीहि एक अग्नीचें लक्षण सांगतों, तें ऐक. ५०३.

—‘ आत्म्याचा उच्च-नीच भाव देह या उपाधीनेंच आहे, स्वाभाविक नव्हे, असें मीं अग्नीच्या दृष्टान्तानें जाणिलें ,’ असें अवधूत सांगतो—

स्वमायया सृष्टं सदसल्लक्षणं इदं प्रविष्टः विभुः—आपल्या मायेनें उत्पन्न केलेल्या या सत्-असत्‌रूप म्ह० देव-तीर्यगादिरूप किंवा ब्राह्मण शूद्रादिरूप जगांत प्रविष्ट झालेला प्रभु, एधसि अग्निः इव तत्तत्स्वरूपः ईयते—काष्ठामध्यें जसा अग्नि त्याप्रमाणें त्या त्या शरीरासारखा होतो. ४७.

अग्नि स्वभावतः निराकारच आहे. त्याला लांकडाच्या आकारानुरूप लांब, चक्राकार, वाटोळा किंवा नानाप्रकारचा आकार असलेला भासतो. ४ भगवंताची भगवद्भक्तीहि तशीच आहे. तिची आकृति मायेच्या कल्पनेनुसार बनलेली आहे. त्यांत सहज प्रवेश करणारा भगवान् अनेक स्वरूपांनीं भासतो. ५ गंगेचें जल एकच असतें, पण तें जसें भोंवरें, लाटा, मोठाल्या लहरी, यांच्या योगें निरनिराळ्या स्वरूपानें भासतें, तसाच जगदात्मा सर्व विश्वाच्या आकारानें भासतो. ६ किंवा चित्रें दाखविण्याच्या मंडपांत दीपप्रकाशानें जशीं चित्रें दिसूं लागतात व राम, रावण इत्यादि नांवांनीं जगाला खेळ करून दाखवितात, ७ त्याप्रमाणें नानाप्रकारचे प्राणी, नाना तऱ्हेच्या आकृति, अनेक मतें या सर्वांत प्रवेश करून श्रीपति त्यांना स्वाभाविकरीत्या नाचवितो. ८ योग्याचीहि तीच स्थिति आहे. अनेक आकारांच्या व्यक्ति पहात असतांहि तो समवृत्तीनें त्यांना आत्मरूप पहातो. त्यामुळें त्याला भेदाची भ्रांति होत नाहीं. ९ त्यांत तो जें जें पहातो, तें तें तो स्वतःच असतो. ही उपपत्ति अवधूतानें हात वर करून सांगितली. ५१० देहाला जन्म-मृत्यु आहे. आत्मा नित्य अविनाशी आहे, ही श्रद्धा दृढ करण्यासाठीं मीं चंद्राला गुरु केलें. ५११.

विसर्गाद्याः श्मशानान्ता भावा देहस्य नात्मनः । कलानामिव चन्द्रस्य कालेनाव्यक्तवर्त्मना ॥ ४८ ॥

शुक्लकृष्णपक्षपाडी । चंद्रकळांची वाढी मोडी । ते निजचंद्रीं नाहीं वोढी । तैशी रोकडी योगियां ॥ १२ ॥ जन्मनाशादि षड्विकार । हे देहासीच साचार । आत्मा अविनाशी निर्विकार । अनंत अपार स्वरूपत्वें ॥ १३ ॥ घट स्वभावें नाशवंतु असे । त्यामाजीं चंद्रमा बिंबलासे । नश्वरीं अनश्वर दिसे । विकारदोषें लिंपेना ॥ १४ ॥ घटासवें चंद्रासी उत्पत्ती । नाहीं नाशासवें नाशप्राप्ती । चंद्रमा आपुले सहजस्थिती । नाशउत्पत्तिरहितु ॥ १५ ॥ तैसा योगिया निजरूपपणें । देहासवें नाहीं होणें । देह निमाल्या नाहीं निमणें । अखंडपणें परिपूर्ण ॥ १६ ॥ काळाची अलक्ष्य गती । दाखवी नाश आणि उत्पत्ती । ते काळसत्ता देहाप्रती । आत्मस्थिति नातळे ॥ १७ ॥ एवं काळाचें बळ गाढें । म्हणती ते देहाचिपुढें । पाहतां आत्मस्थितीकडे । काळ बापुडें तेथ नाहीं ॥ १८ ॥ सूक्ष्म काळगती सांगतां । वेगें आठवलें अवधूता । सिंहावलोकनें मागुता । अग्निदृष्टांता सांगतू ॥ १९ ॥

—आत्म्याच्या जन्मादि षड्भावविकारांचा अभाव मी चंद्रदृष्टान्तानें शिकलों—

विसर्गाद्याः श्मशानान्ताः भावाः देहस्य न आत्मनः–जन्मापासून मरणापर्यंत सहा भावविकार देहाचे आहेत. आत्म्याचे नाहींत. **अव्यक्तवर्त्मना कालेन चंद्रस्य कलानां इव**-ज्याचा मार्ग अव्यक्त आहे अशा कालाच्यायोगानें चंद्राच्या कलांचा जसा वृद्धि-क्षय होतो त्याप्रमाणें. (जन्मादि षड्भाव देहाला आहेत, आत्म्याला नाहींत. याविषयीं ज्यौतिष शास्त्राची प्रक्रिया अशी आहे. चंद्रमंडल जलमय व सूर्यमंडल तेजोमय आहे. तीं दोन्हीं एका नक्षत्रांत जेव्हां येतात तेव्हां चंद्र दिसत नाहीं. कारण पहाणाराचे नेत्र जेथें चंद्र असतो तेथेंच असणाऱ्या सूर्यमंडलानें आच्छादित झालेले असतात. तीच अमावास्या होय. चंद्र साठ घटकांनीं एक नक्षत्र सोडून दुसऱ्या नक्षत्रांत जातो; पण सूर्याला तेवढेंच अंतर चालण्यास तेरा अहोरात्र लागतात. त्यामुळें प्रतिपदेपासून चंद्रासमोर स्थित नसलेल्या आदित्यमंडलाचा पंधरावा भाग चंद्राच्या जलमयमंडलांत प्रतिबिंबित झालेला दिसतो. त्याला चंद्राची कला म्हणतात. याप्रमाणें पंधराव्या दिवशीं चंद्र व सूर्य यांमध्यें तेरा नक्षत्रांचें अंतर पडतें. अर्थात् सत्तावीस नक्षत्रांनीं पूर्ण होणाऱ्या राशीचक्रामध्यें चंद्र व सूर्य एकमेकांसमोर येतात. तेव्हां भूमीच्या छायेनें प्रतिबिंबित झालेलें सूर्याचें संपूर्ण प्रतिबिंब चंद्रांत दिसतें, तीच पौर्णिमा होय. अमावस्येच्या दिवशीं चंद्रांत पडलेल्या सूर्याच्या प्रतिबिंबासह पौर्णिमेच्या दिवशीं चंद्राच्या सोळा कला होतात. म्हणून चंद्राला षोडशकल म्हटलें जातें. पुनः कृष्णप्रतिपदे-पासून तीं दोन्हीं मंडलें एकमेकांपासून वक्र होत जातात. त्यामुळें रोज एकेक कलेचा क्षय होतो, असें वाटतें. पण ही वृद्धि व क्षय, हे जसे कलांचे धर्म आहेत, जलमय चंद्रमंडलाचे नव्हेत, त्याप्रमाणें उत्पत्त्यादि विकार देहाचे आहेत, आत्म्याचे नव्हेत.) ४८.

चंद्राच्या कला शुक्लपक्षांत वाढतात व कृष्णपक्षांत क्षय पावतात. पण त्यामुळें चंद्राला कांहीं क्षयवृद्धि नसते. योग्याची स्थिति खरोखर तशीच आहे. १२ जन्म-मृत्यु इत्यादि षड्विकार देहाचे आहेत. आत्मा स्वरूपतःच अविनाशी, निर्विकार, अनंत व अपार आहे. १३ घट स्वभावतःच नाशिवंत आहे. पण त्यांत चंद्राचें प्रतिबिंब दिसतें. त्याप्रमाणें नाशिवंत शरीरांत जें अविनाशी तत्त्व दिसतें, तें विकारदोषानें लिप्त होत नाहीं. १४ घटाबरोबर चंद्र उत्पन्न होत नाहीं. किंवा घटाच्या नाशानें चंद्र नाश पावत नाहीं. तो आपल्या स्वाभाविक स्वरूपांत उत्पत्ति व नाश यांनीं रहितच असतो. १५ त्याप्रमाणें योगी आत्मस्वरूपानें स्थित असल्यामुळें तो देहाबरोबर जन्मत नाहीं व देह नष्ट झाल्याबरोबर मरत नाहीं, तर तो आपल्या अखंड स्वरूपानेंच परिपूर्ण असतो. १६ काळाची गति गहन आहे. ती उत्पत्ति व नाश दाखविते. पण ती काळाची सत्ता देहावर चालते. आत्मस्वरूपाला स्पर्श करीत नाहीं. १७ काळाचें सामर्थ्य असें मोठें अगाध आहे, पण तें केवळ देहापुरतेंच. आत्मस्थितीकडे पाहिलें तर बिचाऱ्या काळाचें तेथें कांहीं चालत नाहीं. १८ काळाची अशी सूक्ष्म गति सांगत असतां अवधूताला एकदम आठवण झाली व सिंहाव-लोकन न्यायानें तो पुनः अग्नीचा दृष्टान्त सांगूं लागला. ५१९.

कालेन ह्योघवेगेन भूतानां प्रभवाप्ययौ । नित्यावपि न दृश्येते आत्मनोऽग्नेर्यथार्चिषाम् ॥ ४९ ॥

काळनदीचा महावेगू । सूक्ष्मगती वाहतां वोघू । तेथ भूततरंगा जन्मभंगू । देखतांचि जगू नेदखे ॥ ५२० ॥ जराजर्जरित जाण । वाहतां नदीमाजीं वोसण । षड्विकार तोचि परिपूर्ण । भंवरे दारुण भंवताती ॥ २१ ॥ बाल्यतारुण्यांचे खळाळ । वार्धक्याचें मंद जळ । जन्ममरणांचे उसाळ । अतिकल्लोळ उठती ॥ २२ ॥ वोघवेगाच्या कडाडीं । पडत आयुष्याची दरडी । स्वर्गादि देउळें मोडी । शिखरींचे पाढी सुरेंद्र ॥ २३ ॥ तळीं रिचवितां वोगें । पाताळादि विवरें वेगें । नाशूनियां पन्नगें । अंगभंगें आडिमोडी करी ॥ २४ ॥ ऐशिया जी काळवोघासी । घडीमोडी भूततरंगांसी । होतसे अहर्निशीं । तें कोणासी लक्षेना ॥ २५ ॥ जैं महाप्रळयीं मेघु गडाडी । तैं पूर चढे कडाडी । ब्रह्मादिक तरुवर उपडी । समूळ सशेंडी वाहाविले ॥ २६ ॥ जैं आत्यंतिक पूरु चढे । तैं वैकुंठ कैलासही बुडे । तेथ काळा रिगू न घडे । हें अवचट घडे एकदा ॥ २७ ॥ अनिवार काळनदीची गती । सूक्ष्म लक्षेना निश्चितीं । ते सूक्ष्मगतीची स्थिती । अतिनिगुतीं परियेसी ॥ २८ ॥ दीपू तोचि तो हा म्हणती । परी शिखा क्षणक्षणा जाती । ते लक्षेना सूक्ष्मगती । अंतीं म्हणती विझाला ॥ २९ ॥ प्रत्यक्ष प्रवाहे गंगाजळ । ते काळींचें म्हणती बरळ । तैशी काळगती अकळ । लोक सकळ नेणती ॥ ५३० ॥ प्रत्यक्ष

—‘ सिंहावलोकनन्यायानें, मी अग्नीच्या दृष्टान्तानेच देहांना क्षणभंगुरत्व असल्यामुळें वैराग्य शिकलों ’ असें अवधूत सांगतो—

—ओघवेगेन कालेन हि–प्रवाहाप्रमाणें ज्याचा वेग आहे अशा कालाच्या योगानेंच, **आत्मनः भूतानां प्रभवाप्ययौ नित्यौ अपि**–आत्मसंबंधीं देहांचे उत्पत्ति, नाश जरी सतत होत असले तरी, **यथा अग्नेः अर्चिषां तथा न दृश्येते**– ज्याप्रमाणें अग्नीच्या ज्वालांचे प्रतिक्षणीं होणारे उत्पत्ति, नाश दिसत नाहींत त्याप्रमाणें (तेहि) प्रतीत होत नाहींत. ४९.

काळरूपी नदीचा फार मोठा वेग आहे. तिचा ओघ सूक्ष्म गतीनें वहात असतो. तेथें प्राणिरूपी तरंग उत्पन्न होऊन नाश पावतात. पण सर्व जगत् हें पहात असूनहि न पाहिल्याप्रमाणें वागतें. ५२० या नदीमध्यें जरेनें जर्जर झालेला लोकरूपी कचरा तरंगत असतो आणि षड्विकाररूपी महाभयंकर भोंवरे फिरत असतात. २१ बाल्यावस्था व तारुण्यावस्था यांची खळाळ चाललेली असते. वार्धक्याचें जल मंद वहात असतें. जन्म-मरणाच्या फेऱ्यांच्या मोठाल्या लाटा उसळत असतात. २२ प्रवाहाच्या वेगानें आयुष्याची दरड कोसळून पडते. स्वर्गादिक देवळें मोडून, त्यांच्या शिखरावर असलेल्या इंद्रांनाहि तो खालीं पाडतो. २३ ही लाट पाताळद्वारानें वेगानें आंत घुसली म्हणजे सर्पांचा नाश करून त्यांचा विध्वंस करिते. २४ अशा काळाच्या ओघांत पंचमहाभूतरूपी लाटांच्या घडामोडी सारख्या चाललेल्या असतात. परंतु ही गोष्ट कोणाच्या लक्षांत येत नाहीं. २५ महाप्रलयाच्या वेळीं प्रलय-मेघांचा जेव्हां गडगडाट होतो, तेव्हां अनिवार पूर येतो व त्यांत ब्रह्मदेवासारखे मोठाले वृक्ष मुळासकट उपटून शेंड्यासह वाहून जातात. २६ त्या पुराचा अतिरेक झाला म्हणजे त्यांत वैकुंठ व कैलाससुद्धां बुडून जातें. तेथें काळाचाहि रिघाव होत नाहीं. महाप्रलयाच्या वेळीं असें अकस्मात् घडतें. २७ काळरूपी नदी अनिवार्य आहे. तिची गति सूक्ष्मपणामुळें खरोखर लक्षांत येत नाहीं. त्या सूक्ष्म गतीची स्थिति आतां ऐक. २८ दीप तोच आहे असें म्हणतात. पण त्याची ज्योति प्रत्येक क्षणीं बदलत असते. पण तिची सूक्ष्मगति कोणाच्या लक्षांत येत नाहीं व शेवटीं तो दिवा विझला असें म्हणतात. २९ किंवा नदीचें जल प्रत्यक्ष वहात असतें. तेंहि प्रतिक्षणीं नवीनच येत असतें. परंतु अज्ञजन तें पाणी आरंभींचेंच आहे असें समजतात. त्याप्रमाणें काळाची गति अगम्य आहे. त्यामुळें ती सर्व लोकांना कळत नाहीं. ५३० प्रत्यक्ष देहाकडे जरी पाहिलें तरी त्यालाहि काळ वयाच्या योगानें ग्रासीतच

पाहतां देहासी । काळ वयसेतें ग्रासी । बाल्यकौमारतारुण्यांसी । निकट काळासी न देखती ॥ ३१ ॥ अलक्ष्य काळाची काळगती । यालागीं गुरु केला गभस्ती । त्यापासोनि शिकलों स्थिती । तेही नृपति परियेसीं ॥ ३२ ॥

गुणैर्गुणानुपादत्ते यथाकालं विमुञ्चति । न तेषु युज्यते योगी गोभिर्गा इव गोपतिः ॥ ५० ॥

सूर्य काळें निजकिरणीं । रसें सहित शोषी पाणी । तोचि वर्षाकाळीं वर्षोनी । निववी जनीं सहस्रधा ॥ ३३ ॥ सूर्य शोषूनि घे किरणीं । तें शोषितें लक्षण नेणे कोणी । देतां मेघमुखें वरुषोनी । निववी अवनी जनेंसीं ॥ ३४ ॥ तैसीचि योगियाची परी । अल्प ज्याचें अंगीकारी । त्याचे मनोरथ पूर्ण करी । सहस्र प्रकारीं हितत्वें ॥ ३५ ॥ ज्यासी सेविती योगी आत्माराम । त्यांचे पुरती सकळ काम । अंतीं करोनियां निष्काम । विश्रामधाम आणिती ॥ ३६ ॥ एवं योगी आपुले योगबळें । विषयो सेविती इंद्रियमेळें । जे देती त्यांसी यथाकाळें । कृपाबळें निववितीं ॥ ३७ ॥ त्यांसी विषयो देतां कां घेतां । आसक्ति नाहीं सर्वथा । रसु शोखूनि घेतां देतां । अलिप्त सविता तैसे ते ॥ ३८ ॥

बुद्धयते स्वे न भेदेन व्यक्तिस्थ इव तद्गतः । लक्ष्यते स्थूलमतिभिरात्मा चावस्थितोऽर्कवत् ॥५१॥

असतो. काळ बाल्य, कौमार व तारुण्य यांच्या अगदीं जवळच असतो; पण त्याला कोणी पहात नाहीं. ३१ अशी काळाची गति अगाध आहे. त्यानंतर मीं सूर्याला गुरु केलें, त्याच्याकडून काय शिकलों, तें हे राजा, आतां ऐक ! ५३२.

——आतां अवधूत आदित्यापासून कोणता गुरूपदेश घेतला तें पुढील दोन श्लोकांनीं सांगतो——

योगी गुणैः गुणान् उपादत्ते—योगी इंद्रियांनीं विषयांचें ग्रहण करितो. **यथाकालं विमुंचति**—व कोणी योग्य याचक वगैरे आला असतां ते विषय त्यांस अर्पण करितो. **तेषु न युज्यते**—त्यांमध्यें मीं हें मिळविलें व हें मीं दिलें असा अभिनिवेश धरीत नाहीं. (तो कसा ?) **गोपतिः गोभिः गाः इव**—सूर्य आपल्या किरणांनीं पृथ्वीवरील जल जसें आकर्षण करून घेतो व वर्षाकालीं वृष्टिरूपानें सोडितो, पण त्याचा अभिमान धरीत नाहीं. त्याप्रमाणें. ५०.

सूर्य आपल्या किरणांनीं समुद्राच्या जलाचें शोषण करितो व त्याच जलाचा पावसाळ्यांत वृष्टि करून लोकांना अनेक प्रकारें तृप्त करितो. ३३ परंतु सूर्य आपल्या किरणांनीं जल शोषून घेत असतांनाहि त्याचें तें जलशोषण कोणाच्याच लक्षांत येत नाहीं. तथापि त्याच जलाची वृष्टि करून तो सर्व सृष्टींतील लोकांना तृप्त करितो. ३४ योग्याची स्थितीहि तशीच आहे. तो ज्याच्यापासून थोडेसें कांहीं स्वीकारितो, त्याच्या हितबुद्धीनें त्याचें मनोरथ हजारप्रकारें पूर्ण करितो. ३५ अशा आत्मानंदांत निमग्न झालेल्या योग्याची जे सेवा करितात त्यांच्या सर्व कामना पूर्ण होतात व तो शेवटीं त्यांस निष्काम करून निजधामाला आणितो. ३६ याप्रमाणें योगी आपल्या योगबलानें इंद्रियांच्या द्वारां विषयसेवन करीत असतो. त्याला जे कोणी कांहीं देतात त्यांच्यावर कृपा करून तो त्यांस तृप्त करितो. ३७ पण विषय देतांना किंवा घेतांना त्याची त्यांवर सर्वथा आसक्ति नसते. सूर्य जल शोषून घेते-वेळीं किंवा देतेवेळीं जसा अलिप्त असतो तसाच योगी विषयांपासून अलिप्त रहातो. ५३८.

——'स्वतः भेदशून्य असलेल्याहि आत्म्याची भेदप्रतीति उपाधीमुळें येते' हें मी आदित्याच्या दृष्टान्तानें शिकलों, असें अवधूत सांगतो——

स्वे अवस्थितः आत्मा भेदेन न बुद्धयते—स्वरूपामध्यें स्थित असलेला आत्मा भेदानें प्रतीत होत नाहीं. **स्थूलमतिभिः व्यक्तिस्थः तद्गतः इव अर्कवत् लक्ष्यते**—पण स्थूलबुद्धि पुरुषांकडून उपाधीमध्यें प्रतिबिंबित झालेला आत्मा तिच्यांत प्रविष्ट झाल्यासारखा सूर्याप्रमाणें प्रतीत होतो. ५१.

सूर्यो थिल्लरामाजीं बिंबला । मूढ म्हणती थिल्लरीं बुडाला । त्याचेनि कंपें कंपु मानिला । डहुळें डहुळला म्हणती तो ॥ ३९ ॥ त्या थिल्लरातें नातळतां । गगनीं अलिप्त जेवीं सविता । तैसीच योगियांची योग्यता । देहातीतता देहकर्मीं ॥ ५४० ॥ त्यासी देहबुद्धीचेनि छंदें । म्हणती योगिया देहीं नांदे । त्या देहाचेनि नाना बाधें । स्वबुद्धिभेदें बांधिला म्हणती ॥ ४१ ॥ त्यासी न देहाचें बाधित भान । हें न कळे त्याचें गुह्यज्ञान । दोराचेनि सापें जाण । डसोनि कोण मारिला ॥ ४२ ॥ एवं आत्मा तो चिदाकाशीं । मिथ्या देहीं मिथ्यात्वेंसी । बिंबोनि दावी देहकर्मासी । नव्हे तें त्यासी बाधक ॥ ४३ ॥ देखे आपणातें जळीं बिंबला । परी न म्हणे मी जळीं बुडाला । तैसा देहातीतु झाला । नाहीं भ्याला देहकर्मा ॥ ४४ ॥ देखोनि मृगजळाचा पूरू । मूर्ख करूं धांवती तारूं । तैसा मिथ्या हा संसारू । भयंकरू मूर्खासी ॥ ४५ ॥ यालागीं दारागृहपुत्रप्राप्ती । तेथ न करावी अतिप्रीती । येचिविषयीं रायाप्रती । कथा कापोती सांगतु ॥ ४६ ॥

नातिस्नेहः प्रसङ्गो वा कर्तव्यः क्वापि केनचित् । कुर्वन्विन्देत सन्तापं कपोत इव दीनधीः ॥५२॥

संसारदुःखाचें मूळ । स्त्रीआसक्तीच जाण केवळ । स्त्रीलोभाचें जेथ प्रबळ बळ । दुःख सकळ त्यापासीं ॥ ४७ ॥ स्त्रीपासाव झाले पुत्र । त्यांचे ठायीं स्नेह विचित्र । करितां दुःखासी पात्र । संसारी नर होताती ॥ ४८ ॥ आसक्ति आणि स्नेहसूत्र । या दोन्हींपासाव दुःख विचित्र । पदोपदीं भोगिती नर । अस्वतंत्र होउनी ॥ ४९ ॥ यालागीं भलतेनी भलते ठायीं । आसक्ति स्नेहो न करावा पाहीं ।

डबक्यामध्यें सूर्याचें प्रतिबिंब पडतें, पण अज्ञजन तो सूर्य डबक्यांत बुडाला, असें म्हणतात. त्यांतील पाणी हाललें म्हणजे सूर्यच हालला असें ते समजतात व पाणी गढूळ झालें म्हणजे सूर्य अधुंक झाला असें मानितात. ३९ परंतु सूर्य त्या डबक्याला स्पर्शहि न करितां आकाशांत अलिप्त असतो, त्याचप्रमाणें योग्याची योग्यता आहे. तो देहकर्मांत असून देहातीत रहातो. ५४० योगीहि देहबुद्धीच्या नादानें देहांत नांदत असतो व देहाच्या विविध बंधनांनीं तो बांधला जातो, असें लोक स्वबुद्धिभेदानें म्हणतात, ४१ पण त्याला देहाचें भान बाधा करीत नाहीं. हें त्याचें गुह्यज्ञान लोकांना कळत नाहीं. दोरीच्या मिथ्या सापानें कधीं कोणाला दंश करून मारिलें आहे ! ४२ याचप्रमाणें आत्मा चिदाकाशांत असून मिथ्या देहांत मिथ्यारूपानेंच प्रतिबिंबित होऊन देहकर्में दाखवितो. त्यामुळें तें त्याला बाधक होत नाहीं.४३ आपलेंच प्रतिबिंब जलांत पडलेलें पाहून ' मी पाण्यांत बुडालों ' असें कोणी म्हणत नाहीं. त्याचप्रमाणें ' मी देहाहून भिन्न आहें ' असें ज्याला ज्ञान झालें तो देहकर्माला भीत नाहीं. ४४ मृगजलाचा पूर पाहून मूर्ख जसा जहाज बांधावयास धांवतो, तसाच हा मिथ्या संसार मूर्खाला भयंकर दिसतो, ४५ यास्तव स्त्री, पुत्र, गृह यांच्या प्राप्तीविषयीं अत्यंत आसक्ति केव्हांहि ठेवूं नये. याविषयीं अवधूत राजाला पारव्याची कथा सांगतो. ५४६.

—अवधूत कपोतापासून आपण काय शिकलों तें सांगतो—

केनचित् क्व अपि अतिस्नेहः प्रसंगः वा न कर्तव्यः—कोणीं केव्हांहि, कोठेंहि अतिप्रीति किंवा लालनादिकांविषयीं आसक्ति ठेवूं नये. कारण, कुर्वन् दीनधीः कपोतः इव सन्तापं विन्देत—विषयांमध्यें आसक्ति व स्नेह ठेवणारा मतिमंद पुरुष कपोताप्रमाणें दुःख भोगितो. ५२.

स्त्रीची आसक्तिच केवल संसारदुःखाचें मूळ आहे. ज्यांचा स्त्रीलोभ अत्यंत प्रबळ असतो, त्यांच्यापाशीं सर्व दुःख असतें. ४७ त्या स्त्रीपासून झालेल्या अपत्यांवर त्यांची विलक्षण ममता जडते व त्यामुळें संसारी लोक दुःखी होतात. ४८ आसक्ति व स्नेहपाश या दोहोंपासूनच मनुष्य पदोपदीं परतंत्र होऊन विलक्षण दुःख भोगीत असतो. ४९ यास्तव कोणीं कोणांवर आसक्ति किंवा स्नेह ठेवूं नये. ज्यानें अतिस्नेह ठेविला त्याला दुःख भोगावेंच

अतिस्नेहो मांडिजे जिहीं । दुःख तिहीं भोगिजे ।। ५५० ।। स्नेहदुःखाची वार्ता । कपोताकपोतीची कथा । तुज सांगेन नृपनाथा । स्वस्थचित्ता परियेसीं ।। ५१ ।।

कपोतः कश्चनारण्ये कृतनीडो वनस्पतौ । कपोत्या भार्यया सार्धमुवास कतिचित्समाः ।। ५३ ।।

कपोतीचें स्नेह गोड । धरोनि स्त्रीसुखाची चाड । वनीं वृक्ष पाहोनियां गूढ । करी नीड कपोता ।। ५२ ।। तेणें वनचरें वनस्थळीं । नीडामाजीं स्त्रीमेळीं । वासु केला बहुकाळीं । भार्येजवळी भूलला ।। ५३ ।।

कपोतौ स्नेहगुणितहृदयौ गृहधर्मिणौ । दृष्टिं दृष्टयाऽङ्गमङ्गेन बुद्धिं बुद्धया बबन्धतुः ।। ५४ ।।

कपोता आणि कपोती । परस्परें दोघां अतिप्रीती । स्नेहो वाढलासे चित्तीं । हृदयीं आसक्ती नीच नवी ।। ५४ ।। हावभाव विलासस्थिती । येरयेरांकडे पाहती । परस्परें कुरवाळिती । वोढंगिती येरयेरां ।। ५५ ।। येरयेरां वेगळें होणें । नाहीं जीवें अथवा मनें । दोघें वर्तती एके प्राणें । खाणें जेवणें एकत्र ।। ५६ ।।

शय्यासनाटनस्थानवार्ताक्रीडाशनादिकम् । मिथुनीभूय विस्रब्धौ चेरतुर्वनराजिषु ।। ५५ ।।

सेवितां ज्याची अतिगोडी । तें घालिती येरयेरांच्या तोंडीं । जीवेंप्राणें शिणोनि जोडी । तें दे आवडीं स्त्रियेसी ।। ५७ ।। स्त्रियेसी सांडूनि दुरीं । पाऊल न घाली बाहेरी । हात धरोनि परस्परीं ।

लागतें. ५५० हे राजा ! स्नेहामुळें दुःख कसें होतें, याविषयीं मी तुला एका पारव्याच्या जोडप्याची कथा सांगतों. ती स्वस्थचित्तानें ऐक. ५५१.

कपोताच्या दृष्टान्ताचा विस्तार करितात—

अरण्ये वनस्पतौ कृतनीडः कश्चन कपोतः—अरण्यांतील एका मोठ्या वृक्षावर ज्यानें आपलें घरटें केलें आहे असा एक कपोत, **कपोत्या भार्यया सार्धं कतिचित् समाः उवास**—आपल्या कपोती भार्येसह कित्येक वर्षें रहात होता. ५३.

एका पारव्याचें पारवीवर अत्यंत प्रेम होतें. त्यानें स्त्रीसुखाच्या लालसेनें वनांत एकांत प्रदेशीं एक वृक्ष पाहून त्यावर आपलें घरटें बांधिलें. ५२ आणि वनांत संचार करणाऱ्या त्या पारव्यानें भार्येवर लुब्ध होऊन त्या वनस्थ वृक्षावरील घरट्यांत तिच्यासह पुष्कळ काळ घालविला. ५५३.

—त्या उभयतांच्या स्नेहप्रसंगाचें पुढील तीन श्लोकांनीं वर्णन—

स्नेहगुणितहृदयौ गृहधर्मिणौ कपोतौ—स्नेहानें ज्यांचें मन परस्परांमध्यें आसक्त झालें आहे अशीं गृहस्थधर्मीनें वागणारीं तीं दोघें कपोत कपोती, **दृष्टया दृष्टिं अंगेन अंगं बुद्धया बुद्धिं बबन्धतुः**—परस्परांच्या दृष्टीनें दृष्टीला, अंगानें अंगाला व बुद्धीनें बुद्धीला बद्ध करतीं झालीं. ५४.

त्या कपोत-कपोतींचें एकमेकांवर अत्यंत प्रेम असल्यामुळें दिवसेंदिवस त्यांच्या मनांतील प्रीति वाढत गेली व अंतःकरणांत नित्य नवी आसक्ति उत्पन्न होऊं लागली. ५४ तीं दोघें हावभाव करून विलासानें परस्परांकडे पहात व प्रेमानें एकमेकाला कुरवाळीत, ५५ एकमेकांपासून जीवानें किंवा मनानेंहि वेगळीं होत नसत, खाणें, पिणें सर्व एकत्र. याप्रमाणें तीं दोघें एकजीव होऊन रहात होतीं. ५६.

वनराजिषु मिथुनीभूय शय्या-आसन-अटन-स्थान-वार्ता-क्रीडा-अशनादिकं विस्रब्धौ चेरतुः—तीं दोघें वनपंक्तीमध्यें परस्परांशीं अवियुक्त होऊन तीं निजणें, बसणें, फिरणें, उभें रहाणें, गोष्टी बोलणें, क्रीडा करणें व भोजनादि निःशंकपणें करीत असत. ५५.

तीं दोघें जें कांहीं खातांना गोड लागे तें परस्परांच्या तोंडांत घालीत असत. कपोत कष्ट करून थकून-भागून जें मिळवीत असें तें सर्व तो प्रेमानें स्त्रीला देत असे. ५७ तिला सोडून तो पाऊलहि टाकीत नसे.

आंतबाहेरी हिंडती ॥ ५८ ॥ सदा एकांतीं बसती । एकें स्थानीं दोघें असती । दोघें क्रीडाविहार करिती । खेळ खेळती विनोदें ॥ ५९ ॥ एकांतीं गोड बोली । सासुसासऱ्यांचा विकल्पु घाली । दिराभाव्यांच्या मोडी चाली । बोलाच्या भुलीं भुलवित ॥ ५६० ॥ एके आसनीं बैसती । येरयेरांतें टेंकती । एके शय्ये निद्रा करिती । अहोरातीं एकत्र ॥ ६१ ॥ मैथुनसुखाचेनि वैभवें । विश्वासोनि जीवेंभावें । हिताहित कांहीं नाठवे । गृहिणीगौरवें नाचतू ॥ ६२ ॥ खेंडकुलिया आराम । त्यामाजीं दोघां समागम । नाममात्रें गृहाश्रम । विषयसंभ्रम वनराजीं ॥ ६३ ॥

यं यं वाञ्छति सा राजंस्तर्पयन्त्यनुकम्पिता । तं तं समानयत्कामं कृच्छ्रेणाप्यजितेन्द्रियः ॥ ५६ ॥

जीवितापरीस समर्थ । जे जे मागे ते ते अर्थ । जीवेंप्राणें शिणोनि देत । काममोहित होऊनि ॥ ६४ ॥ जाणोनि जीवींचे खुणे । न मागतां अर्थ देणें । त्याही वरी जरी त्या मागणें । तरी विकूनि देणें आपणियातें ॥ ६५ ॥ धर्माची वेळ नाठवणें । दीनावरी दया नेणे । कृपा स्त्रियेवरी करणें । जीवेंप्राणें सर्वस्वें ॥ ६६ ॥ बैसली साकरेवरी माशी । मारितांही नुडे जैशी । तैसा भोगितां विषयांसी । जरामरणासी नाठवी ॥ ६७ ॥ जैसी पूर्वजांची भाक । पाळिती सत्यवादी लोक । तैसा स्त्रियेचेंचि सुख । पाळी देख सर्वस्वें ॥ ६८ ॥ जैसी आत्मउपासकासी । एकात्मता होय त्यासी । तैसें स्त्रीवांचोनि दृष्टीसी । जगीं आणिकासी न देखे ॥ ६९ ॥

कापोती प्रथमं गर्भं गृह्णती काल आगते । अण्डानि सुषुवे नीडे स्वपत्युः संनिधौ सती ॥ ५७ ॥

परस्परांच्या संगतींत तीं आंतबाहेर हिंडत होतीं. ५८ तीं नेहमीं एकांतांत बसत. दोघेंहि एकाच ठिकाणीं असत. ५९ तीं नानाप्रकारच्या क्रीडा व अनेक प्रकारें विहार करीत असत आणि विनोदानें खेळ खेळत असत. कपोती एकान्तांत पतीशीं गोड भाषण करीत असे. त्याच्या मनांत सासु-सासऱ्यांविषयीं विकल्प उत्पन्न करून, दीर-जावांच्या रीती मोडून टाकून, आपल्या लाडकी भाषणानें त्याला भुरळ घालीत असे. ५६० तीं एकाच आसनावर बसत असत. परस्परांना टेंकत असत व एका शय्येवर निजत असत. याप्रमाणें अहोरात्र तीं एकत्र रहात असत. ६१ केवळ स्त्रीसंगसौख्यांतच तो धुंद झाला होता. त्याला हितअहित कांहींच कळेनासें झालें. गृहिणीचा गौरव करण्यासाठीं तो नाचत असे. ६२ उपवनांत आनन्दानें त्यांचा समागम होत असे. त्यांचें घरटें केवळ नांवालाच होतें. त्यांचे सर्व विषयविलास वनांत होत असत. ५६३.

राजन्--हे राजा ! तर्पयन्ती अत: एव अनुकंपिता सा यं यं कामं वांछति--विलासयुक्त हास्य, कटाक्ष, मधुर भाषण इत्यादिकांनीं आपल्या प्रियाला संतुष्ट करणारी व त्यामुळेंच त्याच्याकडून अनुकंपा केली गेलेली ती कपोती ज्या ज्या विषयाची इच्छा करीत असे, तं तं कृच्छ्रेणापि अजितेन्द्रियः समानयत्--तो तो विषय मोठे कष्ट सोसूनहि तो विषयासक्त कपोत तिला आणून देत असे. ५६.

जीवापेक्षांहि अधिक अशी जी जी वस्तु ती मागत असे, ती ती वस्तु जीवापाड श्रम करून तो केवळ काम-मोहित होऊन तिला देत असे. ६४ तिच्या मनांतील इंगित जाणून तिनें न मागतांच ती वस्तु तिला तो आणून देत असे. त्याहूनहि अधिक तिनें कांहीं मागितल्यास स्वतःचा जीव गहाण टाकून तो तिची इच्छा पुरवीत असे. ६५ त्याला धर्माची वेळ कधीं आठवली नाहीं. गरिबाची दया कधीं ठाऊक नाहीं. जीवाभावानें सर्वथा केवळ एक स्त्रीवर कृपा करावी, इतकेंच त्याला माहित होतें. ६६ साखरेवर बसलेली माशी जशी मारलें तरी उडून जात नाहीं, त्याप्रमाणें विषयभोगापुढें त्याला जन्ममरणांचेंहि स्मरण रहात नसे. ६७ ज्याप्रमाणें सत्यवादीलोक आपल्या वाडवडिलांचें वचन पाळितात, त्याप्रमाणें तो स्त्रीचा संतोष सर्वस्वानें राखीत असे. ६८ आत्मोपासकाला सर्वत्र एकरूप आत्माच जसा दिसतो त्याप्रमाणें त्याच्या दृष्टीला या जगांत स्त्रीवांचून दुसरें कांहीं दिसत नसे. ५६९.

प्रथमं गर्भं गृह्णती कपोती--प्रथम गर्भाचें धारण करणारी कपोती, काले आगते--प्रसूति काल आला असतां, सती नीडे स्वपत्युः संनिधौ अण्डानि सुषुवे--ती साध्वी आपल्या घरट्यांत पतीच्या संनिध अंडीं प्रसवली. ५७.

आधींचि प्रिया पढियंती । तेही झाली गर्भवती । जैसी लोभ्याचिये हातीं । सांपडे अवचितीं धनलोहे ।। ५७० ।। तैसें तिच्या गर्भाचें कोड । अधिकाधिक वाढवी गोड । जैसें मदिरा पिऊनि माकड । नाचे तडतड डुल्लतु ।। ७१ ।। तैसे गर्भाचे सोहळे । सर्वस्वें पुरवी डोहळे । तिचे लीलेमाजीं खेळे । प्राप्तकाळें प्रसूती ।। ७२ ।। स्वनीडाआंतौतीं । जाहली अंडातें प्रसवती । प्रसूतिवाधावा सांगती । ऐकोनि पति उल्हासे ।। ७३ ।।

तेषु काले व्यजायन्त रचितावयवा हरेः । शक्तिभिर्दुर्विभाव्याभिः कोमलाङ्गतनूरुहाः ।। ५८ ।।

अघटित घटी हरीची माया । अलक्ष लक्षेना ब्रह्मया । अवेव अंडांमाजीं तयां । देवमाया रचियेले ।। ७४ ।। रसें भरलीं होतीं अंडें । त्यांमाजीं नख पक्ष चांचुवडें । उघडिलीं डोळ्यांचीं कवाडें । करी कोडें हरिमाया ।। ७५ ।। अंडें उलोनि आपण । कोंवळीं पिलीं निघालीं जाण । पितरें दृष्टीं देखोन । जीवेंप्राणें भुललीं ।। ७६ ।।

प्रजाः पुपुषतुः प्रीतौ दम्पती पुत्रवत्सलौ । शृण्वन्तौ कूजितं तासां निर्वृतौ कलभाषितैः ।। ५९ ।।

अत्यंत कोंवळीं बाळें । दोघें जणें पुत्रवत्सलें । शांतविती मंजुळें । अतिस्नेहाळें प्रजांसी ।। ७७ ।। जे समयीं जैसें लक्षण । तैसें प्रजांचें पोषण । अंगें करिताती आपण । दोघें जण मिळोनी ।। ७८ ।। गोड गोजिरे बोल । ऐकोनि दोघां येती डोल । धांवोनियां वेळोवेळ । निंबलोण उतरिती ।। ७९ ।।

तासां पतत्रैः सुस्पर्शैः कूजितैर्मुग्धचेष्टितैः । प्रत्युद्गमैरदीनानां पितरौ मुदमापतुः ।। ६० ।।

आधींच आवडती बायको व त्यांत ती गर्भवती झाली. मग काय विचारतां! लोभ्याच्या हातीं जसा अवचित द्रव्याचा ठेवा सांपडावा तशी त्याची स्थिति झाली. ५७० तिचे डोहाळे अधिक अधिक वाढूं लागले, तेव्हां मद्य पिऊन माकड जसें टणाटण उड्या मारून नाचूं लागतें, ७१ त्याप्रमाणें त्यानें तिच्या गर्भाचे सोहळे करून सर्वस्व खर्च करून डोहाळे पुरविले. प्रसूतिकाल येईपर्यंत तो तिचें रंजन करीत तिच्याशीं खेळत बसला. ७२ ती आपल्या प्रसूतीचा काळ आला असतां घरट्यांत अंडीं प्रसवली. ती प्रसूत झाल्याची वार्ता ऐकून पतीला फार उल्हास वाटला. ५७३.

तेषु—जलानें भरलेल्या त्या अंड्यामध्यें, काले—योग्य काल गेला असतां, हरेः दुर्विभाव्याभिः शक्तिभिः रचितावयवाः कोमलाङ्गतनूरुहाः व्यजायन्त—हरीच्या अचिंत्य स्वभावकर्मादिशक्तींनीं ज्यांचे अवयव तयार झाले आहेत व ज्यांचीं अंगें व केंस कोमल आहेत असे पक्षी उत्पन्न झाले. ५८.

हरीची माया अघटित आहे. ती अगम्य असल्यामुळें ब्रह्मदेवालाहि कळत नाहीं. त्याच देवमायेनें त्या अंड्यांमध्यें अवयव रचिले. ७४ जीं अंडीं रसानें भरलेलीं होतीं, ७५ त्यांत हरीच्या मायेनें नख, पंख, चोंच, डोळ्यांच्या पापण्या उत्पन्न करून मोठा चमत्कार दाखविला. तीं अंडीं आपणच फुटून त्यांतून कोमल पिलें बाहेर पडलीं. तीं दृष्टीस पडतांच मातापित्यांचा जीव अगदीं भाळून गेला. ५७६.

पुत्रवत्सलौ प्रीतौ दम्पती—पुत्रांवर प्रेम करणारें व संतुष्ट झालेलें तें कपोतांचें दाम्पत्य, प्रजाः पुपुषतुः—आपल्या अपत्यांचें पोषण करितें झालें, तासां कूजितं शृण्वन्तौ कलभाषितैः निर्वृतौ—त्यांचें कूजन ऐकणारीं तीं दोघें मधुर भाषणांनीं अतिशय सुखी होत. ५९.

तीं पिलें कोमल होतीं. अपत्यवात्सल्यानें तीं दोघें मंजुळ स्वरानें पिलांचें सांत्वन करीत असत. ७७ ज्या ज्या वेळीं जें जें योग्य असेल त्यांनीं तीं दोघें त्यांचें पोषण करीत असत. ७८ त्यांचे बोबडे मंजुळ बोल ऐकून तीं दोघें आनंदानें डुलत असत आणि वरचेवर त्यांच्यावरून लिंबलोण उतरून टाकीत. ५७९.

अदीनानां तासां—अतिशय आनंदित झालेल्या त्या अपत्यांच्या, सुस्पर्शैः पतत्रैः कूजितैः मुग्धचेष्टितैः प्रत्युद्गमैः—ज्यांचा स्पर्श अतिशय सुखावह आहे अशा पंखांनीं, मंजुळ शब्दांनीं, मनोहर लीलांनीं त्यांच्यासमोर येण्यानें, पितरौ मुदं आपतुः—त्यांच्या आई-बापांना अतिशय आनंद होत असे. ६०.

त्यांचेनि आलिंगनचुंबनें । मृदु मंजुळ कल भाषणें । दों पक्षांचेनि स्पर्शनें । दोघें जणें निवताती ॥५८०॥ माता पिता दोघें बैसती । सन्मुख अपत्यें धांवती । लोल वक्र चोंचगती । वेगें दाविती येरयेरां ॥ ८१ ॥ मग देखोनियां खेवे । दुरी जाती मुग्धभावें । तेथूनि घेऊनियां धांवे । वेगें यावें तयापासीं ॥ ८२ ॥ मायबापांच्या पाखोव्यापासीं । हीनदीनता नाहीं बाळांसी । जे जन्मोनि त्यांचे कुशीं । त्या दोघांसी सभाग्यता ॥ ८३ ॥ लाडिकीं लडिवाळ बाळें । लाडेंकोडें पुरविती लळे । देखोनि निवती दिठी डोळे । स्नेह आगळें येरयेरां ॥ ८४ ॥ ऐसीं खेळतां देखोनि बाळें । दोघें धांवती एक वेळे । उचलूनियां स्नेहबळें । मुख कोवळें चुंबिती ॥ ८५ ॥

स्नेहानुबद्धहृदयावन्योन्यं विष्णुमायया । विमोहितौ दीनधियौ शिशून्पुपुषतुः प्रजाः ॥ ६१ ॥

अजाची जे अजा माया । त्या कैसी भुलवी राया । अन्योन्यस्नेह बांधोनि हृदया । पिलीं पोसावया उद्यत ॥ ८६ ॥ स्त्रीपुत्रांचा मोह गहन । त्यांचें करावया पोषण । चिंतातुर अतिदीन । करी भ्रमण अन्नार्थ ॥ ८७ ॥

एकदा जग्मतुस्तासामन्नार्थौ तौ कुटुम्बिनौ । परितः कानने तस्मिन्नर्थिनौ चेरतुश्चिरम् ॥ ६२ ॥

एवं टणकीं जालीं बाळें । कुटुंब थोर थोरावलें । अन्न बहुसाल पाहिजे झालें । दोघें विव्हळें गृहधर्में ॥ ८८ ॥ यापरी कुटुंबवत्सलें । पुत्रस्नेहें स्नेहाळें । दोघें जणें एके वेळे । अन्न बहुकाळें अर्थिती ॥ ८९ ॥ सहसा मिळेना अन्न । यालागीं हिंडती वनोपवन । बहुसाल श्रमतांही जाण । पूर्ण

त्या पिलांचें आलिंगन, चुंबन, मधुर बोबडे बोल, दोन्ही मऊ पंखांचा स्पर्श, यांच्या योगानें तीं उभयतां तृप्त होत असत. ५८० माता व पिता अशीं दोघें बसलीं असतां तीं पिलें त्यांच्यापुढें धांवत येत व चोंचींत चोंच घालून एकमेकांवर प्रेम दाखवीत. ८१ आणि आलिंगून, बालिशपणानें दूर जात, पुनः तेथून धांवत येऊन पुनः त्यांच्यापाशीं धांवत येत असत. ८२ आई-बापांच्या आश्रयाखालीं वाढणाऱ्या मुलांना कधीं हीनदीनपणा नसतो. अशीं मुलें आपल्या पोटीं आलीं म्हणून त्यांना मोठी धन्यता वाटत असते. ८३ तीं पिलें त्यांचीं फार लाडकीं असल्यामुळें तीं त्यांचें कोडकौतुक मोठ्या प्रेमानें पुरवीत असत. त्यांना पाहून त्यांच्या डोळ्यांचें पारणें फिटत असे. परस्परांवर त्यांचें अधिक प्रेम होतें. ८४ तीं पिलें खेळत असलेलीं पाहून तीं उभयतां एकाच वेळीं धांवून जात व प्रेमभरानें त्यांना उचलून घेऊन त्यांच्या कोमल मुखांचें चुंबन घेत असत. ५८५.

विष्णुमायया अन्योन्यं स्नेहानुबद्धहृदयौ–भगवान् विष्णूच्या मायेनें परस्परांच्या ठिकाणीं ज्यांचें मन प्रेमानें आसक्त झालें आहे व, विमोहितौ दीनधियौ–ज्यांची बुद्धि अत्यंत दीन व मोहित झाली आहे अशीं तीं दोघें, शिशून् प्रजाः पुपुषतुः–आपल्या बालपुत्रांचें पोषण करूं लागलीं. ६१.

हे राजा ! अज परमात्म्याची ती जन्मरहित माया त्या दोघांना कशी भुलवीत होती, पहा ! अंतःकरणांतील परस्परांवरील प्रेमबंधनानें तीं दोघें त्या पिलांचें पोषण करण्यांत तत्पर असत. ८६ स्त्री व अपत्यें यांवरील ममता मोठी विलक्षण आहे. त्यांचें पोषण करण्यासाठीं चिंताक्रांत व अतिदीन होऊन कपोत अन्नासाठीं दाही दिशांमध्यें भ्रमण करीत असे. ५८७.

एकदा तौ कुटुम्बिनौ तासां अन्नार्थौ जग्मतुः–एकदां तीं दोघें कुटुंबीं त्या पुत्रांच्या अन्नासाठीं बाहेर गेलीं. अर्थिनौ तौ तस्मिन् कानने चिरं परितः चेरतुः–आणि अन्नाची इच्छा करणारीं तीं दोघें त्या अरण्यांत दीर्घकाल सर्वत्र फिरलीं. ६२.

याप्रकारें तीं पिलें मोठीं बळकट झालीं. कुटुंब जसें वाढत चाललें तसें अन्नाहि पुष्कळ लागूं लागलें. तेव्हां तीं दोघें प्रपंचाच्या काळजींत चूर झालीं. ८८ अशा रीतीनें कुटुंबवत्सलतेनें व पुत्रस्नेहानें तीं दोघेंहि पुष्कळ वेळ बाहेर राहून, अन्न मिळवून आणूं लागलीं. ८९ सहज अन्न मिळेना, तेव्हां तीं रानोरान हिंडून अविश्रांत श्रम

पोषण मिळेना ॥५९०॥ बहुसाल मेळवूनि चारा । दोघें जणें जाऊं घरा । मग आपुल्या लेंकुरां । नाना उपचारां प्रतिपाळूं ॥ ९१ ॥ ऐसऐसिया वासना । मेळवावया अन्ना । दोघें जणें नाना स्थानां । वना उपवना हिंडती ॥ ९२ ॥

दृष्ट्वा तान् लुब्धकः कश्चिद्यदृच्छातो वनेचरः । जगृहे जालमातत्य चरतः स्वालयान्तिके ॥ ६३ ॥

माता पिता गेलीं दुरी । उडतीं पिलें नीडाभीतरीं । क्षुधेनें पीडिलीं भारी । निघालीं बाहेरीं अदृष्टें ॥ ९३ ॥ ते वनीं कोणी एक लुब्धक । पक्षिबंधनीं अतिसाधक । तेणें ते कपोतबाळक । अदृष्टें देख देखिले ॥ ९४ ॥ तेणें पसरोनियां काळजाळें । पाशीं बांधिलीं तीं बाळें । कपोतकपोतींचे वेळे । राखत केवळ राहिला ॥ ९५ ॥

कपोतश्च कपोती च प्रजापोषे सदोत्सुकौ । गतौ पोषणमादाय स्वनीडमुपजग्मतुः ॥ ६४ ॥

बाळकांच्या अतिप्रीतीं । कपोता आणि कपोती । चारा घेऊनि येती । नीडाप्रति लवलाहें ॥ ९६ ॥ स्त्रीसुखाची आसक्ती । तेचि वाढत्या दुःखाची सूती । स्त्रीसंगें दुःखप्राप्ती । सांगों किती अनिवार ॥ ९७ ॥ पुरुषासी द्यावया दुःख । स्त्रीसंगुचि आवश्यक । पुत्रपौत्रद्वारा देख । नानादुःख भोगवी ॥ ९८ ॥

कपोती स्वात्मजान्वीक्ष्य बालकान् जालसंवृतान् । तानभ्यधावत्क्रोशन्ती क्रोशतो भृशदुःखिता ॥ ६५ ॥

करूं लागलीं. तरीहि पुरेसें भक्ष्य मिळेना. ५९० 'पुष्कळसा चारा मिळवून आपल्या घरट्यांत जाऊं व आपल्या पिलांना तें भक्ष्य देऊन त्यांचें अनेक प्रकारें पोषण करूं' ९१ अशा मनोराज्यानें अन्न मिळविण्यासाठीं तीं दोघें अनेक ठिकाणीं, वनांत व उपवनांत हिंडत असत. ५९२.

वनेचरः कश्चित् लुब्धकः—तेव्हां वनामध्यें संचार करणाऱ्या एका लुब्धकानें, यदृच्छातः स्वालयान्तिके चरतः तान् दृष्ट्वा—भवितव्यतेनें आपल्या घरट्याजवळ फिरणाऱ्या त्या कपोत बालकांस पाहून, जालं आतत्य जगृहे—आपलें जाळें पसरून त्यांत धरिलें. ६३.

याप्रमाणें माता-पिता दूर गेलीं असतां एकदां तीं पिलें भुकेनें व्याकुळ होऊन दैवयोगानें आपल्या घरट्यांतून बाहेर पडलीं. ९३ त्या वनांत कोणी एक पक्षी धरण्यांत निष्णात असलेला पारधी आला. त्यानें हीं कपोताचीं पिलें अकस्मात् पाहिलीं. ९४ त्याबरोबर त्यानें आपलें काळजाळें पसरून तीं पिलें फांसांत अडकविलीं व तो कपोत-कपोतीची वाट पहात बसला. ५९५.

कपोतः च कपोती च प्रजापोषे सदा उत्सुकौ गतौ—तो कपोत आणि ती कपोती अशीं तीं दोघें आपल्या अपत्यांचें पोषण करण्याविषयीं सर्वदा उत्सुक होऊन भक्ष्य आणण्यासाठीं जीं गेलीं होतीं तीं, पोषणं आदाय स्वनीडं उपजग्मतुः—भक्ष्य घेऊन आपल्या घरट्याजवळ आलीं. ६४.

पिलांवरील उत्कट प्रेमामुळें कपोत-कपोती चारा घेऊन लौकरच घरट्याकडे आलीं. ९६ स्त्रीसुखाची आसक्ति हेंच वाढत्या दुःखाचें मूळ आहे. स्त्रीसंगानें केवढें अनिवार दुःख भोगावें लागतें, तें काय सांगावें! ९७ पुरुषाला दुःख द्यावयास स्त्रीसंगच कारण आहे. त्यामुळें पुत्र, नातु इत्यादिकांच्या द्वारां त्याला नानाप्रकारचीं दुःखें भोगावीं लागतात. ५९८.

कपोती जालसंवृतान् क्रोशतः तान् स्वात्मजान् बालकान् वीक्ष्य—तेव्हां कपोती जाळयांत बद्ध झालेल्या व आक्रोश करीत असलेल्या त्या आपल्या पोटच्या पिलांना पाहून, भृशदुःखिता क्रोशन्ती अभ्यधावत्—अतिशय दुःखित होऊन आक्रोश करीत त्यांच्याकडे धांवली. ६५.

तंव काळजाळीं एके वेळे । कपोती बांधलीं देखे बाळें । तोंड घेऊनि पिटी कपाळें । आक्रोशें लोळे दुःखित ॥ ९९ ॥ बाळें चरफडितां देखे जाळीं । आक्रंदोनि दे आरोळी । बाळांसन्मुख धांवे वेळोवेळीं । दुःखें तळमळी दुःखित ॥ ६०० ॥

साऽसकृत्स्नेहगुणिता दीनचित्ताऽजमायया । स्वयं चाबध्यत शिचा बद्धान्पश्यन्त्यपस्मृतिः ॥६६॥

दुःख द्यावया भ्रतारासी । आक्रंदें कपोती चालिली कैसी । शतगुणें स्नेहो वाढला तिसी । मृतपुत्रांसी देखोनी ॥ १ ॥ पुत्रस्नेहें केलें वेडें । गुण आठआठवूनि रडे । हिताहित न देखे पुढें । बळेंचि पडे जाळांतु ॥ २ ॥ मायामोहें भुलली कैसी । जेथ बांधलें देखे पुत्रांसी । ते जाळीं घाली आपणासी । मोहें पिशी ते केली ॥ ३ ॥

कपोतश्चात्मजान् बद्धानात्मनोऽप्यधिकान्प्रियान् । भार्यां चात्मसमां दीनां विललापातिदुःखितः ॥ ६७ ॥

अंतरला स्त्रीबाळकीं । कपोता तो एकाएकीं । रुदन करी अधोमुखीं । अतिदुःखीं विलपतु ॥ ४ ॥ जीवाहोनि प्रिय अधिकें । तीं निर्जीव देखिलीं बाळकें । अनुकूल अनुरूपकें । भार्या देखे अंतरली ॥ ५ ॥

अहो मे पश्यतापायमल्पपुण्यस्य दुर्मतेः । अतृप्तस्याकृतार्थस्य गृहस्त्रैवर्गिको हतः ॥ ६८ ॥

तेव्हां कपोतीनें आपलीं पिलें काळरूपी जाळ्यांत अडकलेलीं पाहून ती ओरडून कपाळ आपटूं लागली, आक्रोश करून गडबडां लोळूं लागली. ९९ जाळ्यांत आपलीं बाळें तडफडत आहेत हें पाहून मोठ्यानें ओरडून त्यांना हांका मारून आकांत करूं लागली. बाळांच्या जवळ वरचेवर धावूं लागली व दुःखानें विव्हळ होऊन तळमळूं लागली. ६००.

असकृत्स्नेहगुणिता दीनचित्ता सा अजमायया अपस्मृतिः शिचा बद्धान् पश्यती स्वयं च अबध्यत— चिरस्नेहानें बद्ध झालेली व त्यामुळें जिचें चित्त दीन झालें आहे, अशी ती कपोती भगवानाच्या मायेनें देहाचेंहि भान विसरून आपलीं पिलें जाळ्यांत अडकून पडलीं आहेत असें पहात असूनहि स्वतः त्या जाळ्यांत बद्ध झाली. ६६.

आपल्या मृतपुत्रांना पाहून तिचें अंतःकरण शतधा प्रेमानें भरून आलें. भ्रताराला दुःखित करण्यासाठीं ती कपोती आपल्या पिलांकडेच कशी चालली पहा ! १ पुत्रस्नेहानें तिला वेडें केलें. त्यांचे गुण आठवून ती रडूं लागली. शोकभरानें तीहि स्वतःचें हिताहित न पहातां त्या जाळ्यांत जाऊन पडली. २ मायामोह कशी भुरळ पाडतो, पहा ! जेथें पिलें काळरूपी पाशानें जखडलीं होतीं, त्याच जाळ्यांत तिनें स्वतःलाहि अडकवून घेतलें. मोहानें तिला वेडें करून सोडिलें. ६०३.

कपोतः च आत्मनः अपि अधिकान् प्रियान् आत्मजान् बद्धान्—आणि कपोत स्वतःहूनहि अधिक प्रिय असलेल्या, जाळ्यांत बद्ध झालेल्या अपत्यांना, आत्मसमां भार्यां च—व आपल्या अनुरूप अशा जालबद्ध भार्येला उद्देशून, दीनः अतिदुःखितः विललाप—दीन व अति दुःखी होत्साता विलाप करूं लागला. ६७.

याप्रमाणें स्त्री-पुत्रांना मुकलेला तो कपोत एकटाच राहिला. तो अधोमुख होऊन रडूं लागला व अतिशय दुःखानें विलाप करूं लागला. ४ प्राणाहूनहि प्रिय असलेलीं तीं पिलें गतप्राण होऊन पडलेलीं त्यानें पाहिलीं व अनुकूल आणि अनुरूप अशी भार्याहि अंतरलेली त्यानें पाहिली. ६०५.

—अवधूत तो विलापच सांगतो—

अहो मे अपायं पश्यत—अहो, माझा हा नाश कसा झाला पहा ! अल्पपुण्यस्य दुर्मतेः अतृप्तस्य अकृतार्थस्य गृहः त्रैवर्गिकः हतः—ज्याचें पुण्य अल्प आहे, बुद्धि मूढ आहे, ऐहिक सुखाविषयीं जो अतृप्त आहे, आणि अदृष्ट सुखहि ज्यानें संपादन केलेलें नाहीं अशा माझ्या गृहस्थाश्रमांतील धर्म, अर्थ आणि काम या तिन्ही पुरुषार्थांचा घात झाला आहे. ६८.

धर्म अर्थ आणि काम । या तिहींचा आश्रयो गृहाश्रम । तो भंगला मी अनाश्रम । अतृप्त काम सांडूनी ॥ ६ ॥ पूर्वपापाचा आवर्तु । मज सांडूनि आकृतार्थु । माझा कामु नव्हतां तृप्तु । धर्मकामार्थु भंगला ॥ ७ ॥ गृहीं त्रैवर्गुचि भंगला । चौथा पुरुषार्थ असे उरला । तो साधूनि घेवों वहिला । आश्रमू भंगल्या क्षिती काय ॥ ८ ॥ ऐसें म्हणसी जरी निगुतीं । ये अर्थी मानी दुर्मती । विषयवासना नोसंडिती । कैसेनि मुक्ति लाधेल ॥ ९ ॥ म्यां पूर्वी अल्प पुण्य होतें केलें । यालागीं अंतरायीं घर घेतलें । माझें परलोकसाधन ठेलें । विधुर केलें मजलागीं ॥ ६१० ॥ हो कां गृहीं असतां गृहस्थां । काय परलोक साधे समस्तां । इतरांची असो कथा । मज साधनता तंव होती ॥ ११ ॥

अनुरूपानुकूला च यस्य मे पतिदेवता । शून्ये गृहे मां संत्यज्य पुत्रैः स्वर्याति साधुभिः ॥ ६९ ॥

स्त्रीपुरुषांची चित्तवृत्ती । अनुकूल वर्ते धर्मप्रवृत्तीं । तरीच परलोक साधिती । इतरां प्राप्ती तें नाहीं ॥ १२ ॥ एकांच्या भार्या त्या तोंडाळा । एकांच्या त्या बहु बोढाळा । एकांच्या त्या अतिचांडाळा । एकी दुःशीला दुर्भगा ॥ १३ ॥ एकीचा तो क्रोधु गाढा । एकी अत्यंत खादाडा । एकी सोलिती दांत दाढा । आरिसा पुढां मांडूनि ॥ १४ ॥ एकी बोंगळा आळसिणी । एकी त्या महाडाकिनी । एकी सुकुमारा विलासिनी । बरवेपणीं गर्वित ॥ १५ ॥ तैशी नव्हे माझी पत्नी । सदा अनुकूळ मजलागुनी । मजसीं वर्ते अनुरूपपणीं । धर्मपत्नी धार्मिक ॥ १६ ॥ मी जेव्हां धर्मीं तत्पर । तेव्हां धर्मासी ते अतिसादर । मज कामीं जेव्हां आदर । तेव्हां ते कामचतुर कामिनी ॥ १७ ॥ मजवांचोनी तत्त्वतां । न भजे आणिकां देवां देवतां । मज सांडूनि न वचे तीर्था । माझें वचन सर्वथा नुल्लंघी ॥ १८ ॥ एवं रूपगुणकुलशील । मजसी सदा अनुकूल । पति-

---

धर्म, अर्थ व काम या तिहींचा आश्रय गृहस्थाश्रम आहे. तो मोडला. माझ्या सर्व इच्छा पूर्ण न होतांच मी आश्रमहीन झालों. (असें तो कपोत म्हणूं लागला.) माझी इच्छा अतृप्त असतांच, ६ मी कृतार्थ होण्यापूर्वीच पूर्वजन्मींच्या पापरूपी भोंवऱ्यानें माझ्या धर्म-अर्थ-कामांचा भंग केला. ७ गृहस्थाश्रमांतील तीन पुरुषार्थांना तर मी आंचवलोंच, पण आतां चौथा पुरुषार्थ उरला आहे. तो मोक्ष तरी साधून घ्यावा, आश्रमभंगाची काय मोठी पर्वा ! ८ असें जर म्हणाल तर मी मूढमति आहें. मला विषयवासना सोडीत नाहींत. मग मुक्ति कशी साधणार ! ९ मीं पूर्वजन्मीं अगदीं अल्प पुण्य आचरिलें होतें, म्हणून काळानें माझें गृहच नाहींसें केलें. मला स्त्री-पुत्रविहीन विधुर केल्यामुळें माझें परलोकीचें साधनहि गेलें. ६१० ' गृहस्थाश्रमांत असलेल्या सर्वच गृहस्थांना काय परलोक साधतो ! ' असें जर म्हणाल, तर इतरांची गोष्ट राहो. मला मात्र तें साधन यावेळीं होतें. ६११.

यस्य मे अनुरूपा अनुकूला पतिदेवता च—ज्या माझी अनुरूप, अनुकूल व पतिव्रता भार्या होती, **मां शून्ये गृहे संत्यज्य**—ती मला या शून्य गृहांत टाकून, **साधुभिः पुत्रैः स्वर्याति**—उत्तम पुत्रांसह स्वर्गाला जात आहे. ६९.

स्त्री–पुरुषांची मनोवृत्ति परस्परांस अनुकुल असून त्यांची धर्माकडे जर प्रवृत्ति असेल तरच त्यांना परलोक साधतां येईल. इतरांना तो प्राप्त होत नाहीं. १२ कोणाची भार्या तोंडाळ असते, कोणाची आळशी असते, कोणाची अत्यंत लोभी, कोणाची अतिशय दुष्ट, शीलभ्रष्ट, तर कोणाची कजाग असते. १३ एखादी अत्यंत क्रोधी तर कोणी अति खादाड असते. कोणी आरसा पुढें ठेवून दांत विचकित बसते, १४ तर कांहीं अति गलिच्छ, आळशी व महा कैदाशिणी असतात. एखादी नाजुक, विलासी व आपल्या सौंदर्याच्या गर्वांतच असते. १५ माझी स्त्री मात्र अशांपैकीं नव्हती. ती नेहमीं मला अनुकूल असे. ती माझी धर्मपत्नी धार्मिक होती व माझ्या इच्छेप्रमाणें वागत असे. १६ मी जेव्हां धर्मकार्यांत प्रवृत्त होत असें, तेव्हां ती मोठ्या भक्तिभावानें मला साह्य करण्यास तत्पर असे माझी कोणतीहि इच्छा पूर्ण करण्यास ती सर्वदा तत्पर असे. १७ माझ्यावांचून कोणत्याहि देवांना किंवा देवतांना ती भजत नसे. मला सोडून कधीं तीर्थाला जात नसे. माझ्या शब्दाचें उल्लंघन करीत

व्रता जे केवळ । पत्नी निर्मळ पैं माझी ॥ १९ ॥ मज सांडूनि शून्यगृहीं । पुत्रेंसहित साध्वी पाहीं । जातसे स्वर्गाच्या ठायीं । मज अपायीं घालूनी ॥ ६२० ॥

सोऽहं शून्ये गृहे दीनो मृतदारो मृतप्रजाः । जिजीविषे किमर्थं वा विधुरो दुःखजीवितः ॥ ७० ॥

नाशिली स्त्री नाशिल्या प्रजा । येथ म्यां रहावें कवण्या काजा । दुःखें प्राण जाईल माझा । लोकलाजा निंदित ॥ २१ ॥ येवढें अंगीं बाजलें दुःख । काय लौकिकीं दाखवूं मुख । भंगलें संसाराचें सुख । जितां मूर्ख म्हणतील ॥ २२ ॥ जळो विधुराचें जिणें । सदा निंद्य लाजिरवाणें । न ये श्राद्धींचें अवतणें । सदा वसणें एकाकी ॥ २३ ॥ ऐसेनि वसतां ये लोकीं । शून्य गृहीं एकाकी । धड गोड न मिळे मुखीं । परम दुःखी मी होईन ॥ २४ ॥

तांस्तथैवावृतान् शिग्भिर्मृत्युग्रस्तान्विचेष्टतः । स्वयं च कृपणः शिक्षु पश्यन्नप्यबुधोऽपतत् ॥ ७१ ॥

ऐसें बोलोनि केलें काये । मृतस्त्रीपुत्रांकडे पाहे । काळपाशीं बांधिलीं आहे । चेष्टा राहे निःशेष ॥ २५ ॥ ऐसें देखतांही अबुद्धी । विवेकें न धरीचि बुद्धी । आपण जाऊनि त्रिशुद्धी । जाळामध्यें पडियेला ॥ २६ ॥ मेल्यामागें मरणें । देखों हेंचि सर्वांसी करणें । परी जन्ममृत्यु निवारणें । हा स्वार्थु कवणें न धरिजे ॥ २७ ॥ पहा पां स्त्रीपुत्रांकारणें । आपुलाही जीवु देणें । परी भगवत्पदवी साधणें । हें न मने मनें सर्वथा ॥ २८ ॥

तं लब्ध्वा लुब्धकः क्रूरः कपोतं गृहमेधिनम् । कपोतकान्कपोतीं च सिद्धार्थः प्रययौ गृहम् ॥ ७२ ॥

नसे. १८ अशी रूप-गुण-कुल-शीलसंपन्न, सदा मला अनुकूल असणारी, पतिव्रता, अशी माझी निष्कलंक साध्वी पत्नी १९ मला या शून्यगृहांत सोडून पुत्रांसह स्वर्गी चालली व तिनें मला या आपत्तींत टाकिलें. ६२०.

सः अहं दीनः मृतदारः मृतप्रजाः विधुरः दुःखजीवितः—तो मी दीन, ज्याची पत्नी मेली आहे व पुत्र मेले आहेत, त्यामुळें जो विधुर व ज्याचें जीवित दुःखमय झालें आहे असा होत्साता, शून्ये गृहे किमर्थं वा जिजीविषे—शून्य गृहांत कशासाठीं जिवंत रहाण्याची इच्छा करूं ! ७०.

स्त्री गेली, पुत्रांचा नाश झाला, आतां मी येथें कशाला राहूं ! माझा दुःखानें प्राणच जाईल. २१ माझ्यावर एवढें मोठें दुःख कोसळलें असतां मी लोकांना तोंड कसें दाखवूं ! सर्व संसारसुखाचा नाश झाला. अशा स्थितींत जगलों तर लोक मला मूर्खच म्हणतील. २२ जळो तें विधुराचें जीवित. तें सदा निंद्य व लाजिरवाणें आहे. कधीं श्राद्धाचें बोलावणें कोणी करीत नाहीं. सर्वकाळ एकटें पडून रहावें लागतें. २३ अशाप्रकारें जर मी या जगांत राहिलों तर माझ्या ओसाड घरट्यांत मलाहि एकटें रहावें लागणार. कधीं कांहीं तोंडांत गोडधड पडण्याचीहि आशा नको. त्यामुळें मी अधिक दुःखी मात्र होईन. ६२४.

तथा एव—असा विलाप करून आपल्या भार्येप्रमाणेंच, शिग्भिः आवृतान् मृत्युग्रस्तान् विचेष्टतः तान् पश्यन् अपि—पाशांनीं बद्ध झालेल्या, त्यामुळेंच मृत्यूनें ग्रसलेल्या, तडफडणाऱ्या त्या सर्वांस प्रत्यक्ष पहात असूनहि, स्वयं च कृपणः अबुधः शिक्षु अपतत्—तो दीन व मूढ झालेला कपोत आपणच जाऊन जाळ्यांत पडला. ७१.

असें बोलून त्यानें काय केलें तें पहा. त्यानें त्या मृत स्त्री-पुत्रांकडे पाहिलें. तीं काळपाशांत जखडलेलीं असून त्यांची सर्व हालचाल पूर्णपणें बंद पडली होती. २५ हें प्रत्यक्ष पहात असतांहि त्या मूर्खानें विचार न करितां त्या जाळ्यांत खरोखरच उडी टाकिली. २६ एक मरण पावला कीं त्याच्यामागून दुसऱ्याचें मरण, हें आपण जरी नित्य पहातों तरी जन्म-मृत्यूचें निवारण करून आपलें खरें हित कोणीच साधीत नाहीं. २७ पहा ! कपोतानें स्त्रीपुत्रांकरितां आपला जीवहि दिला, पण भगवत्पद प्राप्त करून घेणें मात्र त्याच्या मनाला रुचलें नाहीं. ६२८.

क्रूरः लुब्धकः—तेव्हां तो क्रूर पारधी, तं गृहमेधिनं कपोतं कपोतीं कपोतकान् च लब्ध्वा—त्या गृहस्थाश्रमी कपोताला, कपोतीला व त्याच्या पिलांना घेऊन—सिद्धार्थः गृहं प्रययौ—कृतकृत्य होत्साता स्वगृहाला गेला. ७२.

जाळीं पडला कपोता दुर्बुद्धी । झाली लुब्धकाची कार्यसिद्धी । सहकुटुंब घेऊनि खांदीं । निघे पारधी निजस्थाना ॥ २९ ॥ ऐसा जो कोणी गृहमेधी । त्याही सर्वथा काळ साधी । जैसी कपोत्याची बुद्धी । तैसी सिद्धी गृहमेध्या ॥ ६३० ॥ बाळकांच्या काकुळतीं । मरण पावली कपोती । ऐसें देखत देखतां दुर्मती । तेथ निश्चितीं उडी घाली ॥ ३१ ॥ यापरी तो कपोता । कुटुंबाची मेधा वाहतां । मरण पावला सर्वथा । विवेकु चित्ता न धरीचि ॥ ३२ ॥

एवं कुटुम्ब्यशान्तात्मा द्वन्द्वारामः पतत्रिवत् । पुष्णन्कुटुम्बं कृपणः सानुबन्धोऽवसीदति ॥ ७३ ॥

ऐसा कुटुंबी गृहस्थु । कुटुंबपोषणीं आसक्तु । विषयवासना अशांतु । पावे घातु सकुटुंब ॥ ३३ ॥ गृहासक्ती गृहाश्रमु । तो केवळ द्वंद्वाचा आरामु । कपोत्या ऐसा पडे भ्रमु । वृथा जन्मु दवडावा ॥ ३४ ॥

यः प्राप्य मानुषं लोकं मुक्तिद्वारमपावृतम् । गृहेषु खगवत्सक्तस्तमारूढच्युतं विदुः ॥ ७४ ॥

येवोनियां कर्मभूमीसी । जो पावला उत्तमदेहासी । त्याहीमाजीं उत्तमता कैसी । अग्रवर्णासी पैं जन्म ॥ ३५ ॥ आलिया मनुष्यदेहासी । मुक्तीचा दारवंटा मुक्त त्यासी । लवनिमिष सर्व दिशीं । यावज्जन्मेंसीं मोकळा ॥ ३६ ॥ इतरां वर्णांची हे गती । मा ब्राह्मण तरी पुण्यमूर्ती । ते सदा मुक्तचि असती । वृथा आसक्ती गुंतले ॥ ३७ ॥ विद्वांस आणि वैराग्य । तें ब्रह्मादिकां न लभे भाग्य । वृथा आसक्ती केले अभाग्य । शिश्नोदरा

अशारीतीनें तो मूढमति कपोत जाळ्यांत पडतांच पारध्याची कार्यसिद्धि झाली. त्यास सहकुटुंब खांद्यावर टाकून तो पारधी आपल्या घरीं जाण्यास निघाला. २९ असा जो कोणी घरावर मोह ठेवणारा गृहस्थाश्रमी असतो, त्याला काळ तत्काल ग्रासितो. कपोताची जशी आपल्या कुटुंबावर आसक्ति होती तशीच गृहस्थाश्रमी माणसाची असते. ६३० पिलांच्या शोकानें व्याकुळ होऊन कपोतीनें प्राण सोडिला. हें प्रत्यक्ष पहात असतांहि मंदबुद्धि कपोतानें त्याच मृत्युमुखांत उडी टाकिली. ३१ याप्रमाणें तो कपोत कुटुंबावर आसक्ति ठेवून स्वतःच्या प्राणास मुकला. त्यानें मनांत यत्किंचित्‌हि विवेक केला नाहीं. ६३२.

—आतां अवधूत याचीच दार्ष्टान्तिकांत योजना करितो—

एवं अशान्तात्मा द्वन्द्वारामः कुटुम्बी—याच न्यायानें ज्याचें चित्त अस्वस्थ आहे असा व विषयांमध्येंच रममाण होणारा कुटुंबी, पतत्रिवत् कुटुम्बं पुष्णन् कृपणः—पक्ष्याप्रमाणें कुटुंबाचें पोषण करणारा मूढ पुरुष, सानुबंधः अवसीदति—आपल्या परिवारासह नाश पावतो. ७३.

याप्रकारें कुटुंबी गृहस्थ कुटुंबपोषणांत आसक्त झाला असतां त्याच्या विषयवासना अतृप्त राहून शेवटीं कुटुंबासह नाश पावतो. ३३ गृहासक्ति व गृहस्थाश्रम हें केवल द्वंद्वाचें आगर आहे. त्यामुळें गृहस्थाला कपोता-सारखी भ्रांति पडते; पण त्यानें त्याच्यासारखा आपला जन्म व्यर्थ दवडूं नये. ६३४.

—गृहासक्ति पक्ष्यादि तिर्यक् प्राण्यांच्याहि अनर्थाला जर कारण होते तर मनुष्याला ती अत्यंतच निंद्य आहे, असें अवधूत यदूला सांगतो—

यः अपावृतं लोकं मुक्तिद्वारं मानुषं लोकं प्राप्य—जो उघडलेलें मुक्तीचें द्वारच अशा या मानुष शरीराला प्राप्त होऊन, गृहेषु खगवत् सक्तः—गृहस्थाश्रमामध्यें पक्ष्याप्रमाणें आसक्त होतो, तं आरूढच्युतं विदुः—त्याला आरूढपतित समजतात. ७४.

या मृत्युलोकीं येऊन ज्याला उत्तम देह प्राप्त झाला, व त्यांतहि आणखी उत्तमत्व कसें, तर ज्याला ब्राह्मणजन्म लाधला, (त्यानें मोक्ष मिळविला पाहिजे.) ३५ मनुष्य देह मिळाला कीं त्याला मुक्तीचें द्वार सदा खुलें असतें. एका दिवसांत, एका क्षणांत तो जन्म-मरणांतून सुटतो. ३६ इतर वर्णांची ही स्थिति, तर मग ब्राह्मण साक्षात् पूर्णमूर्तीच आहेत. ते सर्वदा मुक्तच असतात. तथापि हें न जाणून ते व्यर्थ आसक्तींत गुंततात. ३७ विद्वत्ता असून वैराग्य असणें हें भाग्य ब्रह्मादिकांसहि लाभत नाहीं. वृथा आसक्ति ठेवून ते अभागी मात्र होतात

सांग वेंचले ॥ ३८ ॥ मनुष्यदेहीं गृहासक्तु । तो बोलिजे आरूढच्युतु । कपोत्याचे परी दुःखितु । सिद्ध स्वार्थु नाशिला ॥ ३९ ॥ विषयीं सर्वथा नाहीं तृप्ती । ऐसें श्रुतिपुराणें बोलती । करितां विषयाची आसक्ती । थित्या मुकती नरदेहा ॥ ६४० ॥ नवल नरदेहाची ख्याती । रामनामाच्या आवृत्तीं । चारी मुक्ती दासी होती । तो देहो वेंचिती विषयांसी ॥ ४१ ॥ विषयसुखाचिये आसक्ती । कोणा नाहीं झाली तृप्ती । मृगजळाचिये प्राप्ती । केवीं निवती तृषार्त ॥ ४२ ॥ यालागीं जाणतेनि मनुष्यें । नरदेहाचेनि आयुष्यें । विषयांचेनि सायासें । व्यर्थ कां पिसे कष्टती ॥ ४३ ॥ नरदेहाऐसें निधान । अनायासें लाधलें जाण । सांडीं सांडीं अभिमान । तेणें समाधान पावसी ॥ ४४ ॥ पुढती नरदेहाची प्राप्ती । होईल येथ नाहीं युक्ती । यालागीं सांडूनि विषयासक्ती । भावें श्रीपति भजावा ॥ ४५ ॥ कलियुगीं सुगम साधन । न लगे योग याग त्याग दान । करितां निर्लज्ज हरिकीर्तन । चारी मुक्ति चरण वंदिती ॥ ४६ ॥ इटेसाठीं परीस पालटे । येतां कां मानिती वोखटें । तैसा कीर्तनाचेनि नेटेंपाटें । देवो भेटे प्रत्यक्ष ॥ ४७ ॥ एका जनार्दनु म्हणे । नश्वर देहाचेनि साधनें । जनीं जनार्दनु होणें । हे मुद्रा तेणें लाविली ॥ ४८ ॥ एका जनार्दना शरण । तंव जनार्दनु जाला एक एकपण । जैसें सुवर्ण आणि कंकण । दों नांवीं जाण एक तें ॥ ४९ ॥ तोचि एका एकादशीं । श्रीकृष्ण सांगे उद्धवासी । अवधूत सांगे यदूसी । गुरुउपदेशीं उपदेशु ॥ ६५० ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कंधे श्रीकृष्णोद्धवसंवादे यद्ववधूतेतिहासे एकाकारटीकायां सप्तमोऽध्यायः ७ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कंधे सप्तमोऽध्यायः ॥ ७ ॥ 7

व विषयलंपट होऊन अखेर व्यर्थ जातात. ३८ मनुष्यजन्म प्राप्त होऊन जो घरावर आसक्ति ठेवितो, तो पढत मूर्ख म्हटला जातो. तो आपल्या स्वाधीन असलेलें हित टाकून पारव्यासारखा दुःखी होतो. ३९ विषयांत कधींच तृप्ति होत नाहीं असें वेद व पुराणें सांगत आलीं आहेत. पण असें असतां पुरुष विषयासक्त होऊन नरदेहाला फुकट मुकतात. ६४० नरदेहाची ख्याति कांहीं विलक्षण आहे. रामनामाची नुस्ती जरी आवृत्ति केली तरी चारी मुक्ति त्याच्या दासी होऊन रहातात, असें असूनहि तोच नरदेह विषयासाठीं वेंचितात. ४१ विषयसुखाच्या आसक्तीनें कोणाचीच कधीं तृप्ति झालेली नाहीं. मृगजलाच्या प्राप्तीनें तृषार्ताची तहान कशी भागणार! ४२ पण जाणतीं मनुष्यें नरदेहाचें आयुष्य लाधलें असूनहि विषयांच्या विवंचनेंतच व्यर्थ काळ घालवितात. वृथा व कष्टी होतात. ४३ हे मानवा, तुला नरदेहासारखा ठेवा अनायासें लाभला आहे. केवल अभिमान सोडल्यानेंच तुझें समाधान होईल. ४४ पुढल्या जन्मीं नरदेह मिळेलच अशी कांहीं खात्री नाहीं. यासाठीं विषयासक्ति टाकून श्रीपतीला भक्तीनें भजावें. ४५ कलियुगांत हें सुलभ व सोपें साधन आहे. त्याला यज्ञ, याग, त्याग, दान हें कांहीं लागत नाहीं. लोकलज्जा सोडून एकाग्रतेनें हरिकीर्तन केलें असतां चारी मुक्ति त्याचे चरण वंदितात. ४६ विटेच्या बदली परीस मिळाल्यास कोणाला खेद वाटेल! तसाच कीर्तनाच्या मोबदल्यांत निश्चयानें प्रत्यक्ष देव भेटतो. ४७ एकनाथ म्हणतात कीं, नश्वर देहाच्या साधनानेंच जगांत जनार्दन व्हावें. हें त्यांनीं स्पष्ट सांगितलें आहे. ४८ एकनाथ जनार्दन स्वामींना शरण गेले, तों जनार्दनच एकत्वानें एकनाथ झाले. सोनें जसें सुवर्ण व कंकण या दोन नांवांनीं एकच असतें, ४९ त्याचप्रमाणें अवधूतानें यदूला केलेला जो गुरूपदेश तो श्रीकृष्णानें उद्धवाला एकादशस्कंधांत सांगितला व त्याचाच जनार्दनरूप एकनाथ उपदेश करीत आहे. ६५०.

इति श्रीमद्भागवतपुराणांतील एकादशस्कंधाचा परमहंससंहितेमधला श्रीधर-एकनाथविरचित टीकानुसार विष्णुशर्मकृत सान्वयार्थ-भावार्थासह श्रीकृष्ण-उद्धव संवादांतील यदु-अवधूत इतिहास या नांवाचा सातवा अध्याय समाप्त झाला.